
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | मंगळवार, २० जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३२१ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ■ dainiktarunbharat.com ■ epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या यांचा आज तिथीनुसार जन्मदिन

हिंदू राष्ट्राची कल्पना खूप प्राचीन आहे. वेदांमध्ये राष्ट्राची कल्पना सोप्या शब्दात मांडली आहे. ही भूमी आपली माता आहे आणि आपण तिचे पुत्र आहोत, ही वेदवाणी आहे. आपल्या राष्ट्राचा आधार आपली ही मातृभूमी आहे. डॉक्टर व श्रीगुरुजींच्या काळात महर्षी अरविंद, बंकिमचंद्र, स्वामी विवेकानंद या सर्वांच्या चिंतनातून मातृभूमीचा सुंदर आविष्कार झाला आहे. या मातृभूमीसाठी समर्पण करण्याचा भाव जागृत केल्यानेच देशात क्रियाशीलता, कर्मण्यशीलता, त्याग सारे काही येईल.

**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# महापौरपदासाठी आरक्षण सोडत गुरुवारी

## ● अधिसूचना जारी ● मंत्रालयात सकाळी ११ वाजता प्रक्रिया



◆ **मुंबई, १९ जानेवारी**

मुंबई महानगर पालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगर पालिकांच्या महापौर पदासाठी आरक्षण सोडत गुरुवार, २२ जानेवारी रोजी काढली जाणार आहे. यासंदर्भात राज्याच्या नगरविकास विभागाने अधिकृत अधिसूचना जारी केली असून ही प्रक्रिया मंत्रालयात नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता पार पडणार आहे.

आरक्षण सोडतीद्वारे संबंधित महापालिकांमधील महापौर पद अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्ग (ओबीसी), महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्ग यापैकी कोणत्या वर्गासाठी राखीव राहील, हे निश्चित केले जाणार आहे. सोडत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापौर पदाच्या आरक्षणाची अधिकृत यादी जाहीर केली जाणार असल्याचे नगरविकास विभागाने स्पष्ट केले आहे.

महापौर पदाच्या आरक्षण सोडतीत राज्यातील प्रमुख २९ महानगर पालिकांचा समावेश असून त्यामध्ये मुंबईसह पुणे, नागपूर, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, सोलापूर, मीरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर, अमरावती, नांदेड-वाघाळा, कोल्हापूर, अकोला, पनवेल, उल्हासनगर, सांगली-मिरज-कूपवाड, मालेगाव, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, चंद्रपूर, परभणी, इचलकरंजी आणि जालना या महापालिकांचा समावेश आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### रॅण्डम पद्धतीने आरक्षण निश्चित

**» महापौर पदाची आरक्षण सोडत ही पूर्णतः रॅण्डम पद्धतीने काढली जाते. महाराष्ट्रात परंपरेनुसार चिठ्ठीद्वारे सोडत काढण्याची पद्धत राबविली जाते. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आणि शासनाच्या नियमांनुसार ही प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडते, असे नगरविकास विभागाकडून सांगण्यात आले आहे.** ■

### राजकीय वर्तुळाचे लक्ष

» मुंबई महानगर पालिकेसह इतर प्रमुख महापालिकांमध्ये नव्या सत्तास्थापनेच्या पृष्ठभूमीवर ही आरक्षण सोडत राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. विशेषतः मुंबई महापालिकेत २५ वर्षांनंतर सत्तांतर झाल्याने महापौर पद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव राहते, यावर पुढील राजकीय गणिते ठरणार आहेत. सोडतीनंतर महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार असून त्यानंतर संबंधित महापालिकांमध्ये विशेष सभा घेऊन महापौरांची निवड केली जाणार आहे. ■

# भाजपा राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नबीन अविरोध

## ● आज समारंभपूर्वक सूत्रे स्वीकारणार ● अभिनंदनाचा वर्षाव



नितीन नबीन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला त्यावेळी उपस्थित भाजपाचे वरिष्ठ नेते

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

भारतीय जनता पक्षाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून बिहारचे नितीन नबीन यांची आज अविरोध निवड झाली. नबीन उद्या मंगळवार २० जानेवारीला भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून समारंभपूर्वक सूत्रे स्वीकारणार आहेत.

भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची आज निवडणूक होती. या पदासाठी नितीन नबीन यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के. लक्ष्मण यांनी त्यांच्या अविरोध निवडीची घोषणा केली. यावेळी भाजपा मुख्यालयात संरक्षण मंत्री राजनाथसिंह, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे मावळते राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री उपस्थित होते.

नितीन नबीन यांची भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अविरोध निवडीची घोषणा होताच त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. भाजपा मुख्यालयात त्यांच्या निवडीचा एकच जल्लोष करण्यात आला.

भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी नितीन नबीन यांचे उमेदवारी अर्जांचे तीन संच भरण्यात आले. उमेदवारी अर्जांच्या पहिल्या संचावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह आणि मावळते अध्यक्ष तसेच आरोग्य मंत्री नड्डा यांच्या सूचक आणि अनुमोदक म्हणून स्वाक्षऱ्या होत्या. उमेदवारी अर्जांच्या दुसऱ्या संचावर भाजपाच्या २० राज्यांच्या प्रदेश अध्यक्षांच्या स्वाक्षऱ्या होत्या. ◀(तभा वृत्तसेवा)

### सलग पाचवेळा आमदार




» बिहारमधील भाजपाचे ज्येष्ठ नेते नवीनकिशोर यांचे नितीन नबीन हे पुत्र आहेत. नवीनकिशोर यांच्या निधनानंतर बाकीपूर विधानसभा मतदारसंघात २००५ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत नितीन नबीन पहिल्यांदा आमदार म्हणून विजयी झाले. त्यानंतर सलग पाचदा ते या मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले आहेत. तीनदा मंत्रिपदही त्यांनी भूषवले. भाजयुमोचे बिहार प्रदेश अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. ■

### नबीन यांचा एकमेव अर्ज

» दुपारी २ ते ४ ही उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ होती. या वेळेत अध्यक्षपदासाठी नितीन नबीन यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. दुपारी ४ ते ५ या वेळेत उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली, त्यात नबीन यांचा अर्ज वैध ठरला. सायंकाळी ५ ते ६ ही अर्ज मागे घेण्याची वेळ होती. अध्यक्षपदासाठी नितीन नबीन यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के. लक्ष्मण यांनी त्यांच्या अविरोध निवडीची घोषणा केली. अध्यक्षपदासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आले असते, तर मंगळवार, २० जानेवारीला मतदान घेतले जाणार होते. नितीन नबीन यांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री, प्रदेश अध्यक्ष तसेच राष्ट्रीय परिषदेच्या सदस्यांना आमंत्रित करण्यात आले होते. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित होते. ■

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात ‘काळा सोमवार’



**मुंबई** : भारतीय शेअर बाजारासाठी आठवड्याची सुरुवात अत्यंत निराशाजनक राहिली. सोमवारी मुंबई आणि राष्ट्रीय बाजारात विक्रीचा मोठा दबाव दिसून आला. निर्देशांक आणि निफ्टीने अक्षरशः लोटांगण घातले. मुंबई बाजारातील निर्देशांक दिवसअखेर ३२४ अंकांनी खाली येत ८३,२४६ वर बंद झाला तर निफ्टीत तब्बल १०९ अंकांची मोठी घसरण नोंदविण्यात आली. कंपन्यांचे कमकुवत तिमाही अहवाल, परदेशी गुंतवणूकदारांची सततची विक्री आणि जागतिक बाजारपेठेतील नकारात्मक संकेत यामुळे गुंतवणूकदारांचा उत्साह शून्यावर आला होता. बाजारातील या पडझडीमुळे भांडवलात मोठी घट झाली. मुंबई बाजारातील भांडवलात १.२२ लाख कोटी रुपयांची घट झाली. या सर्व व्यवहारात मोठ्या शेअर्सच्या तुलनेत छोट्या कंपन्यांच्या शेअर्सना विक्रीचा सर्वाधिक तडाखा बसला. ■

### अभिनेता विजयची सहा तास सीबीआय चौकशी

**नवी दिल्ली** : करूर येथील चेंगराचेंगरी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात् सीबीआयने अभिनेता आणि टीव्हीके पक्षाचा प्रमुख विजय याची सोमवारी सहा तास चौकशी केली, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास चौकशी पूर्ण झाल्यानंतर निवांत दिसणारा विजय आलिशान एसयूव्हीतून सीबीआयच्या मुख्यालयातून बाहेर आला. आपल्या समर्थकांना व माध्यमांना हात दाखवत पंचतारांकित हॉटेलकडे रवाना झाला. ■



### हरयाणाच्या चालकाला १० कोटींची लॉटरी

**सरसा** : हरयाणातील सिरसा येथील रहिवासी पृथ्वीसिंह यांना १० कोटी रुपयांची लॉटरी लागली आहे. पृथ्वीसिंह पेशाने ड्रायव्हर आहेत. त्यांनी पंजाब स्टेट डियर लॉटरी (लोहड़ी मकर संक्रांति बंपर २०२६) मध्ये पहिले बक्षीस जिंकून सर्वांना आश्चर्यचकित केले. बक्षीस जिंकल्याची माहिती मिळाल्यानंतर पृथ्वीसिंह यांच्या घरात आनंदाचे वातावरण आहे. कुटुंबाने ढोल-ताशे वाजवून आणि नोटांची माळ घालून त्यांचे स्वागत केले. पृथ्वीसिंह म्हणाले की, या पैशातून ते स्वतःचा व्यवसाय सुरू करतील. तर मुलाने म्हटले - आता तर थार गाडी घेऊ. पृथ्वीसिंह हे राणियाजवळच्या मोहम्मदपुरिया गावाचे रहिवासी आहेत. त्यांच्या कुटुंबात पत्नी सुमन, मुलगी रितिका, मुलगा दक्ष आणि वडील देवीलाल आहेत. पृथ्वी मजुरीसोबत ड्रायव्हिंगचेही काम करतात. त्यांची पत्नी सुमन जवळच्याच एका शाळेत शिपाई म्हणून कार्यरत आहे.

# अपमानास्पद भाषा वापरणे गुन्हा नाही

## ॲट्रॉसिटीसंदर्भात सुप्रीम कोर्टाचा मोठा निकाल



◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

केवळ अपमानास्पद भाषा वापरणे हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ (ॲट्रॉसिटी) अंतर्गत गुन्हा ठरू शकत नाही. जोपर्यंत संबंधित व्यक्तीचा अपमान करण्यामागे तिची जात हे कारण नसते किंवा तिला जातीवरून कमी लेखण्याचा हेतू नसतो, तोपर्यंत केवळ अपमानास्पद शब्द वापरले म्हणून हा कायदा लागू होत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या न्यायासनाने दिला.

संबंधित प्रकरणात एफआयआर किंवा दोषारोपपत्रात आरोपीने जातिवाचक शिवीगाळ केल्याचा किंवा जातीवरून अपमान केल्याचा कोणताही ठोस उल्लेख नसताना देखील ही कारवाई सुरू ठेवण्यात आली होती. या प्रकरणी सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयाने चूक केली, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

बिहारमधील एका अंगणवाडी केंद्रात शिवीगाळ आणि मारहाण केल्याचा आरोप संबंधितावर होता. त्याच्यावर भारतीय दंड विधानाच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी पाटणा उच्च न्यायालयाने आरोपीने दाखल केलेली याचिका फेटाळली होती. याविरोधात संबंधिताने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

**तक्रारदार मागासवर्गीय आहे म्हणून गुन्हा सिद्ध होत नाही**

न्यायालयाने स्पष्ट केले की, केवळ तक्रारदार मागासवर्गीय आहे म्हणून हा गुन्हा सिद्ध होत नाही, तर अपमान करण्यामागे त्या व्यक्तीला जातीवरून कमीपणा दाखवण्याचा हेतू असणे अनिवार्य आहे. तसेच, कलम ३(१)(एस) अंतर्गत गुन्हा ठरण्यासाठी शिवीगाळ करताना जातीचा उल्लेख केलेला असणे किंवा जातीच्या नावाने अपमान करणे अंतर्भूत आहे. उपलब्ध कागदपत्रांवरून असे सिद्ध होत नाही, आरोपीने तक्रारदाराच्या जातीमुळे त्याला लक्ष्य केले. ◀(वृत्तसंस्था)

### सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

» शाजन स्कारिया विरुद्ध केरळ राज्य या अलिकडील खटल्याचा संदर्भ देत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या न्यायासनाने दोन अटी स्पष्ट केल्या. पहिली अट की, तक्रारदार व्यक्ती अनुसूचित जाती किंवा जमातीची असणे आवश्यक आहे. दुसरी अट, झालेला अपमान किंवा धमकी ही केवळ ती व्यक्ती त्या विशिष्ट जातीची आहे याच कारणावरून दिलेली असावी. ■

# कोलंबियामध्ये हिंसक संघर्षात २७ जणांचा मृत्यू

◆ **ग्वाविअरे, १९ जानेवारी**

कोलंबियामध्ये हिंसाचारात २७ जणांचा मृत्यू झाला. कोलंबिया सैन्याच्या म्हणण्यानुसार, नैऋत्य कोलंबियाच्या ग्वाविअरे विभागातील एल रेटोर्नो नगरपालिकेच्या ग्रामीण भागात ही घटना घडली. या परिसराला कोकेन उत्पादन आणि तस्करीसाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते.

या भागातील विरोधी गटांमध्ये वर्चस्वासाठी झालेल्या संघर्षामुळे हिंसाचार झाला, असे सैन्य अधिकाऱ्यांनी सांगितले. वर्षानुवर्षे या भागात दहशतवादी गटांसोबत शांतता चर्चा आणि निःशस्त्रीकरणाचे प्रयत्न चालले आहेत, तरीही सशस्त्र गट हिंसाचारावर उतरले आहेत. हा अलिकडच्या काही महिन्यांतील सर्वात घातक संघर्ष होता. ◀(वृत्तसंस्था)

# देशहिताची प्रत्येक कृती म्हणजे संघकार्य

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन



◆ **राजकोट, १९ जानेवारी**

संघाला जाणून घ्यायचे असेल तर विकिपीडिया वाचू नका, संघ-साहित्य वाचा. दुसऱ्यांच्या मतांद्वारे संघाला समजता येणार नाही. जर तुम्ही उत्कृष्ट पद्धतीने, निःस्वार्थ बुद्धीने आणि प्रामाणिकपणे देशहितासाठी काही कार्य करत असाल तर ते संघाचेच काम मानले जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

राजकोटमधील सेवा भारती भवन येथे सौराष्ट्र-कच्छमधील युवा प्रतिभांसोबत संवाद साधताना सरसंघचालकांनी विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकला. संघ संस्थापक डॉ. हेडगेवारांनी संघ स्थापनेपूर्वी केलेल्या मंथनाचा उल्लेख करताना डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, संघ संपूर्ण हिंदू समाजाला संघटित करण्याच्या उद्दिष्टासाठी कार्यरत आहे. जसे ब्रिटनमध्ये ब्रिटिश आणि अमेरिकेत अमेरिकन राहतात, तसेच हिंदुस्थानात राहणारे ‘हिंदू’ आहेत. भारत आणि हिंदुस्थान वेगळे नाही, एकच आहे. भारत एक स्वभाव आहे आणि हिंदू देखील एक स्वभाव आहे. खेळीमेळीने, एकोप्याने चालण्याचा स्वभाव म्हणजे ‘हिंदू’ आहे.

आमची भावना ‘वसुधैव कुटुम्बकम्’ची राहिली आहे. सनातन, भारतीय, इंडिक, आर्य आणि हिंदू ही सर्व समान नावे आहेत. पण, हिंदू शब्द सोपा आहे आणि सहज समजण्यासारखा आहे. हिंदू आदिकाळापासून आपल्या परंपरेसह या भूमीत वास्तव्यास आहेत आणि देशाला शक्तिशाली तसेच विकसित बनविण्याची जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे, हीच आपली धारणा आहे. यासाठी संपूर्ण हिंदू समाजाला एकजूट करून, गुणवत्ता निर्माण करणे आणि विश्व कल्याणासाठी देशाला पुढे नेण्याच्या उद्देशाने संघ सातत्याने कार्यरत आहे.

**संघाचे पंचपरिवर्तन**

संघ आपल्या शाखांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण, श्रेष्ठ आणि निष्ठावान स्वयंसेवक तयार करतो. असे स्वयंसेवक समर्पित भावनेने समाजाच्या विविध क्षेत्रांत कार्य करतात. पण, या व्यतिरिक्त देखील संघाचे कार्य आहे. फक्त स्वयंसेवकांना पाहून संघकार्याचे मूल्यमापन करता येणार नाही. संघाला समजून घेण्यासाठी संघात यावे लागेल. देशाचे भाग्य बदलण्यासाठी संपूर्ण समाजाची सक्रियता आवश्यक आहे आणि समाजात आचरणातील परिवर्तनही गरजेचे आहे. अर्थात, सगळेच शाखेत येऊ शकणार नाहीत, हे लक्षात घेऊन संघाने ‘पंच परिवर्तना’चा विचार समोर आणला आहे. त्यात सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन, स्व-बोध आणि नागरी कर्तव्य यांचा समावेश आहे. या पाच क्षेत्रांत कार्य करून कोणीही छोट्या-मोठ्या कार्यांनीही देशहितामध्ये आपले योगदान देऊ शकतात, असे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

कार्यक्रमात मातृशक्ती जागरणाचा संकल्प व्यक्त करण्यात आला. यावेळी सौराष्ट्र प्रांताचे संघचालक मुकेशभाई मलकाण यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि वरिष्ठ स्वयंसेवक उपस्थित होते. ◀(वृत्तसंस्था)

# अर्थव्यवस्था ७.३ टक्के वेगाने धावणार

नवी दिल्ली : यंदाच्या आर्थिक वर्षात भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग ७.३ टक्के राहणार असल्याचा अंदाज जागतिक पतमानांकन संस्था मूडीजने वर्तवला आहे. या आर्थिक विस्तारामुळे केवळ सरासरी घरगुती उत्पन्नच वाढणार नाही, तर विमा क्षेत्रातही तेजी येईल, असे मूडीजने म्हटले आहे.

भारतीय अर्थव्यवस्था बळकट झाली असून, वाढत्या विकास दराचा फायदा देशातील विमा क्षेत्राला मिळत आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेची वाढ ७.३ टक्के राहण्याची अपेक्षा आहे, जी गेल्या वर्षीच्या ६.५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. आर्थिक वाढीचा थेट परिणाम दरडोई उत्पन्नावर होतो, असे मूडीजने भारताच्या आर्थिक दृष्टिकोनावर सकारात्मक भूमिका घेत म्हटले आहे. २०२४-२५ मध्ये जीडीपी प्रति व्यक्ती वार्षिक आधारावर ८.२ टक्के वाढून ११,१७६ डॉलर्स झाला. दुसरीकडे मुख्य जीडीपीमध्ये ६.५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली.

# भारत-यूएईमध्ये पाच सामंजस्य करार



◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद झायेद अल नाहयान यांच्या सोमवारी दिल्लीत झालेल्या द्विपक्षीय चर्चेदरम्यान दोन्ही देशांनी धोरणात्मक संरक्षण भागीदारी, अंतराळ पायाभूत सुविधा आणि ऊर्जा सुरक्षा यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात सहकार्यासाठी पाच सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी भारत-यूएई शिखर परिषदेचे वर्णन एक लहान पण अतिशय अर्थपूर्ण भेट असे केले. नरेंद्र मोदी आणि शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी मर्यादित आणि प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चा केली. ◀(वृत्तसंस्था)

# लग्नसराईमुळे सोन्याने घेतली उसळी

## सोने १ लाख ४४ हजार ४४५ रुपये प्रति १० ग्रॅम

## चांदी ३ लाख ३ हजार ७०१ रुपये प्रतिकिलो




◆ **नागपूर, १९ जानेवारी**

जागतिक बाजारातील घडामोडी आणि लग्नसराईमुळे सोन्याने पुन्हा एकदा उसळी घेतली असून, चांदीच्या किमतीतही लक्षणीय वाढ झाली आहे. प्रत्येक शहरात सोने आणि चांदीचे दर बदलले आहेत. नागपूरच्या सराफा बाजारात सोमवारी जीएसटीशिवाय सोने १ लाख ४४ हजार ४४५ प्रति १० ग्रॅम, तर चांदीचे दर ३ लाख ३ हजार ७०१ रुपये प्रतिकिलो आहे. जीएसटी जोडल्यास दर आणखी वाढतात, अशी माहिती लोंदे ज्वेलर्सचे संचालक राजेश लोंदे यांनी दिली.

नवीन वर्षातील दरवाढीमुळे सोने आणि चांदीच्या खरेदीकडे सर्वसामान्य ग्राहकांनी पाठ फिरविली आहे. नवीन वर्षात २४ कॅरेट सोन्याचे दर ३ टक्के जीएसटीसह ९,६०० रुपयांनी वाढले. सोन्याच्या भावात दररोज होणारी वाढ सर्वसामान्यांसाठी चिंतेची बाब ठरली असून, ग्राहक आता १४ कॅरेट दागिन्यांची मागणी करीत आहेत.

नवीन वर्षाच्या सुरुवातीपासून सराफा बाजारात मोठी तेजी पाहायला मिळत आहे. सोने व चांदीच्या दरवाढीची अनेक कारणे आहेत. जागतिक भू-राजकीय तणाव, भारत आणि चीनच्या मध्यवर्ती बँकांची सोने खरेदी, अमेरिकन डॉलरची घसरण आणि व्याजदर, जागतिक स्तरावर चांदीची औद्योगिक क्षेत्रात वाढलेली मागणी आणि कमी उपलब्धता, तुलनेत रुपया कमकुवत झाल्यामुळे आयात होणारे सोने महाग होत आहे. १५ डिसेंबर २०२५ च्या आसपास चांदी पहिल्यांदा दोन लाख रुपयांवर पोहोचली होती. म्हणजे चांदीला दोन लाखांवरून तीन लाख रुपयांपर्यंत जाण्यास फक्त एक महिन्याचा कालावधी लागला. तर तिला एक लाखांवरून दोन लाखांपर्यंत पोहोचण्यास नऊ महिने, तर ५० हजारांवरून एक लाखांपर्यंत पोहोचायला १४ वर्षे लागली होती. ◀(तभा वृत्तसेवा)

### चांदीने ओलांडला तीन लाखांचा टप्पा

**» सोन्याप्रमाणे चांदीलाही झळाळी आली असून, केवळ १८ दिवसांत चांदीचे दर ५६,३०० रुपयांनी वाढले. चांदीचा दर प्रतिकिलो ३ लाख रुपयांच्या पार गेला आहे. शहरांनुसार चांदीचे दर वेगवेगळे आहेत. औद्योगिक क्षेत्रात चांदीला मागणी वाढल्याने दर वाढत आहे. याशिवाय बाजारपेठेत उपलब्धता कमी आहे. पुढेही दरवाढीची शक्यता असल्याची माहिती राजेश रोकडे यांनी दिली आहे.** ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सुरत-चेन्नई महामार्गासाठीच्या ब्लास्टिंगचा रहिवाशांना होतोय त्रास

## अक्कलकोट शहरालगत सुरू आहे काम; रहिवाशी आंदोलनाच्या तयारीत

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट,दि. १९ जानेवारी**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरालगत बासलेगाव रस्त्यावरील कोहिनूर मंगल कार्यालय जवळ सूरत ते चेन्नई महामार्गाचे काम सुरू आहे. रस्ता बनविण्यासाठी संबंधित कंपनीकडून नियमबाह्य अवैधरित्या सुरुंग लावून ब्लास्टींग केले जात आहे. या वाढत्या ब्लास्टींगमुळे येथील अनेक घरांना मोठे तडे गेले आहेत, तर अनेक घरांची पडझड होण्याची शक्यता आहे. आणि अनेक कुटुंबांच्या बोअरवेल मधील पाण्याची पातळी कमी झाली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून ब्लास्टींग सुरू असताना, अनेक मोटारसायकलस्वार बासलेगाव कडे जात असताना किंवा अक्कलकोटकडे येत असताना त्यांच्या बाजूलाच ५ ते १० किलोचा भला मोठा दगड येऊन पडला. सुदैवाने तो मोटारसायकलस्वार सपत्नीक थोडक्यात बचावला. गेल्या दोन महिन्यांपासून ब्लास्टींगचे काम सुरू असून, कोहिनूर मंगल कार्यालय परिसरातील वसाहत मधील नागरिक व महिलांसह वयोवृद्ध व्यक्ती आणि चिमुकली मुले जीव मुठीत घेऊन जीवन जगत आहेत. दररोज ब्लास्टींग सुरु असताना सकाळ पासून ते संध्याकाळ पर्यंत वसाहत लगत व बासलेगाव रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दगड पडत आहेत. संबंधित रस्ता ठेकेदारांच्या सहकारी इंजिनिअर व कामगारांनी संगनमताने हे अवैध ब्लास्टींग मर्यादेपेक्षा जास्त उडविण्याचे कामास सुरुवात केली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तर परिसरातील मंगल कार्यालयाचे संचालक उरुजपाशा पिरजादे, नागराज कुंभार, प्रशांत गुरव, सुनील गोरे, सिध्दाराम पाटील, इनायत शेख, रमेश शिंदे, दिगंबर साळुंखे, गुरप्पा कुंभार, सुनील आळंद, अविनाश कोरे, विजयकुमार मलंग, संगमेश्वर स्वामी, सचिन डिग्गे, शशिकांत कुंभार, करेप्पा रोळ्ळी, अलका दसले, उज्वला फडतरे, विजयालक्ष्मी कुंभार यांच्या घरांना तडे गेले आहेत. सूरत ते चेन्नई सुपर रस्ता काम करणाऱ्या कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी, या मागणीसाठी येथील वसाहतीमधील नागरिक व महिलांनी अनेकवेळा कंपनीसह शासन लोकप्रतिनिधींना तोंडी सांगितले आहे, आता निवेदन देण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे या अवैध ब्लास्टींग उडविण्याचे बाबतीत पोलिस निरीक्षक दीपक भिताडे यांनी सुद्धा या वसाहतीमधील नागरिकांच्या तोंडी तक्रारीची दखल घेऊन ठेकेदारांच्या मुनिमास सूचना दिल्या आहेत. तरी सुद्धा त्या सूचनांची पायमल्ली केली जात आहे. संबंधित ठेकेदारास ब्लास्टींग उडविण्याऐवजी पर्याय निवडण्याची सूचना द्यावी, अशी वाढती मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.



गेल्या वर्षभरापासून सूरत ते चेन्नई रस्ता कामकाज सुरू असून मात्र एक - दोन महिन्यांपासून दिवस व रात्र वसाहत परिसरात अवैध ब्लास्टींग उडविण्याचे कामास सुरुवात केली आहे. याकडे तहसील प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. तरी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन अवैध ब्लास्टींग उडविण्याचे काम ास पायबंद घालण्यासाठी सूचना द्यावी, अन्यथा या परिसरातील श्री वटवृक्ष गणेश मंडळाच्या वतीने नागरिकांनी आंदोलन करणार असल्याचे सांगितले.

माझी शेती सूरत ते चेन्नई महामार्गाच्या दोन्ही बाजूला आहे. या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग घेत असल्याने धुळीमुळे पीकांचे नुकसान होत आहे. तसेच गेल्या वर्षभरापासून दोन एकर शेतजमीन मध्ये पावसाचे पाणी थांबले आहे. सदर नुकसान कंपनीने भरून द्यावे, याबाबत कंपनीकडे वारंवार मागणी केली आहे. मात्र माझ्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

**- अहमदपाशा पिरजादे, शेतकरी, नागनहळ्ळी.**

झेडपी निवडणूकीसाठी

# उमेश परिचारक यांच्या आघाडीसाठी कपबशी चिन्ह आरक्षित

## पाच आघाड्यांना चिन्ह आरक्षण फेटाळले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यालयाने उमेश परिचारक यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या पंढरपूर-मंगळवेढा स्थानिक विकास आघाडीस कपबशी चिन्ह आरक्षित ठेवले आहे. चिन्ह आरक्षणाची मागणी केलेल्या पाच आघाडींचे अर्ज निवडणूक कार्यालयाकडून फेटाळण्यात आले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील ६८ जिल्हा परिषद गट आणि १३६ गणासाठी निवडणुक प्रक्रीया सुरु आहे. यात पंढरपूर-मंगळवेढा स्थानिक विकास आघाडीला जिल्हा प्रशासनाने कपबशी हे चिन्ह मिळाले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद निवडणुकीत कपबशी हे चिन्ह आरक्षित झाली आहे. उर्वरित सोलापूर जिल्ह्यातील पाच विकास आघाड्यांना चिन्ह मिळविण्यात अपयश आले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लढविण्यासाठी चिन्ह आरक्षित करण्यात यावे यासाठी पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीने १४ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज सादर केले होते. तसेच सांगोला तालुका स्थानिक विकास आघाडी, राष्ट्रीय समाज पक्ष, महाराष्ट्र राज्य, तीर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर, करमाळा तालुका विकास आघाडी, शेतकरी आघाडी, सांगोला यांचेही अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आले होते.

स्थानिक आघाडींना चिन्ह आरक्षित करताना मागील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकूण सदस्यांपैकी म्हणजे ६८ पैकी ३.४ टक्के म्हणजे ३ सदस्य निवडून येणे आवश्यक असते. यातील पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीचे जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये एकूण ३ सदस्य निवडून आलेले होते. त्यामुळे त्यांना यंदाच्या जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी यांनी मागणी केल्याप्रमाणे कपबशी हे चिन्ह आरक्षित करण्यात आले आहे. उमेश परिचारक हे या आघाडीचे अध्यक्ष आहेत.

सांगोला तालुका स्थानिक विकास आघाडी, राष्ट्रीय समाज पक्ष, महाराष्ट्र राज्य, तीर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर, करमाळा तालुका विकास आघाडी, शेतकरी आघाडी, सांगोला यांचे मागील निवडणुकीत ३ सदस्य निवडून न आल्याने त्यांच्या मागणीनुसार चिन्ह आरक्षिततेची मागणी अपात्र करण्यात आली आहे. सन २०१७मध्ये या आघाड्यांचा ६८ पैकी ३ सदस्य निवडून न आलेल्या नियमांची पूर्तता होत नसल्याच्या कारणावरुन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मुक्तचिन्ह एक चिन्ह आरक्षित करण्याचा अर्ज नामंजूर केला आहे.

## महत्वाचे...

### एचएन कॉलेजमध्ये आज राष्ट्रीय परिषद

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आर्थिक व्यवस्था आधुनिक उद्योग शैक्षणिक समन्वयाचा प्रेरणास्रोत या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद २० व २१ जानेवारी रोजी आयोजित केली आहे. याचे उद्घाटन मंगळवारी, २० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. एल. बी. दामा यांच्या हस्ते होणार आहे. या शैक्षणिक सत्रांमध्ये जयपूरचे ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक डॉ. घनश्याम होळकर, हैदराबादचे स्कूल ऑफ कॉमर्स अँड बिझनेस मॅनेजमेंटचे प्रा. डॉ. बदिउद्दीन अहमद, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे संचालक डॉ. प्रभाकर एन. कोळेकर, एस. बी. पी. महाविद्यालय मंद्रुपचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. कदम, कर्नाटकातील ए. जी. एम. ग्रामीण अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय वरूरचे प्राध्यापक, डॉ. चिदानंद जी. ब्याहट्टी, पुण्याचे नामवंत अर्थतज्ज्ञ डॉ. उत्तमराव हुंडेकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.



### सलगर जिल्हा परिषद गटात शिवसेनेला हादरा

**अक्कलकोट, दि. १९ जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्व असलेल्या सलगर जिल्हा परिषद गटात शिवसेनेत महत्वाच्या घडामोडी झाल्या आहेत. याचा परिणाम जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत दिसुन येण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हा परिषद महिला बाल कल्याण समिती माजी सभापती स्वाती शटगार यांचे पुत्र प्रविण शटगार यांनी परिसरातील शिवसेनेच्या असंख्य कार्यकर्ते व प्रमुख नेत्यांसह आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रभावी नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या घटनेमुळे सलगर जिल्हा परिषद गटात शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे . या मुळे सलगर जिल्हा परिषद गटात भाजपाची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य प्रविण शटगार भाजपा मध्ये प्रवेश केला याप्रसंगी तम्मा धसाडे, रफीक पटेल, मल्लु पराणे, प्रशांत काळे, रत्नाकर पाटील, शशी शटगार आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

### मंगळवेढ्यातून चोरट्याने मोटरसायकल पळविली; चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा,दि.१९ जानेवारी-**

मंगळवेढा शहरातील शिवप्रेमी चौकात उभी केलेली ५० हजार रुपये किंमतीची स्प्लेंडर मोटर सायकल चोरट्याने हातोहात पळविण्याचा प्रकार घडल्याने या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी सुरज ताड (रा.एकलासपूर) यांनी दि.१७ रोजी सकाळी १०.५० ते दुपारी १ च्या दरम्यान शहरातील सरस्वती टायपींग इन्स्टिट्यूट शिवप्रेमी चौक येथे फिर्यादीने मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ डी.एक्स २५२८ ही लॉक करुन उभी केली होती. फिर्यादी सदर ठिकाणी आल्यानंतर त्यांना मोटर सायकल दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने स्वत:च्या फायद्याकरिता मुद्दाम लबाडीने ती गाडी चोरुन नेली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कांबळे हे करीत आहेत.

### ब्रम्हपुरी परिसरातून एक वयोवृध्द महिला बेपत्ता

**मंगळवेढा, दि.१९ जानेवारी-**

ब्रम्हपुरी येथून वयोवृध्द मोहनाबाई शिवाजी रणे (वय-६९) ही महिला राहते घरातून कोणास काही न सांगता कोठे तरी निघून गेली असल्याची तक्रार तिच्या मुलाने मंगळवेढा पोलीसात दिली आहे. दरम्यान या वयोवृध्द महिलेचा पोलीस कसून शोध घेत आहेत. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील खबर देणारे भारत रणे हे दि.१४ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शेतात काम करण्यासाठी गेल्यावर त्यांची आई मोहनाबाई ह्या घरीच होत्या. तद्नंतर ११.३० च्या दरम्यान आई काय करते ? हे पाहण्यासाठी भारत घरी आला असता आई दिसून आली नाही. त्यानंतर कुटूंबियांनी ब्रम्हपुरी व आजूबाजूच्या परिसरात तसेच नातेवाईकाकडे आईचा सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून आली नसल्याचे दिलेल्या खबरमध्ये म्हटले आहे. तिचे वर्णन पुढीलप्रमाणे वय ६९, शिक्षण नाही, रंग गोरा, उंची पाच फुट, बांधा सडपातळ, अंगात नेसणेस निळ्या रंगाची साडी, चोळी व हिरव्या रंगाचा स्वेटर, भाषा मराठी अशा वर्णनाची वृध्द महिला कोणास भेटल्यास पोलीस हवालदार मनोज खंडागळे (९८८१०४५२९५) तसेच भारत रणे (९६६५३२९१५२), दादा ढहाळे (९५६१९५३१३०) आदी नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



### अप्पासाहेब वारद यांना महापालिकेतर्फे अभिवादन

**सोलापूर, दि. १९ जानेवारी -**

महानगरपालिकेच्या वतीने कै.पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त इंद्रभवन आवारातील कै.पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉलमध्ये त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे,नितीन गायकवाड, मलेश आप्पा कावळे. मल्लिनाथ पाटील, महेंद्र वारद, शशिरेखा लूपने,उमेश सिंदगी, नरेंद्र गांभीरे, राजेंद्र मायनाल, अण्णासाहेब कोथळी, श्वेता कोठावळे, चंद्रभागा भाजीभाकरे आदी उपस्थित होते.

# मंगळवेढ्यात उमेदवारी अर्ज भरण्याच्या चौथ्या दिवशी केवळ तिघांचे अर्ज

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१९ जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती गटासाठी पंचवार्षिक निवडणूका जाहीर झाल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दि.१९ जानेवारी रोजी केवळ तिघांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान आजअखेर एकूण जिल्हा परिषद-४८ तर पंचायत समिती गणासाठी ७७ असे एकूण १२५ नामनिर्देशन पत्राची विक्री झाली आहे.



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका खूप वर्षानंतर होत असल्याने निवडणूकीसाठी मोठी उत्सुकता उमेदवारामध्ये दिसून येत आहे. सोमवार हा मंगळवेढ्याचा आठवडी बाजार असल्याने या दिवशी लक्ष्मी दहिवडी गणातून १ अर्ज, तर भोसे गणातून २ अर्ज दाखल झाल्याचे सांगण्यात आले. उमेदवार अर्ज भरण्यापुर्वी चाचपणी करुन अर्ज भरत आहेत. परिणामी अर्ज भरण्यास उशीर लागत असल्याचे चित्र आहे. दि.२१ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटचा दिवस असल्याने येत्या दोन दिवसात मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल होण्याची चिन्हे आहेत. दि.२२ रोजी अर्जाची छाननी तर दि.२७ रोजी अंतिम यादी प्रसिध्द करुन चिन्ह वाटप करण्यात येणार आहेत. दि. ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर दि.७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होवून निकाल घोषीत केले जाणार आहेत.

# अंबरनाथ नगरपालिकेत शिंदे-राष्ट्रवादीच्या सत्ता स्थापनेला हायकोर्टाची स्थगिती

## भाजपाची शिंदे गटाविरुद्ध तक्रार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ जानेवारी-**

निवडणूक निकालानंतर नगरसेवकांच्या फोडाफोडी आणि पळवापळवीमुळे राज्यभरात चर्चेत आलेल्या अंबरनाथ नगरपरिषदेतील सत्ता स्थापनेतील कवित्व अद्याप संपलेले नाही.आठवड्याभरापूर्वी शिवसेना शिंदे गटाने स्थापन केलेल्या समितीच्या निवडीला आता उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. भाजपाने दाखल केलेल्या याचिकेवरून कोर्टाने ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना याविषयाबाबत तीन आठवड्यात योग्य तो निर्णय घ्यावा, असे निर्देश सोमवारी दिले.

त्यामुळे त्यांच्याकडून आता शिंदेंच्या शिवसेनेने अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत हातमिळवणी करून बनविलेली शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी वैध की भाजपा नेत्यांनी काँग्रेसच्या नगरसेवकांना हाताशी घेऊन केलेली नवी आघाडी खरी, याचा निर्णय घ्यावा लागणार आहे.

शिंदे- अजित पवार गटाने स्थापन केलेल्या सत्तारूढ विकास आघाडी विरोधात यासंदर्भातील याचिकेवर सोमवारी हायकोर्टात न्या. रवींद्र घुगे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठापुढं सुनावणी झाली. त्यांनी आघाडीचा निर्णय होईपर्यंत नगरपरिषदेच्या विविध समित्या स्थापनेला दिलेली स्थगिती कायम ठेवून दोन्ही आघाडींच्या सहमतीने हे प्रकरण जिल्हाधिकारी यांच्याकडे निर्णयासाठी पाठवल जात आहे. यावर निकाल येईपर्यंत दोन्ही आघाड्या स्थगित केल्या जात आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी कायदेशीर तरतुदीनुसार यावर निर्णय द्यावा, असे निर्देश देत हायकोर्टानं ही याचिका निकाली काढली.

त्यामुळे आता दोन्ही आघाड्यांनी २८ जानेवारीपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात आपले म्हणणे सादर करावयाचे आहे. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी दोन्ही बाजू ऐकून विनाकारण सुनावणी तहकूब न करता पुढील २१ दिवसांत आपला निर्णय द्यावा, असं हायकोर्टानं आपल्या आदेशात नमूद केले. तसेच निर्णय काहीही आला तरी त्या निर्णयालाही पुढील १५ दिवस स्थगिती असेल. जेणेकरून निकालाविरोधात एखाद्याला आव्हान द्यायचं असल्यास त्यांच्यापुढं तो पर्याय उपलब्ध राहील. त्यामुळं मार्च २०२६ पर्यंत अंबरनाथ नगरपरिषदेच्या समित्या स्थापनेची प्रक्रिया करता येणार नाही, हे हायकोर्टाच्या निकालानं आता स्पष्ट झाले. दरम्यान, समित्या स्थापनेसाठी महासभा आता कोर्टाच्या निर्णयामुळं रद्द केली.

### काय आहे प्रकरण?

अंबरनाथ नगरपरिषदेची सत्ता काबीज करण्यासाठी भाजपाने १२ नगरसेवक असलेल्या काँग्रेसला आणि अजित पवार गटाच्या चार आणि एका अपक्षा ला सोबत घेतले. त्यामुळे प्रदेश काँग्रेसने ११ जणांची हकालपट्टी केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी या सर्वांनी भाजपात प्रवेश केला.त्याचवेळी शिंदे गटाने पवारांचे ४ व एका अपक्षाला फोडून ३२ जणांची स्वतंत्र आघाडी स्थापन केली. राष्ट्रवादीला उपनगराध्यक्ष पद देत सत्ता स्थापन करून अन्य समित्याची नियुक्ती केली. त्याविरोधात भाजपाने हायकोर्टात याचिका दाखल केली आहे.

# कृष्णाकाठच्या साहित्य मेळाव्यात मनोरमा स्मरणिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

सांगलीच्या मोतीबाग येथील जिल्हाधिकारी निवासस्थानी आयोजित कृष्णाकाठच्या साहित्य मेळाव्यात ९८ व्या जागतिक मराठी साहित्य संमेलनाच्या (नवी दिल्ली) अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते मनोरमा साहित्य संमेलन सोलापूर २०२५ च्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

सांगलीच्या साहित्यिक परंपरेत एक संस्मरणीय पर्व ठरणाऱ्या या सोहळ्यात डॉ. भवाळकर यांचा जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी अशोक काकडे देशमुख यांच्या हस्ते झालेला सन्मान, त्यांचे अनुभवकथन, तसेच 'अवडक चवडक' मधील भावस्पर्शी काव्यवाचन यामुळे संध्याकाळ अधिकच समृद्ध झाली. स्मरणिकेच्या प्रकाशनावेळी श्रीकांत मोरे, ज्येष्ठ लेखक संदीप काळे यांची उपस्थिती होती. सांगलीकरांची साहित्य सेवा या शीर्षकाखाली झालेल्या काव्यवाचनात कवींनी सादर केलेल्या कविता, काहींनी स्वरांत गुंफलेली काव्यगायने आणि रसिकांची उत्स्फूर्त दाद यामुळे संपूर्ण वातावरण साहित्यिक भावनांच्या उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचले. सांगलीत जिल्हाधिकारी काकडे-देशमुख यांच्या पुढाकाराने झालेल्या साहित्य मेळाव्यात शहर जिल्ह्यासह राज्यातून अनेक साहित्यिक सहभागी झाले होते. प्रशासनातील अधिकारीही सहभागी झाले होते. साहित्य मेळाव्यात सोलापूरच्या श्रीकांत मोरे यांच्या मनोरमा साहित्य संमेलनाची दखल घेतली गेल्याने सोलापूरकरातून आनंद व्यक्त केला जात आहे. तसेच स्मरणिका प्रकाशनामुळे मनोरमा परिवारातून कौतुक होत आहे.

# निवडणुकीसाठी नियंत्रण व तक्रार कक्ष स्थापन

**सांगोला, दि.१९ जानेवारी -**

सांगोला तालुक्यामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी नियंत्रण व तक्रार कक्ष तहसिल कार्यालय, सांगोला येथे स्थापन करण्यात आले आहे. तरी तक्रारीसाठी दुरध्वनी क्रमांक ०२१८७ - २२०२१८ उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच सांगोला जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक २०२६ साठी अरुण आनंदकर, अपर जिल्हाधिकारी, महाऊर्जा प्रकल्प, पुणे यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे अशी माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली.

# केंद्राच्या विशेष सहाय्य योजनेतून किनवट नगरपरिषदेच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता

## आमदार भीमराव केराम यांच्या पाठपुराव्याला यश

## व्यापारी संकुल, दुकान केंद्र व भाजीपाला मार्केटसाठी कोट्यवधींचा निधी मंजूर

**किनवट प्रतिनिधी दि. १९ जानेवारी-**

केंद्र शासनाच्या ''भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत किनवट नगरपरिषदेच्या विकास आराखड्यातील महत्त्वाच्या विकासकामांना महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. ९ जानेवारी २०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामुळे किनवट शहराच्या नियोजनबद्ध विकासाला मोठा आधार मिळाला असून, ही मान्यता किनवटमाहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित असल्याचे बोलले जात आहे. या निर्णयामध्ये मंजूर विकास आराखडा २००२ तसेच प्रस्तावित विकास आराखडा २०२२ मधील विविध विकासकामांचा समावेश आहे. यामुळे शहरातील बाजारपेठा व व्यापारी सुविधा आधुनिक स्वरूपात विकसित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे किनवट शहरातील व्यापारी व नागरी पायाभूत सुविधा अधिक बळकट होणार असून रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. नियोजनबद्ध बाजारपेठा व व्यापारी संकुले उभारल्याने शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून होणाऱ्या या विकासकामांमुळे किनवटच्या विकास प्रक्रियेला वेग मिळणार असून, शहराचा चेहरामोहरा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



### गुरांचा बाजार, दुकान केंद्र व भाजीपाला मार्केटचा विकास

मंजूर विकास आराखडा २००२ नुसार आरक्षण क्रमांक १२ येथील गुरांचा बाजार तसेच आरक्षण क्रमांक १७ येथील भाजीपाला मार्केट, तर प्रस्तावित विकास आराखडा २०२२ नुसार आरक्षण क्रमांक १२ येथील दुकान केंद्र आणि आरक्षण क्रमांक १५ येथील व्यापारी संकुल व भाजीपाला मार्केट विकसित करण्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या विकासकामांमुळे भाजीपाला विक्रेते, व्यापारी, शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांना नियोजनबद्ध, सुरक्षित व सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार असून, शहरातील अव्यवस्था व वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.या प्रकल्पांसाठी वास्तुविशारद संस्थेमार्फत तयार करण्यात आलेल्या आराखड्यांना सहायक संचालक, नगर रचना विभाग, नांदेड यांची मंजुरी मिळाली होती. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याकडून अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देण्यात आली. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाने प्रशासकीय मान्यता दिल्याने प्रत्यक्ष कामांना आता गती मिळणार आहे.

### किनवटच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

''किनवट शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जरी नगरपरिषद निवडणुकीत जनतेने आम्हाला निवडून दिले नसले, तरीही जनतेसमोर जाहीरनाम्यात दिलेल्या प्रत्येक वचनासाठी आम्ही आजही बांधील आहोत. विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता येऊ देणार नाही. किनवट शहराला आवश्यक असलेल्या मूलभूत व व्यापारी सुविधा उपलब्ध करून देणे हेच आमचे प्राधान्य आहे.''

**- आमदार भीमराव केराम**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### अमेरिकेत भारतीय वंशाच्या जोडप्याला अटक

**व्हर्जिनिया** : अमेरिकेतील व्हर्जिनिया येथील एका मोटेलमध्ये ड्रग्ज आणि सेक्स रॅकेट चालवल्याच्या आरोपाखाली भारतीय वंशाच्या जोडप्यासह अन्य तीन जणांना अटक करण्यात आली. कोषा शर्मा आणि तरुण शर्मा असे या जोडप्याचे नाव असून त्यांनी मोटेलच्या तिसऱ्या मजल्याचा वापर ड्रग्ज विकण्यासाठी आणि सेक्स रॅकेट चालवण्यासाठी केला होता, तर खालच्या मजल्यावर पाहुण्यांना ठेवले जात होते. मोटेल हा रस्त्याच्या कडेला असलेल्या निवासस्थानाचा प्रकार आहे, जो विशेषत: कारने प्रवास करणाऱ्या चालकांसाठी डिझाईन केला आहे. खोलीचे दरवाजे थेट पार्किंग क्षेत्रात उघडतात, ज्यामुळे पाहुणे त्यांच्या वाहनातून बाहेर पडून थेट त्यांच्या खोलीत जाऊ शकतात.

### चिमुकलीसाठी श्वानाशी भिडली आई

**सवाई माधोपूर** : राजस्थानच्या सवाई माधोपूरमध्ये दीड वर्षांच्या चिमुकलीला कडेवर घेऊन जाणाऱ्या महिलेवर कुत्र्याने हल्ला केला. कुत्र्याने आईच्या कुशीत असलेल्या चिमुकलीवर झेप घेतली आणि तिचे कपडे ओढून तिला जमिनीवर पाडले. मुलीला वाचवण्यासाठी महिला कुत्र्याशी भिडली. कुत्र्याने महिलेच्या हाताला चावा घेतला. यावेळी लोकांनी आरडाओरडा केल्यावर कुत्रा पळून गेला. यानंतर आईने चिमुकलीला कडेवर घेतले आणि छातीशी कवटाळून बसली. ही घटना रविवारी संध्याकाळी केशव नगर कॉलनीतील चार रस्त्यावर घडली. सोमवारी घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले.

### उपनिरीक्षकाने महिला पोलिसांच्या शौचालयात लपवला कॅमेरा

**चेन्नई** : तमिळनाडूमध्ये एका विशेष उपनिरीक्षकाने (एसएसआय) महिला पोलिस अधिकाऱ्यांच्या शौचालयात गुप्त कॅमेरा लपवला. ही घटना तेव्हा उघडकीस आली, जेव्हा महिला पोलिसांनी शौचालयात एक मोबाईल फोन पाहिला. तपासात समोर आले की, तो मोबाईल आरोपी एसएसआयचाच होता. तो शौचालयाच्या आत महिला पोलिसांचे व्हिडीओ बनवत होता. ही घटना नुकतीच उघडकीस आली. आश्चर्याची बाब म्हणजे, आरोपीने रामनाथपुरम जिल्ह्यातील परमकुडी येथे ही घटना तेव्हा घडवून आणली, जेव्हा मुख्यमंत्री एम.के. स्टालिन स्वातंत्र्यसैनिक त्यागी इमॅन्युएल सेकरन यांच्या मणि मंडपम्चे उद्घाटन करण्यासाठी तेथे पोहोचले होते.

### मनोज तिवारींच्या घरात चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

**मुंबई** : भोजपुरी स्टार आणि खासदार मनोज तिवारी यांच्या घरात चोरी करणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षांत मनोज तिवारी यांच्या घरात चोरीच्या घटना घडल्या. ज्यात वेगवेगळ्या वेळी एकूण ५.४० लाख रुपयांची चोरी झाली होती. आता आरोपीला अटक करण्यात आली आहे. मनोज तिवारी यांचा मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील शास्त्री नगरमधील सुंदरबन अपार्टमेंटमध्ये फ्लॅट आहे, जिथे ५.४० लाख रुपयांची चोरी झाली आहे.

### प्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन बोरकर यांचे निधन

**मुंबई** : चित्रपटसृष्टीतील नामांकित कला दिग्दर्शक नितीन बोरकर यांचे डी. वाय. पाटील रुग्णालयात निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते ब्रेन स्ट्रोकने आजारी होते. त्यांच्या निधनाने संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी बॉईज ३, ती आणि ती, राजवाडे अॅण्ड सन्स, मी वसंतराव यासारख्या गाजलेल्या चित्रपटांसाठी कला दिग्दर्शक म्हणून काम केले.




### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,४४,६०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,९८,१०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.0 | १७.0 |
| अमरावती | ३२.६ | १५.७ |
| भंडारा | ३०.० | १३.० |
| बुलडाणा | २९.० | १६.४ |
| चंद्रपूर | ३२.२ | १६.० |
| गडचिरोली | ३१.२ | १२.२ |
| गोंदिया | २९.८ | ११.२ |
| नागपूर | ३०.८ | १३.२ |
| वर्धा | ३१.२ | १५.० |
| वाशीम | ३०.४ | १२.६ |
| यवतमाळ | ३१.८ | -.- |

# कुपोषणाची समस्या सोडविण्यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न अपुरे

## मुंबई उच्च न्यायालयाची मेळघाट प्रकरणी नाराजी

**मुंबई, १९ जानेवारी**

राज्यातील आदिवासी पट्ट्यात कुपोषणामुळे होणारे अर्भक आणि गर्भवती महिलांचे मृत्यू रोखण्यासाठी खूप कमी प्रयत्न केल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी राज्य सरकारवर नाराजी व्यक्त केली.

मेळघाटच्या आदिवासी भागात लहान मुले, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांच्या मृत्यूच्या वाढत्या संख्येवर प्रकाश टाकणाऱ्या अनेक याचिकांवर सुनावणी करताना न्या. रवींद्र घुगे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठाने, या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सरकारमध्ये इच्छाशक्ती आणि तळमळ असायला हवी, असे स्पष्ट केले.



कुपोषणामुळे ११५ अर्भक, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांचा मृत्यू झाल्याची माहिती धक्कादायक असल्याचे न्यायालयाने सांगितले. सर्वच मृत्यू कुपोषणामुळे झालेले नाहीत. यातील काही मृत्यू इतर कारणाने झाले आहेत, असे सरकारने दाखल केलेल्या शपथपत्रात म्हटले आहे.

या भागांतील बहुतांश मुलींचे लग्न १३ किंवा १४ वर्षांच्या वयातच होते आणि त्यानंतर त्या लगेचच गर्भवती होतात. काहीवेळा प्रसूती मुदतपूर्व होते. यामुळे वैद्यकीय गुंतागुंत निर्माण होते, असे सरकारी वकील पी. बी. सामंत यांनी सांगितले.

न्यायालयाने सरकारला मूळ कारण शोधून काढण्याचे आणि त्यानंतर त्यावर प्रभावीपणे उपाययोजना करण्याचे आवाहन केले. समस्या अनेक आहेत. त्या समस्यांवर मात करण्याची इच्छाशक्ती आणि जिद्द सरकारमध्ये असायला हवी, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले. (वृत्तसंस्था)

### विशेष उपाययोजनांची गरज

सरकारला विशेष उपाययोजना कराव्या लागतील आणि ज्यांना त्याची सर्वाधिक गरज आहे, त्यांना मूलभूत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील, असेही न्यायालयाने नमूद केले. या मुद्यावर अत्यंत अपुरे प्रयत्न केले जात आहेत. मागील दोन-तीन दशकांपासून सामान्य कारणांमुळे असे मृत्यू होत असल्याचे दिसून येत आहे. असे मृत्यू पुन्हा होणार नाहीत, याची खात्री करण्यासाठी सरकारने शून्य सहनशीलतेचा दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे, असे उच्च न्यायालयाने म्हटले.



शत्रूच्या मनात नुसत्या नावाने धडकी भरविणारी भारतीय सैन्य दलातील 'भैरव' या बटालियनच्या जवानांनी प्रजासत्ताक दिनाची रंगीत तालिम केली

# मुलाने केली जन्मदात्याची निर्घृण हत्या

## सुरायपल्ली येथे थरार

**सिरोंचा, १९ जानेवारी**

सिरोंचा तालुक्यातील सुरायपल्ली (आदीमुत्तापुर) येथे मुलाने जन्मदात्याचा खून केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. कौटुंबिक वादातून ही हत्या झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या घटनेत मोंडी मल्लय्या अक्कुदारी रा. आदीमुत्तापुर असे मृतकाचे नाव आहे. आरोपी त्यांचा मुलगा सनमुखराव मोंडी अक्कुदारी यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

वडील मोंडी मल्लय्या अक्कुदारी हे नेहमीच घरात भांडण करीत होते. या कारणावरून आरोपी मुलगा संतापला आणि वडिलांच्या कपाळावर तसेच डोळ्याच्या डाव्या बाजूला जोरदार वार केला. या हल्ल्यात मोंडी मल्लय्या अक्कुदारी हे गंभीर जखमी होऊन जागेवरच कोसळले. कुटुंबीय व ग्रामस्थांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र गंभीर जखमांमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सिरोंचा पोलिस ठाण्याचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी पोलिस स्टेशन सिरोंचा येथे गुन्हा दाखल करण्यात आला. फरार आरोपी मुलाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृतदेहाचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक नरेंद्र वंगाटे करीत आहेत. (तभा वृत्तसेवा)

# विदेशी गुंतवणूकीसाठी महाराष्ट्र भारताचे गेट वे : फडणवीस

## राज्याच्या सर्व भागासाठी, वैविध्यपूर्ण क्षेत्रात, गुंतवणूक येणार

**इयुरिक, १९ जानेवारी**

'महाराष्ट्र विश्वासार्ह आहे. आम्ही जे सांगतो. ते करतो. त्यामुळेच जगभरातील उद्योजक, गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास वाढला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत वाटचालीसाठी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. एक ईकोसिस्टिम तयार केली आहे. त्याआधारे यंदाही महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह



प्रतिनिधीमंडळासमवेत दावोस येथे दाखल झाले आहेत. या दरम्यान त्यांनी आज महाराष्ट्र पॅव्हेलीयन मध्ये माध्यमांशी संवाद साधला.

महाराष्ट्रातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी गुंतवणूक मिळवणार असून. त्यासाठी वैविध्यपूर्ण अशा दहा ते बारा क्षेत्रातील उद्योगांशी समन्वय साधला जात आहे. आता तिसरी मुंबई उभी राहते आहे. तिच्यासाठी मोठी गुंतवणूक मिळण्याचे संकेत आहेत. आमच्याकडे उत्तम मेन्यू कार्ड आहे . त्यामुळे गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात यशस्वी होऊ, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

**महाराष्ट्र २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनणार**


गेल्या दशकात महाराष्ट्राने सरासरी १० टक्क्यांहून अधिक विकासदर कायम राखला असून, राज्य २०३२ पर्यंत देशातील पहिले ट्रिलियन डॉलर्सची असणारी अर्थव्यवस्था बनू शकते. मात्र, हा टप्पा आणखी वेगाने २०३० पर्यंत गाठण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, सध्याची जागतिक भू-राजकीय परिस्थिती आव्हानात्मक असली, तरी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अंदाजानुसार भारत हा अर्थव्यवस्थेतील ब्राइट स्पॉट आहे. (वृत्तसंस्था)

### देशातील ३९ टक्के थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात

गेल्या वर्षी भारतात आलेल्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी ३९ टक्के ङ्कएफडीआयङ्क महाराष्ट्रात आला आहे. त्यामुळे गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्य शासनाने आतापर्यंत १५ ते १६ धोरणे लागू केली असून, या धोरणांमुळे गुंतवणूकदारांसाठी सक्षम आणि विश्वासार्ह इकोसिस्टीम तयार झाली आहे. आज महाराष्ट्रात गुंतवणुकीची कमतरता नाही; गरज आहे ती योग्य वातावरण निर्माण करण्याची, आणि ते वातावरण महाराष्ट्रात तयार झाले आहे, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

# माहिती न देणे अधिकाऱ्याला भोवले

## राज्य माहिती आयोगाने ठोठावला दंड




**गोंदिया, १९ जानेवारी**

माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहिती ठरावीक कालावधीत न दिल्याप्रकरणी राज्य माहिती आयोगाने तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी ओ. एन. तुरकर यांना दोषी ठरवित २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

एकोडी येथील रहिवासी नामदेव बिसेन यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजात झालेल्या संभाव्य भ्रष्टाचाराबाबत माहिती मिळावी यासाठी ४ फेब्रुवारी २०२२ रोजी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज दाखल केला होता. मात्र, या कायद्यानुसार निर्धारित मुदतीत माहिती देण्यात आली नाही. यानंतर बिसेन यांनी प्रथम व द्वितीय अपील दाखल केले. तरीही माहिती न मिळाल्याने अखेर २० एप्रिल २०२२ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाद मागितली. राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाने प्रकरणाची चौकशी करून ९ डिसेंबर २०२५ ला दिलेल्या आदेशात माहिती न देण्याचा ठपका ठेवत संबंधित अधिकाऱ्याला दोषी ठरवित २५ हजारांचा दंड ठोठावला. या दंडाची रक्कम संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी वसूल करून शासकीय कोषात जमा करावा, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. (तभा वृत्तसेवा)

# 'किडनी रॅकेट'चे लोण कंबोडियासह इराणपर्यंत!

## त्रिचीत शस्त्रक्रिया झालेले आणखी तीन पीडित सापडले

**चंद्रपूर, १९ जानेवारी**

नागभीड येथील मिंथूर या लहानशा गावातील शेतकरी रोशन कुळे यांच्यापासून सुरू झालेले किडनी विक्री प्रकरणाचे जाळे आता अवघ्या जगात पसरले असल्याचे पुढे येत आहे. आधी कंबोडियात काही पीडितांची शस्त्रक्रिया करून किडनी काढल्याचे 'एसआयटी'च्या तपासात पुढे आले. तर आता इराणमध्येही किडनी काढून विकल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, तामिळनाडू येथील त्रिचीच्या स्टॉर किम्स रूग्णालयात किडनी काढलेले तीन आणखी पीडित सापडले असून, त्यांचे बयाण 'एसआयटी'ने नोंदवले आहे.

पीडित रोशन कुळे यांनी केलेल्या तक्रारीनंतर किडनी रॅकेटचा मुख्य दलाल रामकृष्ण सुंचू ऊर्फ 'डॉ. कृष्णा' यास सोलापुरातून अटक करण्यात आली होती. त्याच्या चौकशीतून मोहालीतील आरोपी हिमांशू भारद्वाज यास ताब्यात घेण्यात आले. हिमांशूची किडनी त्रिची येथील स्टॉर किम्स रुग्णालयात काढल्याचे निष्पन्न झाल्यानंतर 'एसआयटी'कडून आणखी काही पीडितांचा शोध सुरू झाला. त्यानंतर उत्तर प्रदेशातील तारिकचीही किडनी त्रिचीत काढल्याचे स्पष्ट झाले. याच रुग्णालयात आता पुन्हा उत्तर भारतातील तिघांची किडनी काढल्याचे चौकशीत समोर आले



आहे. त्याचीही विलक्षण कहाणी आहे जी लवकरच पुढे येईल, अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

काही दिवसांपूर्वीच 'एसआयटी'ने या तिघांचेही बयाण नोंदविले आहे. त्यामुळे आता त्रिचीत शस्त्रक्रिया झालेले पाच पीडित संपर्कात असून, त्यांच्या माध्यमातून अनेक पुरावे पोलिसांच्या हाती लागले आहेत. त्यामुळे दिल्लीतील डॉ. रवींद्रपाल सिंग आणि तामिळनाडूतील डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

शिवाय किडनी घेणाऱ्यांच्याही शोधात पोलिस असताना कर्नाटक राज्यातील बंगळुरूमधील एकाची माहिती पुढे आली होती. त्याच्या शोधात पोलिसांचे पथक असताना दोन महिन्यांपूर्वीच त्या 'रिसीव्हर'चा मृत्यू झाल्याचीही माहिती समोर आली. आता त्याच्या कुटुंबातील सदस्यांकडूनही याबाबत कोणतीही माहिती दिली जात नसल्याने पोलिस सूत्रांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### डॉ. गोविंदस्वामीचा ५ फेब्रुवारीपर्यंत 'ट्रांझिट रिमांड'

'एसआयटी'ला या प्रकरणातील आरोपी डॉ. रवींद्रपाल सिंग आणि डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी अद्याप गवसले नसून, त्यांचा शोध सुरू आहे. मात्र, डॉ. गोविंदस्वामीने तामिळनाडूतील उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला असता, त्यास 'ट्रांझिट रिमांड' दिला गेला असून, येत्या ५ फेब्रुवारीपर्यंत चंद्रपूरच्या जिल्हा न्यायालयात हजर होण्याचा आदेश देण्यात आला आहे. त्यामुळे या कालावधीत स्टॉर किम्स रुग्णालयाचा संचालक डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी चंद्रपूरच्या न्यायालयात हजर होण्याची शक्यता आहे.

# भूकंपाने हादरली दिल्ली

**नवी दिल्ली, १९ जानेवारी**

दिल्लीमध्ये सोमवारी सकाळी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी ८ वाजून ४४ मिनिटांनी दिल्लीमध्ये भूकंप आला. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर २.८ इतकी नोंदविण्यात आली. भूकंपाचे केंद्र उत्तर दिल्ली परिसरात असून ते जमिनीखाली सुमारे पाच किलोमीटर खोलीवर होते.

भूकंपाची तीव्रता कमी असल्याने मोठ्या स्वरूपाचे धक्के जाणवले नसले, तरी काही भागांत लोकांना हलकी कंपने जाणवल्याचे सांगण्यात येत आहे. या भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनी घाबरून न जाता सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)



पश्चिम बंगालमध्ये मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. कागदपत्रे जमा करण्यासाठी बिरभूम जिल्ह्यातील एका केंद्रावर नागरिकांची लागलेली रांग

# 'आयएमएफ'ने वाढवला आर्थिक विकासाच्या गतीचा अंदाज

**नवी दिल्ली, १९ जानेवारी**

अर्थव्यवस्थेच्या अपेक्षेपेक्षा चांगल्या कामगिरीमुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) सोमवारी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी भारताच्या वाढीचा अंदाज ऑक्टोबरमधील अंदाजापेक्षा ०.७ टक्के गुणांनी वाढवून ७.३ टक्के केला आहे. १ एप्रिलस २०२६ पासून सुरू होणाऱ्या २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या वाढीचा अंदाजही ६.२ टक्क्यांवरून सुधारून ६.४ टक्के केला आहे. भारतामध्ये २०२५साठीचा अंदाज ०.७ टक्के गुणांनी वाढवून ७.३ टक्के करण्यात आला. जो वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीतील अपेक्षेपेक्षा चांगल्या कामगिरीचे आणि चौथ्या तिमाहीतील मजबूत गतीचे प्रतिबिंब आहे, असे आयएमएफने म्हटले आहे. चक्रीय आणि तात्पुरते घटक कमी झाल्यामुळे २०२६-२७ आणि २०२७-२८ मध्ये वाढीचा दर ६.४ टक्क्यांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. जुल-सप्टेंबर या तिमाहीतील ८.२ टक्के मजबूत वाढीमुळे २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या एप्रिल-सप्टेंबर या कालावधीत सकल देशांतर्गत उत्पादनाने ८ टक्के वाढीचा दर नोंदवला. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जारी केलेल्या पहिल्या आगाऊ अंदाजानुसार, चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था ७.४ टक्के दराने वाढण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

# बंगालमध्ये आता निवडणुकीत 'धर्मयुद्ध'

## बाबरी मशिदीनंतर उभारणार भव्य राम मंदिर

**कोलकाता, १९ जानेवारी**

पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीच्या तोंडावर मंदिर-मशीद मुद्याचा वापर करून राज्याचे ध्रुवीकरण करण्याचे प्रयत्न तीव्र झाले आहेत. गेल्या महिन्यात, तृणमूल काँग्रेसचे निलंबित आमदार हुमायून कबीर यांनी ६ डिसेंबर रोजी मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बेलडांगा येथे बाबरी मशिदीची पायाभरणी केली. त्यानंतर, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी स्वत: दुर्गा अंगण आणि महाकाल मंदिरांची पायाभरणी केली. आता, नादिया जिल्ह्यातील शांतीपूर येथे 'बंगाली राम' संकल्पनेवर आधारित भव्य राम मंदिर बांधण्याची योजना उदयास आली आहे.

हे मंदिर केवळ पूजास्थळच नाही तर बंगालच्या सांस्कृतिक वारशाला समर्पित एक प्रमुख केंद्र देखील असेल. मंदिराची संकल्पना १५ व्या शतकातील प्रसिद्ध कवी कृतिबास ओझा यांच्या परंपरेवर आधारित आहे. कृतिबास ओझा यांनी संस्कृत रामायणाचा बंगाली अनुवाद 'श्री राम पांचाली' लिहिला, जो आजही बंगालमधील प्रत्येक घरात वाचला जातो. या कारणास्तव, भगवान रामाच्या या रूपाला बंगाली राम किंवा हर राम असे म्हणतात.

श्री कृतिबास राम मंदिर ट्रस्ट हे मंदिर बांधत आहे. ट्रस्ट २०१७ पासून या प्रकल्पावर काम करत आहे. काही दिवसांपूर्वी ट्रस्टने मंदिरासाठीच्या



जमिनीचे अंतिम सर्वेक्षण पूर्ण झाल्याची घोषणा केली. हा प्रकल्पाचा औपचारिक शुभारंभ मानला जात आहे. ट्रस्टचे अध्यक्ष अरिंदम भट्टाचार्य आहेत. ते शांतीपूरचे माजी तृणमूल आमदार आहेत आणि आता भाजपामध्ये आहेत. अर्थात, ते आग्रही आहेत की हा निवडणूक प्रकल्प नाही.

त्यांनी स्पष्ट केले की शांतीपूर ही श्रद्धेची भूमी होती आणि कृतिबास ओझा यांनी रामाला बंगाली संस्कृतीशी जोडले. हा वारसा पुढे नेण्यासाठी, येथे एक भव्य राम मंदिर बांधण्याची योजना आखण्यात आली आहे आणि बांधकाम प्रारंभिक अवस्थेत आहे. (वृत्तसंस्था)

### मंदिरासाठी जमिनीचे दान

मंदिरासाठी १५ बिघा जमीन स्थानिक रहिवासी लिटन भट्टाचार्य आणि पूजा बॅनर्जी यांनी दान केली आहे. अंदाजे १ अब्ज रुपये खर्चाचा हा प्रकल्प २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. अहवालात म्हटले आहे की, मंदिर संकुलात केवळ एक मंदिरच नाही तर एक सांस्कृतिक केंद्र, एक वैद्यकीय महाविद्यालय, एक अभियांत्रिकी महाविद्यालय आणि एक संशोधन केंद्र देखील असेल. नेपाळच्या प्रसिद्ध पशुपतिनाथ मंदिराशी संबंधित वैदिक विद्वान अर्जुन दस्तुला यांची मंदिराचे संरक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# 'देवा'स आठवावे

जवळपास तीन आठवड्यांपूर्वी एका पत्रकार परिषदेत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना यांचा संयुक्त वचननामा जाहीर करताना घडलेला एक किस्सा वारंवार आठवावा अशा सुसंगत घटनांचा क्रम त्यानंतर सुरू झाला. राज आणि उद्धव ठाकरे हे पुरोगामी पक्षांच्या वळचणीस जाण्यासाठी प्रयत्न करत असले तरी त्यांची मूळ मानसिकता सश्रद्ध अशीच आहे यात शंका नाही. कधी त्यांनी, राजकीय हितसंबंध जपण्यासाठी व मतांच्या अपेक्षेने हिंदुत्वाचा मुद्दा खुंटीवर ठेवण्याचीही तयारी केली, त्या अपेक्षेसाठी ते देवदेवतांबाबतच्या हिंदूंच्या भावनांवर प्रहार करतही असतात, पण कसोटीच्या क्षणी त्यांनाही देवाचीच आठवण होते, हा केवळ योगायोग नाही. म्हणूनच, त्या पत्रकार परिषदेत जेव्हा भाजपाचे नेते रावसाहेब दानवे यांच्या एका आरोपाचा उल्लेख करून पत्रकारांनी ठाकरे बंधूंना प्रश्न विचारला, तेव्हा उद्धव ठाकरे यांनी केवळ दानवे यांची खिल्ली उडवून प्रश्न टोलविण्याचा प्रयत्न केला. पुढे दानवे यांनी त्याचा चांगलाच समाचार घेतला ही बाब निराळी, पण त्या प्रश्नावरील उद्धव ठाकरे यांच्या उत्तरानंतर माईक हातात घेऊन राज ठाकरे यांनी व्यक्त केलेले स्वतःचे मत मात्र, खूप काही बोलके ठरले. 'कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देवाला द्यावीत, दानवाला नव्हे', असे ते म्हणाले, तेव्हा त्यावर पत्रकारांमध्ये तात्पुरती खसखस पिकली, पण राज ठाकरे कोणत्या देवाला उत्तर देऊ इच्छितात, याचीही चर्चा सुरू झाली. त्याच दरम्यान शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत आणि सिनेनिर्माते महेश मांजरेकर यांनी घेतलेल्या राज व उद्धव ठाकरे यांच्या मुलाखतीतही राज ठाकरे यांना पडलेला प्रश्नदेखील पुढील घटनांचा संकेत देणारा ठरला. त्या मुलाखतीत एका प्रसंगापुरते व्यथित झालेले राज ठाकरे यांच्या मनात त्या वेळी देवाच्या अस्तित्वाविषयी संभ्रम निर्माण झाला होता. सध्याचे राजकारण पाहता देवाचे अस्तित्व आहे असे वाटत नाही, असे काही मत त्यांनी व्यक्त केले. या दोघा भावांच्या मनात उद्भवणाऱ्या देवाच्या अस्तित्वाविषयीच्या शंका त्या त्या प्रसंगानुरूप उफाळून येतात, असे समोर येणाऱ्या परिस्थितीनुसार दिसते. कारण, त्याआधीही काही वेळा असेच घडले होते. भाजपासोबतची दीर्घकाळापासून युती सोडून काडीमोड घेतल्यानंतर महाविकास आघाडीत सामील होताना उद्धव ठाकरेंनी 'शेंडी जानव्याचे हिंदुत्व' म्हणत हिंदूंच्या भावनांची खिल्ली उडविली तेव्हा कदाचित त्यांना हिंदूंच्या भावविश्वात देवाच्या अस्तित्वाचे महत्त्व किती आहे याचा तात्पुरता विसर पडलादेखील असेल, पण पुढे मुख्यमंत्रिपदाच्या काळात कोविडचा कहर माजल्यावर एका क्षणी मनात निर्माण झालेल्या हतबलतेच्या भावनेतून त्यांनाही देवाचीच आठवण झाली होती. महामारीचा कहर आणि आसपास माजलेले मृत्युभयाचे थैमान पाहून व्यथित झालेल्या उद्धव ठाकरे यांनी, 'आता आपापल्या देवाचा धावा करा' असा अगतिक सल्ला जनतेला दिला होता, हे अनेकांस आठवतही आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांचा देवावर विश्वास आहे हे वेळोवेळी दिसूनही आले आहे. त्यांचा परिवारही देवावरच विश्वास ठेवतो, हेदेखील अनेकदा स्पष्ट झाले आहे. कुरुक्षेत्रावरील महायुद्धाच्या प्रसंगी रणांगणावर समोर उभ्या असलेल्या आप्तांना पाहून संभ्रमित झालेल्या अर्जुनाच्या त्या वेळच्या मानसिक अवस्थेची आठवण यावी, असाच संभ्रम देवाच्या अस्तित्वाविषयी राज ठाकरेंच्या मनात माजला असावा. देवदेवता आहेत की नाही असा प्रश्नदेखील राज ठाकरे यांना त्याच व्यथित मनःस्थितीतून पडला असावा. पण ज्यांची देवावर श्रद्धा असते, त्यांना अशा संभ्रमातून बाहेर काढण्याचे कामदेखील देवालाच करावे लागते. राज ठाकरे यांना देवाच्या अस्तित्वासंदर्भात शंका निर्माण होत होती, तेव्हाच त्यांच्या पत्नी मात्र, हातात जपमाळ घेऊन त्यांच्या पक्षाच्या उमेदवारासाठी मते मागत होत्या, याची नोंद जनतेने घेतली होती.

त्या मुलाखतीत राज ठाकरे यांना आणखी एक प्रश्न पडला होता. देवाचे अस्तित्व असेलच तर सध्याच्या राजकारणात तो गप्प राहून बघत का बसला आहे, असा प्रश्न त्यांनी विचारला होता. पण भक्तांसोबत वागण्याची देवाची रीत वेगळीच असते. भक्तांना पाहिजे तेव्हा देवाचा प्रतिसाद मिळत नसतो, तर देवाच्या मनात असेल तेव्हाच भक्ताला त्याच्या प्रश्नांची उत्तरे मिळून जातात, यावर सश्रद्ध हिंदूंचा विश्वास असतो. देवाच्या अस्तित्वाविषयी शंका व्यक्त करणारी ती मुलाखत पूर्ण झाल्यानंतर काही काळातच राज व उद्धव ठाकरे आपल्या परिवारासह देवाच्या दर्शनासाठी बाहेर पडले, तेव्हा त्यांच्या मनातील देवाविषयीच्या शंका संपल्या असाव्यात याची खात्री समाजमाध्यमावरील अनेकांस पटली. हा प्रश्न विचारून राज आणि उद्धव ठाकरे यांनी कुटुंबीयांसह मुंबादेवीचे दर्शन घेतल्याची छायाचित्रे आणि बातम्या झपाट्याने माध्यमांत झळकल्या आणि देवाचे दर्शन घेणे हा हिंदू परंपरेचाच एक भाग असल्याच्या जाणिवेने सश्रद्ध समाजात समाधान पसरले. राज ठाकरे यांचा देवावर विश्वासच आहे याची खात्री देणारे अनेक प्रसंग याआधी घडले आहेत. तीन वर्षांपूर्वी, फेब्रुवारी २०२३ मध्ये पनवेल येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राजभाषा संमेलनातील एका मुलाखतीत, देवाच्या अस्तित्वाविषयी राज ठाकरे यांनी विश्वास व्यक्त केला होता. 'आपल्याकडची शहरे एवढी बकाल झाली असूनही त्यांचा कारभार सुरळीत सुरू आहे हे पाहिले की देवाच्या अस्तित्वाची खात्री पटते', असे उद्गार त्या मुलाखतीत राज ठाकरे यांनीच काढले होते.

तसे पाहिले, तर ठाकरे बंधूंचा देवावर विश्वास आहे किंवा नाही हा प्रश्न सामाजिक चर्चेचा व्हावा एवढा काही महत्त्वाचा नाही. ज्यांच्या मनात मुळातच या प्रश्नाविषयीचा संभ्रम आहे, उत्तरांच्या शोधात जे स्वतःच चाचपडत आहेत, जे स्वतःच कधी देवावर विश्वास ठेवून काम करतात आणि कधी देवाच्या अस्तित्वावरच शंका उपस्थित करतात, त्यांच्या संभ्रमित मनाचे नेमके उत्तर शोधणे अन्य कोणासही अवघडच असते. सोयीनुसार देवावर विश्वास किंवा अविश्वास दाखविणे ही राजकारणातील अपरिहार्यतादेखील असावी. म्हणूनच, हिंदूंच्या श्रद्धेचा विषय असलेल्या एखाद्या पवित्र दिवशी आग्रहाने मांसाहार करणे, मांसाहार केल्याचे कारण देत मंदिरात जाण्याची टाळाटाळ करणे अशा तात्कालिक कृतींमधून जाणीवपूर्वक प्रसिद्धी मिळविणारे अन्य काही राजकीय नेतेदेखील पाहावयास मिळतात. जनतेच्या भावनांचा लाभ घेण्याच्या राजकीय फायद्यातोट्यांची गणिते आखून, त्या त्या वेळी काही भूमिका घेणाऱ्यांच्या मनात येणारे प्रश्न हा मुळात त्यांचा संभ्रम नसतो, तर समाजास संभ्रमित करण्याचा प्रयत्न असतो. जेव्हा जी भूमिका सोयीची वाटते, तेव्हा ती घेऊन समाजाच्या भावनांवर स्वार होण्याच्या राजकारणाचा तो भाग असतो. म्हणूनच मांसाहाराचे समर्थन करणाऱ्यांनाही, त्या वेळेची गरज पाहून त्यानुसार आपल्या आस्तिकतेची खात्री पटवून देण्याकरितादेखील आटापिटा करावा लागतो. देवाच्या मनात काय आहे हे ओळखता येत नाही ही सश्रद्ध समाजाने मान्य केलेली समजूत आहे. त्यास कोणी अंधश्रद्धा म्हणतात, तर कोणास हीच खरी श्रद्धा आहे असे वाटते.

आता महापालिका निवडणुकांचे निकाल स्पष्ट झाले आहेत. महापौर निवडीबाबत राजकीय पक्ष आपापली राजकीय समीकरणे आखू लागले आहेत. उभ्या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या आणि सर्वांत मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मतदारांनी धूर्तपणाने कौल दिलेला असल्याने, महापौर निवडीच्या प्रक्रियेत राजकीय पक्षांची कसोटी सुरू झाली आहे. अशा कोणत्याही कसोटीच्या क्षणी देवाची आठवण व्हावी हादेखील सश्रद्धतेचाच पुरावा असतो. साहजिकच, उद्धव ठाकरे यांनाही देवाची आठवण झाली आहे. 'देवाच्या मनात असेल तर' असे म्हणत त्यांनी आपली राजकीय इच्छा उघड केल्याने, आता देवाकडून काय कौल दिला जातो, हे पाहण्यासाठी जनता उत्सुक झाली आहे. त्यांची ही इच्छा देवापर्यंत पोहोचलेली असावी, असे त्यानंतरच्या काही घडामोडींतून दिसू लागले आहे. मात्र, देवाच्या मनात काय आहे, हे कोणालाच कळत नाही आणि देवाच्या मनात काही असेलच, तर तेथे कोणाचेच काही चालतही नाही. ही मात्र अंधश्रद्धा नाही!

## आंतरराष्ट्रीय

# अमेरिका-क्युबात शत्रुत्व का?

**प्रा. जयसिंग यादव**

व्हेनेझुएलामध्ये लष्करी कारवाई केल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प शांत बसलेले नाहीत. त्यांचे जगातील अनेक देशांकडे लक्ष असले, तरी दक्षिण अमेरिकेतील क्युबा त्यांच्या डोळ्यात जास्त सलतो आहे. क्युबासारख्या छोट्या देशाने अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला झुंजवत ठेवले आहे. रशिया आणि चीनशी क्युबाचा वाढत चाललेला दोस्ताना अमेरिकेला खुपतो आहे. त्यामुळे व्हेनेझुएलानंतर अमेरिकेने क्युबाकडे आपली वक्रदृष्टी वळवली आहे. इराण आणि ग्रीनलॅण्डनंतर अमेरिका क्युबाविरोधात मोहीम उघडू शकते. ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर लिहिले की, अनेक वर्षांपासून व्हेनेझुएलाकडून मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या तेल आणि पैशांवर क्युबा अवलंबून होता. त्या बदल्यात क्युबाने व्हेनेझुएलाच्या शेवटच्या दोन हुकूमशहांना 'सुरक्षा सेवा' पुरवल्या; पण आता नाही. गेल्या आठवड्यात व्हेनेझुएलावर अमेरिकेच्या हल्ल्यादरम्यान, तेथे उपस्थित असलेले बहुतेक क्युबन लोक मारले गेले. व्हेनेझुएलाला आता इतके वर्षे ओलिस ठेवणाऱ्या गुंड आणि खंडणीखोरांपासून संरक्षणाची गरज नाही, असे नमूद करून ट्रम्प यांनी लिहिले की, व्हेनेझुएलाकडे आता जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्य असलेल्या अमेरिकेकडे त्यांचे संरक्षण आहे. क्युबाला आता तेल किंवा पैसा पाठवला जाणार नाही. मी सुचवतो की त्यांनी खूप उशीर होण्यापूर्वी करार करावा. अमेरिका भारतासह अन्य देशांवर व्यापारी करार करण्यासाठी कसा दबाव आणते, याचे हे ज्वलंत उदाहरण.

पश्चिम गोलार्धातील देशांकडे अमेरिकेचे नेहमीच लक्ष राहिले आहे. या देशांमध्ये आणखी कोणताही हस्तक्षेप होऊ नये, असे अमेरिका इच्छिते. तथापि, रशिया आणि चीनशी क्युबाचे चांगले संबंध अमेरिकेला मान्य नाहीत. ट्रम्प रशियाला मोठा धोका मानत नाहीत. सध्या ते चीनला मोठा धोका मानतात. त्यांना पश्चिम गोलार्धातील चीनचा प्रभाव संपवायचा आहे. ट्रम्प हे क्युबाबाबत कठोर भूमिका घेणारे एकमेव अमेरिकन अध्यक्ष नाहीत. क्युबा आणि अमेरिकेतील स्पर्धा अनेक दशकांपासून सुरू आहे. १८९८ मध्ये अमेरिकेने स्पेनचा पराभव केला. त्यानंतर स्पेनने क्युबावरील सर्व दावे सोडून दिले आणि ते अमेरिकेने सुरू केले. १९०२ मध्ये क्युबाला स्वातंत्र्य मिळाले आणि टॉमस एस्ट्राडा पाल्मा त्याचे पहिले अध्यक्ष झाले; परंतु प्लॅट सुधारणांमुळे हा देश अमेरिकेच्या संरक्षणाखाली राहिला. त्यामुळे अमेरिकेला क्युबाच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार मिळाला. काही वर्षांनंतर एस्ट्राडा यांनी राजीनामा दिला आणि जोसे मिगुएल गोमेझ यांच्या नेतृत्वाखाली बंड झाल्यानंतर अमेरिकेने क्युबा ताब्यात घेतला. अमेरिकेच्या देखरेखीखाली क्युबामध्ये १९०९ मध्ये निवडणुका झाल्या आणि जोसे मिगुएल गोमेझ अध्यक्ष झाले; परंतु लवकरच भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये अडकले. १९१२ मध्ये वांशिक भेदभावाविरुद्ध कृष्णवर्णीय निदर्शने दडपण्यासाठी अमेरिकन सैन्य क्युबाला परतले. १९३३ मध्ये क्युबन लष्करी अधिकारी फुलगेन्सियो बतिस्ता यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडाने जेरार्डो मचाडो यांना उलथवून टाकले.

१९५३ मध्ये फिडेल कॅस्ट्रो यांनी बतिस्ता राजवटीविरुद्ध अयशस्वी बंड केले. 'कौन्सिल ऑफ फॉरेन रिलेशन्स' (सीएफआर) च्या अहवालात म्हटले आहे की अमेरिका आणि क्युबामधील शत्रुत्वाचा खोल पाया १९५९ मध्ये घातला गेला, जेव्हा फिडेल कॅस्ट्रो यांनी क्युबामधील अमेरिकासमर्थित सरकार उलथून टाकले. सुरुवातीला अमेरिकेने नवीन सरकार स्वीकारले; परंतु क्युबाने अमेरिकेचा कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या सोव्हिएत रशियाशी जवळचे संबंध निर्माण करण्यास सुरुवात करत व्यापार सुरू केला, तेव्हा अमेरिका संतप्त झाली. क्युबाने अमेरिकन कंपन्यांची मालमत्ता जप्त केली आणि अमेरिकन वस्तूंवर जास्त कर लादले. कॅस्ट्रोंच्या आगमनानंतर क्युबामध्ये समाजवादाची लाट आली, तर अमेरिका भांडवलशाही धोरणाचा अवलंब करत होती. क्युबा चीनशी चांगले संबंध विकसित करू शकेल, अशी शक्यताही होती, म्हणूनच अमेरिकेने क्युबाविरुद्ध कठोर भूमिका स्वीकारली. अमेरिकेने क्युबाला आर्थिकदृष्ट्या शिक्षा करण्यास सुरुवात केली. क्युबाकडून साखर खरेदी कमी केल्यानंतर अमेरिकेने क्युबाला जवळजवळ सर्व वस्तू पाठवणे बंद केले. अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी याचे रूपांतर 'संपूर्ण आर्थिक निर्बंध'मध्ये केले आणि कठोर प्रवास निर्बंध लादले. १९६१ मध्ये अमेरिकेने क्युबामध्ये फिडेल कॅस्ट्रोंचे सरकार उलथवून टाकण्यासाठी लष्करी कारवाई सुरू केली. तथापि, ही कारवाई अयशस्वी झाली.

'बे ऑफ पिग्ज आक्रमण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या घटनेत अमेरिकेने क्युबन बंडखोर आणि निर्वासितांविरुद्ध बळाचा वापर केला होता. त्यांनी आधीच पकडलेल्यांना लष्करी प्रशिक्षण आणि निधी पुरवला. क्युबन सरकार उलथवून टाकण्यासाठी हल्ला करण्यात आला; परंतु स्थानिक लोकसंख्येच्या पाठिंब्याअभावी अमेरिका आणि क्युबन बंडखोर अयशस्वी झाले. अमेरिकेचे हवाई समर्थन उपलब्ध नसल्याने क्युबाने अवघ्या तीन दिवसांमध्ये बंड चिरडून टाकले. त्या वेळी केनेडी यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका सत्तेत होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेची प्रतिमा खराब झाली. यानंतर क्युबाने सोव्हिएत महासंघाला त्याच्या भूभागावर गुप्तपणे अणु क्षेपणास्त्रे बसवण्याची परवानगी दिली. ऑक्टोबर १९६२ मध्ये अमेरिकन विमानांनी ही क्षेपणास्त्रे पाहिली. त्यानंतर अमेरिका आणि सोव्हिएत महासंघातील तणाव १३ दिवस टिकून राहिला. परिस्थिती अणुयुद्धाच्या जवळ आली होती. शेवटी, सोव्हिएत नेते निकिता ख्रुश्चेव्ह क्षेपणास्त्रे काढून टाकण्यास सहमत झाले. त्या बदल्यात, केनेडीने क्युबावर हल्ला न करण्याचे आणि तुर्कीमधून अमेरिकन क्षेपणास्त्रे काढून टाकण्याचे आश्वासन दिले. तथापि, दोन्ही देशांमधील तणाव कमी झाला नाही. पुढील काही दशकांपर्यंत अमेरिकेने क्युबाला आर्थिक आणि राजनैतिकदृष्ट्या वेगळे केले. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी १९८२ मध्ये क्युबाला 'दहशतवाद्यांना पाठिंबा देणारा' देश म्हणून घोषित केले. नंतर जॉर्ज बुश आणि बिल क्लिंटन यांनी हेल्म्स-बर्टन कायदा लागू केला.

बराक ओबामा यांच्या कार्यकाळात क्युबाशी अमेरिकेचे संबंध सुधारले. 'सीएफआर'च्या अहवालानुसार २००८ च्या निवडणुकीदरम्यान ओबामा म्हणाले की, क्युबाला वेगळे केल्याने काहीही चांगले झाले नाही. २०१४ मध्ये एका घटनेने संपूर्ण जगाला धक्का बसला. ओबामा आणि क्युबाचे नेते राऊल कॅस्ट्रो यांनी अचानक घोषणा केली की दोन्ही देश राजनैतिक संबंध पुन्हा स्थापित करतील. त्यानंतर क्युबाला 'दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या' देशांच्या यादीतून काढून टाकण्यात आले. २०१६ मध्ये ओबामा यांनी वैयक्तिकरीत्या क्युबाला भेट दिली. १९२८ नंतर अमेरिकेच्या अध्यक्षांचा क्युबाचा हा पहिलाच दौरा होता. २०१९ मध्ये ट्रम्प यांनी पुन्हा क्युबाला 'दहशतवाद्यांना पाठिंबा देणारा देश' घोषित केले. अमेरिकेने क्युबाची राजधानी हवाना येथून आपल्या दूतावासातील बहुतेक कर्मचाऱ्यांना माघारी बोलावले. बायडेन यांच्या काळात काही नियम शिथिल करण्यात आले. त्यानंतर २०२१ मध्ये अन्न, औषध आणि विजेच्या कमतरतेमुळे त्रस्त असलेल्या क्युबन लोकांनी निषेध करण्यास सुरुवात केली. सरकारने निदर्शकांना अटक केली आणि इंटरनेट बंद केले. बायडेन प्रशासनाने क्युबावर नवीन निर्बंध लादले. क्युबातील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत गेली. लोक मोठ्या संख्येने अमेरिकेत पळून जाऊ लागले. व्हेनेझुएलाच्या घटनेनंतर ट्रम्प यांचे कोणतेही विधान हलक्यात घेणे चुकीचे ठरेल.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# ऑनलाईन खरेदीमुळे स्थानिक उद्योग धोक्यात

**चंद्रकांत लोहाणा**

ऑनलाईन खरेदीच्या मोहजालामध्ये आज प्रत्येक जण अडकत चालला आहे. ही खरेदी सहज सोपी आणि वेळेची बचत करणारी असली तरी त्याचे तोटेही तेवढेच भयंकर आहे. आजकाल विविध प्रलोभने देऊन ई-कॉमर्स कंपन्यांनी मानवी मनाचा आणि मेंदूचा ताबा घेतला आहे. त्यामुळे आम्ही जे विकतो तेच योग्य असा भ्रम या कंपन्यांनी समाजामध्ये पद्धतशीरपणे पसरविला आहे. आपल्या देशामध्ये सध्या विदेशी ई-कॉमर्स कंपन्यांचा बोलबाला असून, त्यांनी संपूर्ण भारतीय समाजमनावर ताबा मिळविला आहे. स्मार्टफोनच्या पदार्पणानंतर त्याची व्याप्ती तर अधिकच वाढली आहे. त्यामुळे या बाबीचा अतिशय गंभीरतेने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. ऑनलाईनच्या वाढत्या प्रस्थामुळे आपल्या देशामधील लहान लहान उद्योगांसमोर गंभीर संकट उभे ठाकले असून, त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे ऑनलाईन खरेदी वरवर चांगली दिसत असली तरी समाजासाठी अतिशय घातक ठरत आहे. ऑनलाईन शॉपिंगमध्ये वस्तूचे चांगले रेटिंग दाखवून ग्राहकांना खराब उत्पादने विकण्याचा सपाटा ई-कॉमर्स कंपन्यांनी लावला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांची ही एक प्रकारे दादागिरी असून, त्यावर वेळीच आळा घातला नाही तर पुढेही असे फसवणुकीचे प्रकार वाढीस लागून भारतीय ग्राहकांची लुबाडणूक सुरूच राहील.



ऑनलाईन साईटवर खरेदी करताना आधी ग्राहक त्या वस्तूचे रेटिंग आणि रिव्ह्यू बघतो. ४ ते ५ स्टार रेटिंग असलेल्या वस्तूंना ग्राहक आपली पसंती देतो. परंतु, चांगले स्टार रेटिंग असूनही त्या वस्तू प्रत्यक्षात खराब असल्याचा अनेक ग्राहकांचा अनुभव आहे. त्यामुळे या कंपन्यांच्या स्टार रेटिंगवरही प्रश्नचिन्ह लागले आहे. देशामध्ये अनेक मोठ्या कंपन्यांचा हा गोरखधंदा अजूनही सामान्य ग्राहकांच्या लक्षात न आल्याने त्यांची दररोज फसणवूक होत आहे. विदेशी कंपन्यांना येथील समाजहिताशी काहीएक देणे घेणे नसल्याने भरपूर पैसे कमविण्याच्या नादामध्ये स्पर्धेच्या युगात सर्व नीतिनियम गुंडाळून बाजार काबीज करण्यामध्ये तरबेज आहेत. विदेशी कंपन्या चांगले स्टार रेटिंग व रिव्ह्यूसाठी लोकांना लाच देत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या विदेशी ई-कॉमर्स कंपन्यांची विश्वसनीयता किती असेल याचा प्रत्येक खरेदीदाराने गंभीरतेने विचार करावा. प्रत्यक्षात दुकानामध्ये जाऊन केलेली खरेदी व ऑनलाईन खरेदीमध्ये खूप फरक आहे. प्रत्यक्ष केलेल्या खरेदीमध्ये वस्तू पारखून घेऊ शकतो. परंतु, ऑनलाईन खरेदी करताना त्यावेळी आपली पारखी नजर सहज धोका देऊन जाते. आपण घेत असलेली वस्तू प्रत्यक्ष नजरेसमोर नसल्याने फक्त अंदाज बांधून आपण ती घेत असतो. त्यामुळे ग्राहकांच्या या कमजोरीचा फायदा उचलून या कंपन्या खराब उत्पादने ग्राहकांच्या माथी मारत असल्याचा अनेकांचा अनुभव आहे. एकावर एक मोफत, ५० टक्के सूट अशा आमिषाला बळी पडून ग्राहक ऑनलाईन खरेदीच्या मायाजालात सहज अडकतो. खरेदी केल्यावर मात्र ती वस्तू मुळात स्थानिक बाजारामध्ये स्वस्त असल्याची जाणीव होते. परंतु, तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. कंपनी कोणतीही आणि कितीही मोठी असो, ती पैसा कमाविण्यासाठीच बाजारात आली आहे, हे ग्राहक विसरतो अन् फसव्या जाहिराती बघून लुबाडला जातो. विकली जाणारी वस्तू व अन्य साहित्य या कंपन्या तोट्यात का विकतील याचा आम्ही कधीच विचार करीत नाही. ऑनलाईन विक्री होणाऱ्या सर्वच वस्तू प्रत्येक शहरामध्ये उपलब्ध आहेत. परंतु, ऑनलाईन खरेदीमुळे आजकाल शहरामधील लहान लहान उद्योग डबघाईस येत असल्याचे पाहावयास मिळत आहे. त्यामुळे अनेकांच्या हाताचे काम हिरावले गेले आहे. त्यांचा रोजगार गेला अन् आपला खरेदीचा आनंदही हिरावला गेला. मिळणारा नफा विदेशी कंपनीच्या घशात जात असल्याने आपण स्वतः देशाचे किती नुकसान करीत आहोत हेसुद्धा आपल्या लक्षात येत नाही. एकदा या कंपन्यांनी वस्तू ग्राहकांच्या माथी मारली की तिची जबाबदारी संपते. ती वस्तू खराब असली तरी ती कंपनी ग्राहकांना सहजासहजी दाद देत नाही. त्यामुळे ऑनलाईन खरेदी शारीरिक कष्टाविना असली तरी ती पुढे त्रास देणारीच ठरते. परिणामी, या कंपन्यांचे सहज फावते. त्यामुळे आपली फसवणूक टाळण्यासाठी प्रत्येक ग्राहकाने स्थानिक बाजारपेठ निवडली तर आपले अन् देशाचेही भले होईल.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# श्रीराम मंदिराचे यशस्वी व्यवस्थापन

**दत्तात्रेय आंबुलकर**

अयोध्येतील श्रीराम मंदिर पुनर्निर्माणाच्या निमित्ताने श्रद्धेपासून शास्त्रापर्यंत व निर्धारापासून निर्माणापर्यंत एवढेच नव्हे, तर व्यवस्थेपासून व्यवस्थापनापर्यंतचे अनेक कीर्तिमान प्रस्थापित केले. श्रीरामसेवकांच्या बलिदानी कारसेवेपासून विविध टप्प्यांवरील प्रखर उपक्रम - आंदोलनाची यशस्वी परिणती, भव्य श्रीराम मंदिराची निर्मिती व त्यावरील धर्मध्वजेच्या प्रतिष्ठापनेच्या निमित्ताने उभ्या जगाने पाहिली, अनुभवली. मात्र, श्रीराम मंदिर निर्माणापासून धर्मध्वजारोहणाच्या या प्रक्रियेमध्ये व प्रत्यक्ष निर्माणकार्यामध्ये प्रत्यक्ष प्रकल्प व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये विविध टप्प्यांवर व वेगवेगळ्या संदर्भात जी आव्हाने उभी ठाकली व त्या साऱ्यांवर यशस्वीपणे मात करून मुख्य म्हणजे, निर्धारित व इच्छित वेळेत हे कधी अशक्यप्राय वाटणारे रामकाज पूर्णत्वास नेले गेले, त्याला तोड नाही. यानिमित्ताने अयोध्येच्या श्रीराम मंदिर भवन निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी लिहिलेला लेख मुळातून वाचण्यासारखा आहे. या लेखामध्ये मंदिर निर्माणकार्याच्या विविध टप्प्यांचे साक्षी व प्रत्यक्षदर्शी असलेल्या नृपेंद्र मिश्रा यांनी त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना या संपूर्ण प्रक्रियेमध्ये विविध संदर्भात त्यांचे कामकाजच नव्हे, तर कार्यकर्तृत्वाचा कस लावणाऱ्या आव्हानांना सामोरे जावे लागले व त्यावर कशाप्रकारे मात करता आली व इच्छित मंदिरनिर्माण कशाप्रकारे साध्य केले गेले याचे थोडक्यात; पण महत्त्वपूर्ण वर्णन करण्यात आले आहेच. मुख्य म्हणजे, यानिमित्ताने यशस्वी प्रकल्प व्यवस्थापनाचा वस्तुपाठच त्यांनी सर्वांपुढे मांडला आहे, हे विशेष.

नृपेंद्र मिश्रा यांनी नमूद केल्यानुसार, अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या निर्माणकार्याला मोठे गतिमान पाठबळ मिळाले, ते सर्वोच्च न्यायालयाने ९ नोव्हेंबर २०१९ रोजी दिलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण निकालाने. या न्यायालयीन निकालाने रामजन्मभूमीच्या संदर्भातील मूळ प्रश्न व त्यावरील तर्क-कुतर्कांना पूर्णविराम देतानाच, सर्व तथाकथित विवादास्पद मुद्दे कायमस्वरूपी निकालात काढले. दशकांच्या न्यायालयीन लढ्याचा यानिमित्ताने यशस्वी समारोप तर झालाच. याशिवाय, या निकालाने निर्माण प्रकल्पांवर काम करणाऱ्या प्रत्येकामध्ये वेगळा जोश निर्माण करण्याचे महनीय काम केले.

त्यानंतर शास्त्रोक्त व रीतसर पद्धतीने भूमिपूजन करून प्रत्यक्ष राममंदिराच्या कामाला सुरुवात झाली व कामाच्या पहिल्याच टप्प्यात उभ्या जगाला कोरोनाने गाठले. अयोध्या पण त्याला अपवाद नव्हती. प्रवास-दळणवळण, सारे व्यवहार, माणसांचे कामकाज ठप्प झाले होते. अशाही परिस्थितीत श्रीराम मंदिराचे निर्माणकार्य सुरूच ठेवले. तेथील कामगार-कारागीर-अभियंत्यांनी चेहऱ्यावर मास्क लावून मर्यादित स्वरूपात, पूर्ण काळजी व निष्ठेसह आपले काम सुरूच ठेवले व तोसुद्धा एकाप्रकारे श्रद्धापूर्ण इतिहासाचा विषय ठरला.



त्यानंतर उत्खनननंतर असे लक्षात आले की, तेथील जमिनीवर सध्या प्रचलित व प्रगत पद्धतीने गाभ्यासह पाया बनविणे दीर्घकालीन स्वरूपात उपयुक्त होणार नाही. यामुळे पूर्वानुमानानुसार, सुरुवातीच्या टप्प्याला अधिक वेळ लागणार होता. याचा परिणाम प्रत्यक्ष मंदिरनिर्माणावर अपरिहार्यपणे होणार होता. दरम्यान, रात्रंदिवस काम जारीच होते. त्यादरम्यान, या अविरत प्रयत्नांना वेळेत व परिणामकारक स्वरूपात जोड दिली गेली, ती विशिष्ट प्रकारच्या दगडांच्या वापराची. मंदिरासाठी अशाप्रकारे प्रत्यक्ष निर्माणकर्त्यांचे प्रयत्न सुरू असतानाच, त्याला जोड मिळाली ती नॅशनल जिओ-फिजिकल रिसर्च इन्स्टिट्यूटची. निर्माणस्थळी अतिखोलवरच्या जमीन-मातीवर संशोधन करून त्याठिकाणच्या बांधकामाच्या सुरक्षिततेसाठी दगडी पायाची बांधणी अधिक मजबूत ठरेल, यावर त्यांनी शिक्कामोर्तब केले. परिणामी, राम मंदिराच्या पायासाठी सिमेंटऐवजी विशेष दगडांचा मजबूत दगडी पाया रचण्याचा निर्णय अंतिम झाला व त्यानुसार पायाच्या कामाला नव्या जोमाने सुरुवात झाली.

मात्र, त्यानंतर एक वेगळीच समस्या उभी ठाकली. राजस्थानातील पहारपूर पद्धतीच्या या दगडांचा मोठ्या प्रमाणात व विशिष्ट कालावधीत पुरवठा करण्यासाठी त्या क्षेत्रातील नेमक्या दगड खाणींमध्ये मोठ्या प्रमाणात खाणकाम-खोदकाम करणे अत्यावश्यक होते. पर्यावरण-संरक्षणाशी संबंधित नियमांनुसार, त्यासाठी राज्याच्या पर्यावरण मंत्रालयाची परवानगी मिळणे, तिथल्या दगडांएवढेच कठीण वाटत होते. मात्र, हे परवानगीचे कठीण वाटणारे काम श्रीरामकृपेने सुलभ झाले, हे विशेष.

प्रशासकीय परवानगीनंतर राजस्थानच्या विशिष्ट दगडी खाणींमधून एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर खाणकाम सुरू होऊन आवश्यक प्रमाणात दगड उपलब्ध झाले. मात्र, हे खाणकाम एकाच वेळी झाल्याने व मोठ्या प्रमाणावर दगड उपलब्ध झाल्याने एक वेगळी व तेवढीच मोठी समस्या निर्माण झाली. ती म्हणजे, या एवढ्या मोठ्या प्रमाणावर एकाच वेळी उपलब्ध झालेले दगड मंदिरस्थळी म्हणजेच अयोध्या येथे वाहून नेण्याची. यातून दगड वाहतुकीचे एक वेगळेच आव्हान पुढे आले. विशेषतः याकामी मोठ्या प्रमाणावर भारवहन करणाऱ्या मोठ्या व अवजड वाहनांची फार मोठ्या संख्येत एकाच वेळी व तुलनेने कमी कालावधीत एकत्र करण्याची आवश्यकता होती. याकामी देशभरातून राजस्थानशिवाय कर्नाटक, तेलंगण, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, ओडिशा, तामिळनाडू इ. राज्यांतून अवजड मालवाहतूक करणाऱ्या विशेष वाहनांची व्यवस्था केली गेली.

या साऱ्या प्रयत्नांकडे व श्रीराम मंदिर निर्माणकार्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांच्या पराकाष्ठेकडे आज वळून पाहताना श्रीराम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष म्हणून नृपेंद्र मिश्रा नमूद करतात की, श्रीराम मंदिराची उभारणी म्हणजे केवळ बांधकाम नव्हते, तर त्याद्वारे शतकानुशतके वंचित ठेवण्यात आलेल्या मंदिरनिर्माणाचे ते काम होते. हिंदूंची श्रद्धा व संस्कृतीचे आगामी युगांसाठी प्रेरणादायी केंद्र यानिमित्ताने उभे राहणार होते. नेमके हेच काम सर्वार्थांनी प्रत्यक्ष पूर्णत्वास गेले, ते २२ जानेवारी २०२४ रोजी प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेल्या श्रीरामललांच्या प्रतिमा प्रतिठापनेने. नृपेंद्र मिश्रा यांना मनापासून असे वाटते की, प्रत्यक्ष श्रीरामांच्या कामामध्ये बरीच विघ्ने आलीत व त्याचे यथायोग्य व यशस्वी निराकरण पण झाल्याचे दाखले मिळतात. नेमक्या याच अनुभवांचा पुनर्प्रत्यय अयोध्येतील राम मंदिर निर्माणकार्यादरम्यान त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना आला. अनेक आव्हानांना यशस्वीपणे व वेळेत तोंड देताना प्रत्यक्ष निर्माण समितीने ज्याप्रकारे व्यवस्थापकीय नियोजन केले, ते विलक्षण वाटते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### भाजपा व मित्रपक्षांची जबाबदारी वाढली

महापालिकेच्या निवडणुका संपन्न झाल्या आणि निकालही लागला. भाजपाने मोठ्या संख्येने महापालिका जिंकल्या. आता मात्र भाजपा आणि मित्रपक्षांची जबाबदारी वाढलेली आहे. त्यामुळे आता विरोधकांची तोंडं बंद करायची असतील तर त्यांना घसघशीत कामाची पावतीही तशीच द्यावी लागेल. कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात सांगितले की आता स्वतःची फुशारकी मारण्यापेक्षा कामाने त्याचे उत्तर द्यावे. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी अहंकारात राहू नये. आपण नगरसेवक आहोत अर्थात जनतेचे सेवक आहोत या अनुषंगानेच कामे करत राहिल्यास पुढे यापेक्षाही सरशी झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आता असे वाटते की भाजपाने नाराज निष्ठावंतांची नाराजी दूर करून त्यांना आपल्या सोबत घेऊन विकास कामात त्यांचेही योगदान घेणे गरजेचे आहे.

**श्रीपाद महाजन**/सोलापूर

### गणेश जन्म माघी चतुर्थीनिमित्त

अनलासुर या असुराला गणपतीने आपल्या धारण केलेल्या विराट स्वरूपात गिळून टाकले आणि त्यामुळे गणपतीच्या अंगाची लाही लाही होऊ लागली. त्यामुळे असह्य झालेल्या गजाननाला चंदनाचा लेप, डोक्यावर चंद्राची स्थापना, तसेच त्याच्या हातात कमळ देण्यात आले. शंकरांनी गळ्यातला नाग त्याच्या कमरेला बांधला, सर्वांगावर पाण्याचा अभिषेकसुद्धा करण्यात आला. पण उपयोग होत नाही हे पाहून अनेक ऋषींनी एकवीस दूर्वांच्या जुड्या त्याच्या मस्तकावर ठेवल्या आणि तेव्हा त्याच्या अंगाची लाही थांबली याच कारणाने गणेशाला २१ दूर्वा अर्पण केल्या जातात.

दुःखांना दूर करते त्याला दूर्वा म्हणतात. संसारातील काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षडरिपू दुःखाला कारणीभूत असतात हे वास्तव आहे. षडरिपू, ५ प्रपंच, चतुष्टय, त्रिगुण, द्वैत आणि शेवटी अद्वैत राहातो हे सर्व मिळून २१ होतात म्हणूनच गणेशाला २१ दूर्वा अर्पण करतात. अद्वैतापर्यंत सर्व आपल्या मूळ स्वरूपावर आरूढ होतात आणि आपण आपले मूळ स्वरूप विसरून जन्म-मरणाच्या फेऱ्यात फिरत राहातो त्यातून बाहेर पडण्यासाठी अद्वैताच्या उपासनेची गरज भासते म्हणूनच गणेशाला २१ दूर्वा वाहण्याची उपासना करावी. हीच उपासना केवळ भाद्रपद गणेशोत्सव व माघी गणेशोत्सवात करताना सातत्याने सुरू ठेवल्यास गणेश कृपा झाल्याशिवाय राहात नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### झाले इलेक्शन, जोडा रिलेशन

नगर परिषद, नगर पंचायत व मनपा निवडणूक आता संपलेली आहे. या निवडणुकीत कुणाच्या वक्तव्यांनी कुणाची मने दुखावली असतील, कुणाच्या भावना दुखावल्या असतील, काही वाद-प्रतिवाद झाले असतील, कुणामुळे कुणाचा पराभव झालेला असेल तर आता ते सारे विसरून जावे. निवडणुकीपर्यंत हे सारे ठीक होते, पण आता विसरायला हवे. आपणा सर्वांना गावात, शहरात, वॉर्डात व प्रभागात राहावयाचे आहे. समाज म्हणजे सामाजिक संबंधांचे जाळे होय. आपण एकदुसऱ्यावर अवलंबून असतो. आपल्या सामाजिक गरजा एकदुसऱ्याला सहकार्य केल्यानेच पूर्ण होणार आहेत. आपण एकत्र राहिलो, झालं गेलं विसरून गेलो तर आपली मने पुन्हा जुळतील. आपल्या सामाजिक गरजा, सहकार्य, सद्भावाशिवाय आपण अपूर्ण राहू. पुन्हा मने सामाजिक भावनांनी जोडूया. निवडणुकीतील हेवेदावे विसरूया. खेळामध्ये खिलाडूवृत्ती असते. खेळ संपले की सर्व काही विसरून सर्व एकत्र येतात तसे आपणही निवडणुकीत झाले गेले विसरूया व एकदिलाने आपल्या प्रभाग, वॉर्डाच्या समस्या व अडचणी सोडविण्यास एक होऊया. कारण ही काळाची गरज आहे. ''झाले इलेक्शन-आता जोडू रिलेशन.''

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### रेल्वे विभागाने याकडे लक्ष द्यावे

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पश्चिम बंगालमधील मालदा टाऊन ते हावडा-कामाख्या-हावडा अशी नवीन स्लीपर वंदे भारत एक्सप्रेस सुरू केली. जी सामान्य प्रवाशांसाठी अत्यंत फायदेशीर ठरेल. माझी रेल्वे मंत्र्यांना विनंती आहे की, ज्या गाड्यांचे स्लीपर कोच काढून टाकण्यात आले आहेत आणि त्या जागी एसी थ्री-टायर कोच लावण्यात आले, त्या आता पुन्हा सुरू कराव्यात जेणेकरून प्रवाशांना कमी अंतराचा प्रवास करता येईल. कारण एसी थ्री-टायर कोचमध्ये कमी अंतराचे भाडे जास्त असते, ज्यामुळे प्रवाशांना एसी कोचमध्ये कमी अंतराचा प्रवास करावा लागतो. प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घ्यावी.

**राजेश कारिया**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# ‘तुटलेले हाड का जुळत नाही’ या विषयावरील कार्यशाळा यशस्वी

## अस्थिरोग संघटनेच्या ट्रॉमा मीटमध्ये १४७ तज्ज्ञांचा सहभाग




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

येथील हॉटेल बालाजी सरोवरमध्ये सहावी सोलापूर ट्रॉमा मीट अत्यंत यशस्वीरीत्या पार पडली. ही दोन दिवसीय शैक्षणिक कार्यशाळा सोलापूर अस्थिरोग संघटना यांच्या वतीने आयोजित केली होती. ही ट्रॉमा मीट संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत औरंगाबादकर, उपाध्यक्ष डॉ. स्वप्नील कोठाडिया व सचिव डॉ. श्रीनिवास येमुल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. यावर्षीच्या ट्रॉमा मीटमध्ये ‘‘नॉन युनियन ऑफ फ्रॅक्चर्स’’ (तुटलेले हाड का जुळत नाही) या विषयावर सखोल चर्चा व सादरीकरण करण्यात आले. ही समस्या दैनंदिन वैद्यकीय सरावात वारंवार आढळून येते. या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये सोलापूर व परिसरातील १४७ अस्थिरोग तज्ज्ञांनी सहभाग नोंदवला. या कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र अस्थिरोग संघटना यांचे सचिव डॉ. अभिजीत वाहेगावकर (पुणे) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेसाठी देशातील नामवंत अस्थिरोग तज्ज्ञांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये डॉ. जॉन मुखोपाध्याय (पटना), डॉ. दीनदयालन (गंगा हॉस्पिटल, कोयंबतूर), डॉ. विजय काकतकर (नाशिक), डॉ. राजेंद्र चांडक (नागपूर), डॉ. मिलिंद चौधरी (अकोला),डॉ. अमर सोनी बडोदा, डॉ. आदित्य मेनन (मुंबई) व डॉ. अच्युतराव (कर्नूल) यांचा समावेश होता. या ट्रॉमा मीटसाठी डॉ. बी. शिवशंकर यांनी सायंटिफिक कमिटीचे चेअरमन म्हणून जबाबदारी सांभाळली. कार्यशाळेमध्ये १९ पोस्ट ग्रॅज्युएट रेसिडेंट्स यांनी शोधनिबंध सादर केले तसेच ६ पोस्टर्स सादर करण्यात आले. यामध्ये डॉ. नीरज सोमवंशी , लातूर यांच्या शोधनिबंधास प्रथम पारितोषिक मिळाले. या सादरीकरणाचे परीक्षण डॉ. व्यंकटेश मेतन व डॉ. आदर्श मेहता यांनी केले. या कार्यशाळेत आयोजित परिसंवादांमध्ये तज्ज्ञांनी नॉन युनियन ऑफ फ्रॅक्चर्स विषयावर आपले अनुभव, अभ्यास व उपचारपद्धती मांडल्या. तुटलेले हाड न जुळल्यास रुग्णांचे शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसान होते व त्याचा समाजावरही अप्रत्यक्ष भार पडतो. या पार्श्वभूमीवर या कार्यशाळेमधील चर्चा व मार्गदर्शन अस्थिरोग तज्ज्ञांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. कार्यशाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन डॉ. गुरुनाथ वच्चे व डॉ. सुनील हंद्राळमठ यांनी केले. ही ट्रॉमा मीट यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रदीप कोठाडिया, डॉ. संजीव भंडारी, डॉ. मिलिंद जोशी, डॉ. गुड्डू बबलादी, डॉ. विनू गोपाल संभाराम , डॉ अमित गुंडेवार,डॉ. अनुराग पाटील, डॉ. प्रवीण स्वामी तसेच सोलापूर अस्थिरोग संघटनेच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## भरधाव रिक्षाची धडकेत महिलांना गंभीर दुखापत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत भरधाव रिक्षाने धडक दिल्याने दोन महिलांना गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १५ जानेवारी रोजी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास वैष्णवी हॉटेलसमोर, सोलापूर येथे घडली.फिर्यादीची आई संगिता माने वय ५४ व सुंदराबाई सोलापूर वय ६० या दोघी कामावरून पायी घरी जात असताना रिक्षा क्रमांक एमएच १३ सीटी ९६३२ चा चालक राहुल नागनाथ चिलगुंडे रा. सम्राट चौक, सोलापूर याने रिक्षा भरधाव वेगाने चालवत त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात दोन्ही महिलांना डोके व छातीला गंभीर मार लागून गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.याप्रकरणी फिर्यादी आकाश विष्णु माने वय ३०, रा. जुनी पोलीस लाईन, मुरारजी पेठ, सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

## दुचाकी चोरी; चोरट्याविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी चोरीची घटना घडली असून याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी सोहेल शहिद जहागिरदार वय ३० वर्षे, रा. नुतन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांनी आपली होंडा कंपनीची लिव्हो मोटारसायकल क्रमांक एमएच १३ सीएन ३८०४ चॉकलेटी व काळ्या रंगाची, दि. ११ जनेवरी रोजी रात्री १०.०० वाजता घरासमोर हँडल लॉक करून लावली होती. त्यांनतर दि. १२ जानेवारी रोजी सकाळी ०७.०० वाजता उठून पाहिले असता सदर मोटारसायकल त्या ठिकाणी दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे निदर्शनास आले असून या प्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दि. १८ जानेवारी रोजी सायंकाळी ४.०९ वाजता गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भांगे करीत आहेत.


### जाहीर प्रसिध्दीकरण

**जागा/जमीनीचे खरेदीखत दस्त हरविल्याबाबतचे**

तमाम लोकांस विशेषतः डि सोलापूर सब. डि व ता. करमाळा पैकी ग्रामपंचायत वाशिंबे हद्दीतील मौजे मौजे वाशिंबे व करमाळा तालुक्याच्या आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि सोलापूर सब. डि व ता. करमाळा पैकी ग्रामपंचायत वाशिंबे हद्दीतील मौजे वाशिंबे येथील निवासी उपयोगी खुली जागा याचा ग्रामपंचायत घर नं. ११/२ याचे क्षेत्रफळ २८६.०० चौ. फूट. म्हणजेच २६.५७ चौ.मी. आहे. याबाबत खरेदीखताचा दस्त श्री. यशवंत तुळशीराम यादव यांनी आमचे अशिल श्री. लालचंद भीमराव सावंत यांना दि. २२/०१/२०२१ रोजी खरेदीखत दस्त क्र. ३४८/२०२१ हा रजिस्टर खरेदीखताचा दस्त लिहून, नोंदवून दिलेला होता. सदर जागेचे यापुर्वीचे खरेदीखत दस्त क्र. १६७०/२०१२ व खरेदीखत दस्त क्र. ४३००/२०१५ हे रजिस्टर खरेदीखताचे दस्त देखील आमचे अशिल यांच्याकडे होते. परंतु, सदरचे दोन्ही खरेदीखताचे दस्त आमचे अशिलाकडुन अनावधानाने गहाळ होऊन हरविलेले आहेत, ते अद्यापपर्यंत आढळून आलेले नाहीत.

तरी, तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीचे दोन्ही खरेदीदस्त मिळाल्यास त्याचा त्याचा गैरवापर करु नये, सदरचे खरेदीखत दस्त मिळाल्यास खालील पत्यावर आणून द्यावेत. सदर दस्ताचे दस्ताचे अनुषंगाने कुणीही कोणत्याही प्रकारचे बनावट कागदपत्रे तयार करुन मिळकतीबाबत व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा आमचे अशिलावर अथवा आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक राहणार नाहीत, नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तरी, सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध सदर मिळकतीबाबत पुर्व साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा दान, लिज, पोटगी, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा स्वरुपाचा दस्त करु नये. कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास खालील पत्यावर लेखी स्वरुपात कळवावी. कोणचीही फसगत होऊ नये म्हणून सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. दि. १९/०१/२०२६

सही/-
अशिल श्री. लालचंद भीमराव सावंत यांचे तर्फे
ॲड. सुप्रिया शेखर गुंडपाटील,
ता. बार्शी, जि. सोलापूर मो.नं. ९५११८२१३१४

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर व ता. बार्शी येथील लोकांना व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे अशिल श्रीकांत अनिल मिरगणे, रा. फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी येथील रहिवासी असून दि. १५/०१/२०२६ रोजी पांडे चौक, बार्शी येथे बॅग घेऊन थांबले असता अनावधानाने सदर बॅग गहाळ झालेली आहे सदर बॅग मध्ये ता. ०२/०३/१९९३ रोजी आदिती विलासराव पाटील यांचे अ.पा. क. विलास भगवानराव पाटील यांचे नांवे नामदेव कुंडलिक पाटील यांनी बक्षिसपत्राचा दस्त लिहून नोंदवून दिला होता त्याचा नं. दस्त नं.५५४/१९९३ चा अस्सल दस्त गहाळ झाला असून तो शोध घेवूनही तो आढळून आलेला नाही त्याबाबत ता. १५/०१/२०२६ रोजी बार्शी शहर पोलिस स्टेशनला रितसर तक्रारही दिलेली आहे.

तरी वरील नमूद कागदपत्रे/बक्षिसपत्र जर कोणाला सापडली असतील तर ती आमचे खालील नमूद पत्त्यावर आणून द्यावीत त्यास आमचे अशिल यथायोग्य बक्षिस देवून आभार मानतील ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. १९/०१/२०२६

✻ सदर कागदपत्रे कोणास सापडल्यास ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर आणून द्यावीत.

सही/-
श्री. प्रसाद जे. कुलकर्णी
बी.एस.एल., एल.एल.बी.
ॲडव्होकेट लक्ष्मीनृसिंह, कासारवाडी रोड, सिध्देश्वरनगर, बार्शी ता. बार्शी
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)
मो.नं.९४२३३३२०४८

### चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्रमांक ७५)

**बदल अर्ज क्रमांक** : १३०५/२०२५
**सार्वजनिक न्यासाचे नाव** : श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
**न्यास नोंदणी क्रमांक** : एफ-५४३७ (सोलापूर)
**अर्जदार : अनिता हिराचंद ढोबळे**

सर्व संबंधित लोकास या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर हे नोटीसमध्ये नमूद केलेल्या स्थावर मिळकतीबाबतचा बदल अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
अ) जंगम मिळकत : (वर्णन) काही नाही.
ब) स्थावर मिळकत : (वर्णन)

मौजे अकोलेकाटी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर गट नं. १३१/१अ/१ येथील शेतजमीन क्षेत्र हे. ५ - ६० आर, आकार रु. ०२ पैसे ०६ असे एकूण क्षेत्रफळ ५ हे.६० आर. दिनांक: ११/०७/२०१६ चे खरेदीखत नं.२०९९/२०१६ जमिनीची किंमत अंदाजे रुपये ३८,५०,०००/- (अक्षरी रुपये अडोतीस लाख पन्नास हजार फक्त)

सदर जमिनीची चतुःसीमा खालीलप्रमाणे
पूर्वेस :- गट नं. १२४ पश्चिमेस गट नं. १३७,
दक्षिणेस :- रस्ता, उत्तरेस :- गट नं. १३० व १३२,
या स्थावर मालमत्तेची नोंद अनुसूची १ वर घेण्याबाबत.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल. अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी. त्यांचा विहित. नमुन्यातील लेखी हरकत अर्ज ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी अथवा समक्ष येऊन दाखल करावी. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व बदल अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक : ०२/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर

### चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्रमांक ७५)

**बदल अर्ज क्रमांक** : १३०४/२०२५
**सार्वजनिक न्यासाचे नाव** : श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
**न्यास नोंदणी क्रमांक** : एफ-५४३७ (सोलापूर).
**अर्जदार : अनिता हिराचंद ढोबळे**

सर्व संबंधित लोकास या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर हे नोटीसमध्ये नमूद केलेल्या स्थावर मिळकतीबाबतचा बदल अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
अ) जंगम मिळकत : (वर्णन) काही नाही.
ब) स्थावर मिळकत : (वर्णन)

डि व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे वडाळा, ता. उत्तर सोलापूर, येथील जमीन गट नं. ५०९/१ याचे एकूण क्षेत्र हे. ५ आर ९८+, पो.ख. क्षेत्र हे ० आर ०६ असे एकूण क्षेत्र हे६ आर ०४ यासी आकार रु. ११ पैसे ३० पैकी दक्षिणपूर्व कोपऱ्यातील क्षेत्र हे ० आर ४१ हे क्षेत्र सोडून राहिलेली उत्तरपश्चिम कोपऱ्यातील पुढील वर्णनाची शेतजमीन असून तिचा तपशील पुढीलप्रमाणे. दिनांक : ०४/०३/२०१३ चे खरेदीखत नं. २४४५/२०१३ जमिनीची किंमत अंदाजे रुपये २३,७५,०००/- (अक्षरी रुपये तेवीस लाख पंचाहत्तर हजार फक्त) सदर जमिनीची चतुःसीमा खालीलप्रमाणे.

पूर्वेस :- गट नं. ५१०, पश्चिमेस : गट नं. ५०६, ५०७
दक्षिणेस :- पडसाळी रस्ता व सदर गट नं.५०९/१ पैकी राहिलेले क्षेत्र,
उत्तरेस :- वांगी रस्ता

डि व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे वडाळा, ता. उत्तर सोलापूर, येथील पुढील वर्णनाची शेतजमीन असून तिचा तपशील पुढीलप्रमाणे, गट नं ५०९/२ब१ याचे एकूण क्षेत्र हे.-३ आर ७९, पो.ख. क्षेत्र हे ० आर ०८ असे एकूण क्षेत्र हे. ३ आर ८७ यासी आकार रु. ७ पैसे ५५

पूर्वेस :- गट नं. ५१०, पश्चिमेस गट नं. ५०६, ५०७,
दक्षिणेस :- पडसाळी रस्ता, उत्तरेस :- वांगी रस्ता
या स्थावर मालमत्तेची नोंद अनुसूची १ वर घेण्याबाबत.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल. अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी. त्यांचा विहित नमुन्यातील लेखी हरकत अर्ज ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी अथवा समक्ष येऊन दाखल करावी. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व बदल अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०२/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ८३/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. अजिक्य रविंद्र पवार** - **अर्जदार**
रा. पवार प्लॉट, उपळाई रोड, बार्शी
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरूध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडिल रविंद्र दत्तात्रय पवार, रा. पवार प्लॉट उपळाई रोड, बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०९ डिसेंबर २०१० रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजर चुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे वडिल रविंद्र दत्तात्रय पवार यांचा दिनांक ०९ डिसेंबर २०१० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

### चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्रमांक ७५)

**बदल अर्ज क्रमांक** : १३०३/२०२५
**सार्वजनिक न्यासाचे नाव** : श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
**न्यास नोंदणी क्रमांक** : एफ-५४३७ (सोलापूर).
**अर्जदार : अनिता हिराचंद ढोबळे**

सहाय्यक सर्व संबंधित लोकास या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर हे नोटीसमध्ये नमूद केलेल्या स्थावर मिळकतीबाबतचा बदल अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
अ) जंगम मिळकत : (वर्णन) काही नाही.
ब) स्थावर मिळकत : (वर्णन)

डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे वडाळा, येथील जिल्हा परिषद सोलापूर पैकी ता. पंचायत समिती उत्तर सोलापूर पैकी मौजे वडाळा येथील ती ग्रामपंचायत शेत जमीन तिचा तपशील आणि त्यासी चतुःसीमा खालीलप्रमाणे : गट नं. ३२४/१ येथील शेतजमीन क्षेत्र हे. ३ आर ५८, पो.ख.हे. ० आर ४१, यासी आकार रु. ० पैसे ७६ असे एकूण क्षेत्रफळ हे. ३ - आर ९९ सदर क्षेत्र जिल्हा परिषद सोलापूर यांना हे. ०-५८ आर ही जमीन दिलेली आहे. ती सोडून वरील क्षेत्र खरेदी दिले आहे. दिनांक: २४/०४/२००६ चे खरेदी खत नं. १८७०/२००६ जमिनीची किंमत अंदाजे रुपये ३,२८,६५०/- (अक्षरी रुपये तीन लाख अठ्ठावीस हजार सहाशे पन्नास फक्त) सदर जमिनीची चतुःसीमा खालीलप्रमाणे :

पूर्वेस :- गट नं. ३२२/१, पश्चिमेस गट नं. ३२५,
दक्षिणेस गट नं. ३२३, उत्तरेस :- गट नं. ३३०,
या स्थावर मालमत्तेची नोंद अनुसूची १ वर घेण्याबाबत.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल. अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांचा विहित. नमुन्यातील लेखी हरकत अर्ज ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी अथवा समक्ष येऊन दाखल करावी, त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व बदल अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक : ०२/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर

### चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्रमांक ७५)

**बदल अर्ज क्रमांक** : १३०६/२०२५
**सार्वजनिक न्यासाचे नाव** : श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
**न्यास नोंदणी क्रमांक** : एफ- ५४३७ (सोलापूर).
**अर्जदार** : अनिता हिराचंद ढोबळे

सर्व संबंधित लोकास या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर हे नोटीसमध्ये नमूद केलेल्या स्थावर मिळकतीबाबतचा बदल अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
अ) जंगम मिळकत : (वर्णन) काही नाही.
ब) स्थावर मिळकत : (वर्णन)

मौजे वडाळा, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील शेत जमीन गट नं. ३२१/२ क्षेत्र हे. ४.४४ आर, पो.ख. क्षेत्र हे. १ आर ६१ असे एकूण क्षेत्र हे. ६ आर ०५ यांसी आकार रु. ०१ पैसे २५ ही शेतजमीन, दिनांक : ०८/०१/२०१९ चे खरेदीखत नं. २६८/२०१९ जमिनीची किंमत अंदाजे रुपये ११,००,०००/- (अक्षरी रुपये अकरा लाख फक्त) सदर जमिनीची चतुःसीमा खालीलप्रमाणे :

पूर्वेस :- गट नं. ३२०अ ची शेतजमीन ; पश्चिमेस : गट नं. ३२२ ची शेतजमीन, दक्षिणेस :- नान्नजची शिव, उत्तरेस : गट नं. ३१८ ची शेतजमीन
या स्थावर मालमत्तेची नोंद अनुसूची १ वर घेण्याबाबत.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल. अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी. त्यांचा विहित. नमुन्यातील लेखी हरकत अर्ज ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी अथवा समक्ष येऊन दाखल करावी. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व बदल अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक : ०२/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर

### नावात बदल

मी, इंदुमती सुधीर जाधव, R/o 39A , प्रसाद नगर, जुळे सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र ४१३००४, मी जाहीर करते की माझे जुने नाव **इंदूबाई सुधीर जाधव** वरून **इंदुमती सुधीर जाधव** असे बदलले आहे.

**प्रतिज्ञापत्र**
**क्रमांक : २८९९५,**
**दिनांक : १९/०१/२०२६**

### CHANGE IN NAME

I, INDUMATI SUDHIR JADHAV,R/o. 39 A, Prasad Nagar, Jule Solapur, Solapur, Maharashtra 413004. declare that my old name changed from **Indubai Sudhir Jadhav** to new name **Indumati Sudhir Jadhav** as per Affidavit No. 28995. Date 19/01/2026

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व तालुका बार्शी पैकी मौजे खांडवी व आसपासचे परिसरातील लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे - खांडवी हद्दीतील जमीन अ) गट नं. ९७६ याचे संपुर्ण क्षेत्र ०० हे. ९५ आर.. ब) गट नं. ९७७ पैकी क्षेत्र ०० हे. ४० आर. पोटखराब ०० हे. ०१ आर.. एकूण क्षेत्र ०० हे. ४१ आर. येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती, आतील तदंगभूत वस्तुसह, स्वतंत्र मालकी व कब्जे, वहिवाटीच्या हक्कासह.
२) डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे खांडवी हद्दीतील जमीन गट नं. ९७७ पैकी क्षेत्र ०० हे. ३१ आर. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत, आतील तदंगभूत वस्तुसह, स्वतंत्र मालकी व कब्जे, वहिवाटीच्या हक्कासह.
३) वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या शेखफरीद बशीर मुलाणी, रा. कराड, ता. कराड, जि. सातारा यांच्या स्वकष्टार्जीत खरेदी मालकीच्या असून, मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. तर, वर कलम २ मध्ये नमुद केलेली मिळकत ही लतिफ बशीर मुलाणी, रा. पुणे यांची स्वकष्टार्जीत खरेदी मालकीची असून, मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. वर कलम १ व २ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या मिळकत मालक अनुक्रमे शेखफरीद बशीर मुलाणी व लतिफ बशीर मुलाणी यांनी आमचे अशिल श्री. अविनाश धोंडीबा सातपुते रा. बार्शी यांना योग्य त्या बाजारभाव किंमतीने विक्री करण्याचे ठरवून तसा वर नमुद मिळकती विक्रीबाबत उभयंतामध्ये इसार पावतीचा करार झालेला आहे. सदर मिळकती या स्वतंत्र मालकी हक्काच्या व कब्जे वहिवाटीच्या, निर्वेध, निजोखमी व बिनबोजाच्या असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलाचीही तशी खात्री झालेली आहे.
४) तरी वर नमुद मिळकतींवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह त्यांचे विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध, निजोखमी व बिनबोजाच्या आहेत, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. २०/०१/२०२६.

सही/-
ॲड. प्रशांत पांडुरंग एडके
बी.एस.एल., एल.एल.एम.
कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,
खेडकर बिल्डींग, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर,
मो. नं. ७३८५११०१८५/९८२२८१६४७८
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व तालुका बार्शी पैकी मौजे खांडवी व आसपासचे परिसरातील लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे खांडवी हद्दीतील जमीन अ) गट नं. ९७७ पैकी क्षेत्र ०० हे. २० आर.. ब) गट नं. ९७९ पैकी क्षेत्र ०४ हे. ७९ आर. क) गट नं. ९८० चे संपुर्ण क्षेत्र ०१ हे. ७२ आर. ड) गट नं. ९८१ पैकी क्षेत्र ०४ हे. ०४ आर. येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती, आतील तदंगभूत वस्तुसह, स्वतंत्र मालकी व कब्जे, वहिवाटीच्या हक्कासह.
२) डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे खांडवी हद्दीतील जमीन अ) गट नं. ९७९ पैकी क्षेत्र ०४ हे. ७९ आर. ब) गट नं. ९८१ पैकी क्षेत्र ०१ हे. २१ आर. येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती, आतील तदंगभूत वस्तुसह, स्वतंत्र मालकी व कब्जे, वहिवाटीच्या हक्कासह.
३) वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या श्री. मोहन जगन्नाथ गायकवाड, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांच्या स्वकष्टार्जीत खरेदी मालकीच्या असून, मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. तर, वर कलम २ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या सौ. अनुराधा मोहन गायकवाड, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांच्या स्वकष्टार्जीत खरेदी मालकीच्या असून, मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. वर कलम १ व २ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या मिळकत मालक अनुक्रमे श्री. मोहन जगन्नाथ गायकवाड व सौ. अनुराधा मोहन गायकवाड यांनी आमचे अशिल श्री. अमित घनशाम इंगोले, श्री. अविनाश धोंडीबा सातपुते व श्री. हनुमंत सुभाष पवार, सर्व रा. बार्शी यांना योग्य त्या बाजारभाव किंमतीने विक्री करण्याचे ठरवून तसा वर नमुद मिळकती विक्रीबाबत उभयंतामध्ये इसार पावतीचा करार झालेला आहे. सदर मिळकती या स्वतंत्र मालकी हक्काच्या व कब्जे वहिवाटीच्या, निर्वेध, निजोखमी व बिनबोजाच्या असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलाचीही तशी खात्री झालेली आहे.
४) तरी वर नमुद मिळकतींवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह त्यांचे विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध, निजोखमी व बिनबोजाच्या आहेत, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. २०/०१/२०२६

सही/-
ॲड. प्रशांत पांडुरंग एडके
बी.एस.एल., एल.एल.एम.
कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,
खेडकर बिल्डींग, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर,
मो. नं. ७३८५११०१८५/९८२२८१६४७८
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### अुत्तम सेवा — मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **रिझर्व बँक ऑफ इंडिया, RBI** | | | |
| १ | ऑफिस अटेंडंट (५७२ पदे) | दहावी उत्तीर्णा स्त्री/पुरुष उमेदवार | २५ पर्यंत | ०४/०२/२६ |
| २) | **राष्ट्रीय कृषी व ग्रामिण विकास बँक, NABARD** | | | |
| १ | डेव्हलपमेंट असि. (१५९ पदे) | पदवी (५०%) उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार व संगणक ज्ञान आवश्यक | ३५ पर्यंत | ०३/०२/२६ |
| ३) | **भारतीय वायु सेना, IAF** | | | |
| १ | अग्निवीर वायु | बारावी (शास्त्र) ५०% गुणांसह उत्तीर्ण किंवा डिप्लोमा अभियांत्रिकी उत्तीर्ण | १९ पर्यंत | ०१/०२/२६ |
| २ | एअरमन | बारावी (शास्त्र) ५०% गुणांसह उत्तीर्ण किंवा डिप्लोमा अभियांत्रिकी उत्तीर्ण | २२ पर्यंत | |
| ४) | **बँक ऑफ महाराष्ट्र, BOM (ॲप्रेंटिस करण्याकरिता)** | | | |
| १ | ॲप्रेंटिस (६०० पदे) | पदवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २८ पर्यंत | २५/०१/२६ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ‘‘जॉईन’’ असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ५) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | | | |
| १ | महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट ‘अ’ व ‘ब’ संयुक्त पूर्व परिक्षा (८७ पदे) | कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणारे स्त्री/पुरुष उमेदवार असावे. | ३८ पर्यंत | २०/०१/२६ |
| ६) | **नवी मुंबई महानगरपालिका, NMMC (मुदतवाढ)** | | | |
| १ | कनिष्ठ अभियंता (१२ पदे) | अभियांत्रिकी पदवी (विद्युत/यांत्रिकी) उत्तीर्ण असणारे स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | १९/०२/२६ |
| २ | सहा. आयुक्त (०५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| ७) | **लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक लि. लातूर, LDCCBL** | | | |
| १ | लिपीक (२५० पदे) | पदवी (६०%) व MS-CIT कोर्स उत्तीर्ण | ३० पर्यंत | २१/०१/२६ |
| २ | शिपाई (११५ पदे) | बारावी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | |
| ३ | वाहन चालक (१० पदे) | पदवी (६०%) व LMV परवाना | २८ पर्यंत | |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मूळ तेलुगू कस्तुरीने घडविला इतिहास



**अनाकापल्ली** : मूळ तेलुगू असलेली कस्तुरी नायडू हिने दक्षिण आफ्रिकेची पहिली महिला क्रिकेट समालोचक होऊन इतिहास घडविला. महिला क्रिकेट विश्वचषकादरम्यान भारतात थेट समालोचन करून तिने आपले दीर्घकाळचे स्वप्नही पूर्ण केले. समालोचन क्षेत्राात कस्तुरी या कॅस नायडू या नावाने लोकप्रिय आहे. कॅस नायडू हिचे तेलुगू मुळांशी घट्ट नाते आहे. दक्षिण आफ्रिकेतील डर्बनमध्ये जन्मलेल्या आणि वाढलेल्या कस्तुरी यांचे वडिलोपार्जित घर उत्तर आंध्र प्रदेशातील अनाकापल्ली येथे आहे. तिचे आई-वडील, भगवती आणि सन्नासी नायडू, याच भागातील असले तरी, तिचे आजोबा अनाकापल्लीजवळील वेंकोजीपालेमचे होते. त्यामुळे तिच्या आजी-आजोबांच्या काळात तिचे कुटुंब दक्षिण आफ्रिकेत स्थलांतरित झाले असले तरी, तिने आपल्या मातृभूमीशी एक अनोखे आणि घट्ट नाते जपले आहे. कस्तुरी अनाकापल्लीला अधूनमधून भेट देणाऱ्या आपल्या आईकडून आंध्र प्रदेशाबद्दलच्या कथा ऐकत मोठी झाली. या कथांनी तिच्या मनात भारताविषयीचे प्रेम वाढवले आणि तिला तिच्या तेलगू वारशाशी जोडून ठेवले.

### पहिली कबड्डी चॅम्पियन्स लीग २५ जानेवारीपासून

**नवी दिल्ली** : पहिल्या कबड्डी चॅम्पियन्स लीगचे (केसीएल) आयोजन २५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान हरयाणाच्या राय येथील क्रीडा विद्यापीठात केले जाईल, अशी माहिती आयोजकांनी सोमवारी दिली. केसीएलने पहिल्या हंगामाचे सामन्यांचे वेळापत्रक अधिकृतपणे जाहीर केले आहे. १२ दिवसांच्या कालावधीत, आठ फ्रँचायझी - सोनीपत स्टार्स, गुरुग्राम गुरूस, हिसार हिरोज, भिवानी बुल्स, रोहतक रॉयल्स, कर्नाल किंग्स, पानिपत पँथर्स आणि फरिदाबाद फायटर्स - एका चुरशीच्या लीग फॉरमॅटमध्ये एकमेकांशी स्पर्धा करतील.

### पीएसएलमध्ये मोठे संरचनात्मक बदल

**लाहोर** : पाकिस्तान क्रिकेट मंडळाने पाकिस्तान सुपर लीगमध्ये (पीएसएल) मोठे संरचनात्मक बदल जाहीर केले आहेत. २०१६ मध्ये स्पर्धेच्या सुरुवातीपासून प्रचलित असलेल्या ड्राफ्ट प्रणालीऐवजी आता खेळाडूंचा लिलाव प्रणाली लागू करण्यात येणार आहे. खेळाडूंच्या लिलावासाठी फ्रॅन्चायझीची एकूण रक्कम १.३ दशलक्ष डॉलर्सवरून वाढवून १.६ दशलक्ष डॉलर्स करण्यात आली आहे. लीगच्या ११व्या हंगामापूर्वी केलेले हे बदल लीगची वाढ, स्पर्धात्मकता आणि नाविन्याप्रती असलेली बांधिलकी अधिक मजबूत करतील, असे पीएसएलचे सीईओ सलमान नसीर म्हणाले. पीएसएल आता ड्राफ्ट प्रणालीतून खेळाडूंच्या लिलाव प्रणालीकडे वळेल, ज्यामुळे पारदर्शकता वाढेल आणि लीगमध्ये संघांमधील स्पर्धात्मक संतुलन सुधारेल, यामुळे खेळाडूंना कमाईच्या अधिक संधी मिळतील, असे ते म्हणाले. नवीन सुधारणांनुसार, प्रत्येक फ्रँचायझीला जास्तीत जास्त चार खेळाडूंना कायम ठेवण्याची परवानगी असेल.

### सेनेगलने जिंकला आफ्रिका चषक

**रबात** : सेनेगलने नाट्यमय पद्धतीने आफ्रिका कप ऑफ नेशन्स जिंकला आहे. पापे गेयेने अतिरिक्त वेळेत ९४व्या मिनिटाला गोल करून सेनेगल संघाला यजमान मोरोक्कोवर १-० असा विजय मिळवून दिला. गोंधळात झालेल्या या अंतिम सामन्यात एका क्षणी चाहते मैदानात घुसण्याचा प्रयत्न करत होते आणि उत्तरार्धाच्या अतिरिक्त वेळेत मोरोक्कोला दिलेल्या पेनॉल्टीच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी सेनेगलचे खेळाडू मैदान सोडून बाहेर गेले होते. चाहते आणि सुरक्षा रक्षकांमध्ये झटापट सुरू झाली होती. १४ मिनिटांच्या थांब्यानंतर खेळ पुन्हा सुरू झाला, पण सामान्य वेळेच्या शेवटच्या क्षणी ब्राहिम डियाझने मारलेली पनेन्का पेनॉल्टी सेनेगलच्या एडुआर्ड मेंडीने सहज वाचवली, जेव्हा त्याने चेंडू थेट गोलरक्षकाच्या हातात मारला. त्यानंतर अतिरिक्त वेळेच्या चौथ्या मिनिटाला गेयेने आपल्या डाव्या पायाने चेंडू वरच्या उजव्या कोपऱ्यात मारून विजयी गोल केला.

### राष्ट्रीय योगा स्पर्धेसाठी कात्यायनी कुचन हिची निवड



**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**
नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी येथील कात्यायनी उत्कर्षा वेंकटरमण कुचन हिची निवड झाली. अस्मिता योगासन महिला लीग (पश्चिम विभाग) भारत यांच्या श्री अग्रसेन धाम रायपूर, छत्तीसगड येथे झालेल्या ट्रेडिशनल योगासन स्पर्धेतील कामगिरीवर तिची निवड झाली. तिला योगासन खेलो इंडिया पंच स्नेहल पेंडसे यांचे मार्गदर्शन लाभले.

# उद्या झळकणार सूर्याचे 'तेज!'





इंदूरहून सोमवारी भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, अर्शदीप सिंग व इतर खेळाडू तसेच न्यूझीलंड क्रिकेट संघातील खेळाडूंचे नागपुरात आगमन झाले

**प्रवीण मेंढी**
**नागपूर, १९ जानेवारी-**
इंडिया फर्स्ट प्रायोजित टी-२० सामना बुधवार, २१ जानेवारी रोजी नागपुरातील जामठा येथील व्हीसीए मैदानावर दिवस-रात्र खेळला जाणार आहे. कर्णधार सूर्यकुमारचे 'तेज' दिसणार का याकडे क्रिकेट रसिकांचे लक्ष लागले आहे. काही खेळाडूंचे रविवारी नागपुरात आगमन झाले.

खेळाडूंनी सरावही केला. अष्टपैलू खेळाडू शिवम दुबे, कर्णधार सूर्यकुमार यादव, ईशान किशन, जसप्रीत बु राह, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, अभिषेक शर्मा यांनी सराव केला. सामन्यासाठी स्टेडियम पूर्णपणे सज्ज झाले आहे. संपूर्ण यंत्रणा, प्रशासन, पोलिस विभाग तत्पर आहे.

सरावादरम्यान खेळाडूंनी येथील वातावरण, खेळपट्टी, मैदानावरील गवताबद्दल येथील कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. या मैदानावर मोठी धावसंख्या उभी राहील, असाही अंदाज व्यक्त होत आहे. टी-२० आणि एकदिवसीय सामन्याचा संघ वेगळा असल्याने बहुतांश खेळाडू शहरात दाखल झाले आहेत. खेळाडूंनी अडीच तास सराव केला. तिकिटे संपली! पहिले ऑनलाईन तिकिटे विकण्यात आली. त्यानंतर सिव्हिल लाईन्स येथील व्हीसीए मैदानावर ऑफलाईन तिकीट खरेदीसाठी क्रिकेट रसिकांनी एकच गर्दी केली होती. काही तासांतच तिकिटे संपून गेली. त्यामुळे काही क्रिकेट रसिकांचा तिकिटे प्राप्त न झाल्याने हिरमोड झाला.

**स्थानिकांना संधी**

- सराव सत्रामध्ये शहरातील विविध क्लबच्या वेगवान आणि फिरकी गोलंदाजांना टी-२० संघातील खेळाडूंसोबत खेळण्याची संधी उपलब्ध झाली.
- सन्मेष देशमुख, शंतनू चिखले, राहुल डोंगरवार, अध्ययन डागा, आदित्य खिलोटे आदी गोलंदाजांचा त्यात समावेश होता.
- सोवारी ५.३० ते ८.३० वाजेपर्यंत सराव सत्र घेण्यात आले.
- न्यूझीलंडच्या काही खेळाडूंनीही सराव केला.

# तेलंगणाविरुद्ध सोलापूरच्या गंगा कदमचे सलग दुसरे शतक

## दिव्यांग क्रिकेट : नागपूरच्या महेक बिरघडे हिचीही नाबाद ६७ धावांची खेळी



**भुवनेश्वर (ओडीसा) दि. १९ जानेवारी-**
भुवनेश्वर (ओडीसा) येथे सुरू असलेल्या अंध महिलांच्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत दुस-या सामन्यात महाराष्ट्रने तेलंगणाचा ६७ धावांनी पराभव केला. यात सोलापूरच्या गंगा कदम व नागपूरची महेक बिरघडे या चमकल्या.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना महाराष्ट्रने निर्धारीत २० षटकात बिन बाद २३२ धावांचा डोंगर रचला. यात सोलापूरच्या गंगा कदम हिने २२ चौकारांच्या मदतीने नाबाद १३८ धावा केल्या. तसेच नागपूरच्या महेक बिरघडे हिनेही नाबाद ६७ धावांची खेळी केली.

सोलापूरच्या गंगा हिने राष्ट्रीय स्तरावर आजचे हे तिसरे शतक केले आहे. या स्पर्धेत तिने रविवारी उत्तर प्रदेशविरुद्ध व आज सोमवारी तेलंगणाविरुद्ध असे सलग दोन सामन्यात २ शतके झळकावली आहेत.

प्रतीउत्तरात विजयी लक्ष्य गाठणारा तेलंगणा संघ १९.४ षटकात सर्वबाद १६६ धावा करु शकला. गंगाने क्षेत्ररक्षण करताना १ गडी धावबाद करीत अष्टपैलु कामगिरी केली.

त्यांच्या या नेत्रदिपक कामगिरीबद्दल सोलापूरातील सुप्रसिध्द उद्योजक राजेश दमाणी, भैरुरतन दमाणी अंध शाळेचे सचिव संतोष भंडारी, स्थानिक प्रशिक्षक राजू शेळके, क्रिकेट असोसिऐशन फॉर दि. ब्लाइंन्ड ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष पंकज चौधरी, महासचिव डॉ. माधव गोरे यांनी तिचे अभिनंदन केले.

# शालेय ड्रॉप रो बॉल स्पर्धेत सुमतीबाई स्कूलचे वर्चस्व



**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**
नेतांजी प्रशाला नीलम नगर येथे झालेल्या शालेय ड्रॉप रो बॉल स्पर्धेत पी.एस. स्कूलच्या खेळाडूंनी वर्चस्व प्राप्त केले. त्यांना क्रीडा शिक्षक अजित पाटील, रोहन घाडगे व सोमनाथ मगर यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी : १७ वर्षाखालील** : मुले : एकेरी : चिरायू अजय संदल (प्रथम). दुहेरी : ऋषिकेश देवकते, महेश शहारवाले, प्रतीक गुडशेलु, आखलेश गुंडला( द्वितीय). तिहेरी : ओम बहिरोपाटील, आयुष वाघमोडे, श्रेयश भगरे, ध्रुव चव्हाण, हर्षवर्धन माने, पियुष निकम(प्रथम).

मुली : एकेरी : सोनक्षी कसबे (प्रथम), दुहेरी : साक्षी फाटे, श्रध्दा गांगजी, अक्षरा गुल्याडकर, समीक्षा शेटे (द्वितीय). तिहेरी : अनुष्का मोरे , नेत्रा मल्लुरे, वैष्णवी चौहान, प्रभा शर्मा, देवयानी कासटा, श्रीया गांगजी(प्रथम)

**१९ वर्षांखालील** : मुले : एकेरी : हर्ष जैन (द्वितीय). दुहेरी : रमेश चौधरी, समर्थ हारिहार, आदित्य भोसले, कृष्णा वाडकर (द्वितीय). तिहेरी : ईशान भडंगे, आरुष जालनापुरे, सुरज कदम, लक्ष्य अच्युगटला, अथर्व मोरे, शिवराज सुनगार (प्रथम)

# जवाहरलाल शेतकी हायस्कूल मंगळवेढा तृतीय; राज्य शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेतील कामगिरी



**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**
राज्यस्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत मंगळवेढा येथील जवाहरलाल शेतकी हायस्कूलने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात तृतीय स्थान मिळविले. त्यांना शिवकुमार स्वामी व शहाजी ढोबळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सोलापूर जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश भुतडा, सचिव राजेंद्र माने, सहसचिव सुहास छंचुरे, अजित पाटील, शब्बीर शेख, अमरजीत रजपू, अमित गवळी, जवाहरलाल प्रशालेचे मुख्याध्यापक शंकर अवताडे यांनी अभिनंदन केले.

**संघ** : श्रेयस शिवकुमार स्वामी (संघनायक), संदेश प्रवीण चौगुले, जय राजेंद्र भेंकी, अतिस संदीप भालेकर, जयदीप पांडुरंग गवळी, प्रतीक खंडू कोकरे, स्वराज योगेश भगरे, विवेक राजकुमार कोकरे, शौर्य मामासाहेब गुंड, शौर्य सुभाष दत्तू.





# श्रीपूरच्या गोपाळराव देव प्रशालेस विजेतेपद

## विभागीय शुटींग बॉल स्पर्धा : मोहोळच्या नागनाथ विद्यालयाची बाजी

**मोहोळ, दि. १९ जानेवारी-**
पुणे विभागीय शालेय शुटींग बॉल स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात श्रीपूरच्या (ता. माळशिरस) गोपाळराव देव प्रशाला व ज. च. आगाशे कनिष्ठ महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले. हे विजयी संघ २८ ते ३० जानेवारी दरम्यान बुलढाणा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होतील. येथील नागनाथ विद्यालयाच्या सहकार्याने ही स्पर्धा विद्यालयाच्या मैदानावर पार पडली.

**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**१७ वर्षे : मुले** : गोपाळराव देव प्रशाला व ज.च. आगाशे कनिष्ठ महाविद्यालय श्रीपुर, डी पॉल इंग्लिश मीडियम स्कूल श्रीरामपूर (जि. अहिल्यानगर), सोशल उर्दू जुनिअर कॉलेज सोलापूर. **मुली** : नागनाथ विद्यालय मोहोळ, बेगम कमरुनिसा हायस्कूल सोलापूर, महात्मा फुले विद्यालय दाढ बुद्रुक(अहिल्यानगर).

**विजयी संघ : १७ मुले** : आयान तांबोळी, विराज धोत्रे, तुषार भिंगारे, शिवम मंजुळे, आयुष कांबळे, अरशद तांबोळी, म.जहीद काझी, अरमान शेख, साद काझी (देव प्रशाला) . मुली : वैष्णवी अदलिंगे, संचिता माळी, निर्मिती घाटगे, साक्षी गवळी, जुलेखा शेख, राजनंदिनी राठोड, वैष्णवी काळे, हर्षदा गजघाटे, राणी लोमटे, मनस्वी आलदार (नागनाथ विद्यालय).

**१९ मुले** : प्रथमेश माने, योगीराज ढोणे, अनिस बागवान, गुरू गायकवाड, श्रीहरी साठे, संस्कार शिंदे, विश्वजित पवार, सक्षम कोळी, ओंकार काकडे, रोहन चटके. **मुली** : कार्तिकी गरगडे, रिद्धी घाटगे, महेक शेख, श्रावणी खताळ, मसिरा तांबोळी, स्नेहल चौधरी, जिया पठाण, श्रुतिका होडगे, सिद्धा घाटगे, प्रज्ञा सिताप. ( दोन्ही संघ नागनाथ विद्यालय)

# सोलापूर, जळगाव, परभणी, नवी मुंबईची विजयी सलामी

## अक्कलकोटमध्ये राज्य सॉफ्टबॉल स्पर्धेचे थाटात उद्घाटन



**अक्कलकोट, दि. १९ जानेवारी-**
यजमान सोलापूरसह जळगाव, परभणी, नवी मुंबईने ३१वी ज्युनियर मुले व मुली राज्य सॉफ्टबॉल स्पर्धेची विजयी सलामी दिली.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट व सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजिली आहे. या स्पर्धेत राज्यातील ३० जिल्ह्यातील ९०० खेळाडूंनी भाग घेतला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शांती एज्युकेशन सोसायटीचे सचिव सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष नगराध्यक्ष महेश इंगळे होते यावेळी राज्य सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. प्रदीप तळवेलकर गुरुजी, युवा नेते प्रथमेश इंगळे, उपाध्यक्ष संतोष गवळी राज्य तांत्रिक समिती प्रमुख गोकुळजी तांदळे सांगली जिल्हा सचिव अभय बीराज ,पुणे शहर सचिव अतुल शिंदे ,परभणीचे सचिव प्रसन्नजीत बनसोडे, धाराशिव सचिव अनिल धोत्रे अकोला शहर सचिव रामेश्वर राठोड पालघर चे क्रीडा मार्गदर्शक शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रितिश पाटील अंकुश केत मालक ,रमेश शिंदे, चंद्रकांत सोनटक्के, श्रीकांत झिपरे आदी उपस्थित होते. यावेळी याप्रसंगी वेस्ट बंगाल येथे झालेल्या ४७ व्या वरिष्ठ पुरुष महिला राष्ट्रीय सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धेत राज्याच्या महिला संघाने सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सर्व महिलांचा सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून संतोष आवचार, गणेश भेटूदे, भीमा मोरे, कल्पेश कोल्हे, सोमनाथ नलावडे, शेषराज वानखेडे, विकास वानखेडे, संकेत पावले, स्वप्निल गदादे, भावना कोळी, माधुरी महाजन आदी काम पहात आहेत.

या स्पर्धेचे आयोजन सॉफ्टबॉलचे सचिव स्पर्धा सचिव प्रा.संतोष खेंडे, उपाध्यक्ष वसीम शेख, मारुती घोडके, खजिनदार गंगाराम घोडके, मारुती घोडके, परमेश्वर व्हसुरे, संचालक श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण, प्रशांत राणे, प्रबुद्ध चिंचोलीकर, संतोष पाटील, प्रशांत कदम, सिताराम भांड, सागर जगझाप, महादेव वाघमारे, समर्थ आहेरवाडी अनिकेत कांबळे हे करीत आहेत

**आजचे निकाल**

**मुले** : सोलापूर मनपा विजयी विरुद्ध छत्रपती संभाजी नगर ५-० होमरन, नवी मुंबई विजयी विरुद्ध अमरावती ५-०.

**मुली** : जळगाव विजयी विरुद्ध धाराशिव १०-०, नवी मुंबई विरुद्ध ठाणे १०-३. परभणी विजयी विरुद्ध पुणे ५-१.

# योग सेवा मंडळाचे योग शिबिर शनिवारपासून

## घशाच्या विकारांपासून सुरक्षित कसे राहावे याचेही मार्गदर्शन

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**
योग सेवा मंडळाच्या वतीने शनिवार २४ जानेवारी ते रविवार ८ फेब्रुवारी या कालावधीत योग शिबीर आयोजित केले आहे. दररोज सकाळी ६ ते ७ या वेळेत शिवस्मारक नवी पेठ येथे हे शिबीर होणार आहे. या शिबिरात २५ प्रकारचे सूक्ष्म व्यायाम तीस प्रकारची योगासने, पंधरा प्रकारचे प्राणायाम, सूर्य नमस्कार, तणावमुक्ती, ध्यान इ. योगाच्या सर्व अंगांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शिबिर पूर्ण केल्यावर प्रमाणपत्र ही दिले जाणार आहे.

सध्या सोलापुरात गड्डा यात्रेमुळे प्रदूषण खूपच वाढलेले आहे. घशाचे विकार, खोकला, सर्दी पडसे इ. मोठ्या प्रमाणात होत आहेत. या शिबिरात या विकारांपासून सुरक्षित कसे राहावे हेही शिकवणार आहे. शिबिरात योगसेवा मंडळाचे निष्णात योगपटू प्रात्यक्षिके दाखवणार आहेत. येथील ज्येष्ठ योगगुरु मनमोहन भुतडा हे या शिबिराला मार्गदर्शन करणार आहेत. त्यांनी योग थेरपिस्ट ही योग क्षेत्रातील सर्वोच्च परीक्षा दिलेली असून आजपर्यंत भारतात पंधरा दिवसांची ३६५ शिबिरे घेतलेली आहेत. अमेरिकेतही त्यांनी ११ शिबिरे घेतलेली आहेत. पंचवीस हजाराहून अधिक लोकांना त्यांनी योग शिकवलेला आहे. वेगवेगळ्या व्याधी व दुखणी यावर ते योगाद्वारे उपचार ही करतात. या शिबिरार्थींना सुखी जीवनाचा कानमंत्र योग हे त्यांनी लिहिलेले पुस्तकही दिले जाईल. या शिबिरात प्रथम येणाऱ्या पन्नास लोकांनाच फक्त प्रवेश दिला जाणार आहे. महिला व पुरुष सर्वांसाठी आहे. विद्यार्थ्यांना व तरुणांना विशेष प्राधान्य दिले जाईल, असे आवाहन योगसेवा मंडळाचे अध्यक्ष सुनील आळंद यांनी केले आहे. नोंदणीसाठी संतोष ९८२२८६६८९८ अथवा विदया ९४२२५५६७८१ यांचेशी संपर्क साधावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मारापूर येथून २८ वर्षीय पती बेपत्ता, पत्नीची पोलिसांत तक्रार

**मंगळवेढा, दि. १९ जानेवारी-**

मारापूर येथील कामाजी तानाजी सकट (वय २८) वर्षे हे घरातून कोणास काही न सांगता कोठेतरी निघून गेले असून ते अदयापपर्यंत घरी आले नसल्याने त्यांचा शोध व्हावा अशी तक्रार त्यांच्या पत्नीने मंगळवेढा पोलिसात दिली असून पोलिस त्या पतीचा कसून शोध घेत आहेत.यातील खबर देणारे स्वप्नाली सकट वय २५ वर्षे,ही सदर तरूणाची पत्नी असून दि.२८ डिसेंबर रोजी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० च्या दरम्यान खबर देणाऱ्याचे पती कामाजी सकट हे कोणास काही न सांगता मारापूर येथील राहत्या घरातून कोठेतरी निघून गेले आहेत ते अदयापर्यंत घरी आले नाहीत.त्यांचा शोध होवून मिळणेस पोलिस प्रशासनास विनंती केली आहे. त्याचे वर्णन पुढील प्रमाणे- उंची-५.५ इंच,रंग-सावळा,अंगात वांगी कलरचा टि शर्ट,ग्रे कलरची जीन पँट,शरीर बांधा सडपातळ,शिक्षण -बी.ए.उजव्या हातावर २६११ असे लिहिलेले,बोली भाषा मराठी अशा वर्णनाचा तरूण कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी तपासिक अंमलदार पोलिस नाईक ईश्वर दुधाळ (मोबा.९३२५०८४०४२) या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.





### शिरवळ येथे नगरसेवक इंगळे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १९ जानेवारी-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे हे नगरसेवक म्हणुन पाचव्यांदा निवडून आले आहेत. यानिमित्ताने शिरवळ येथील श्री स्वामी समर्थ मंडळाच्या वतीने अजित होदलूरे यांनी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान कार्यालयात चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी चनमलप्पा बिराजदार, विजयकुमार बिराजदार, राजकुमार निंबाळे, संगप्पा कुडले, धनराज निंबाळे, मेजर मुकुंद दूधभाते, काशिनाथ निंबाळे, गजानन निंबाळे, सचिन पालापुरे, नागनाथ मनगुळे, चंद्रकांत होदलूरे, संगमेश्वर चानकोटे, श्रीकांत मलवे, महेश मस्कले, लखन सुरवसे, विपुल जाधव आदींसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### हत्तूरच्या सोमेश्वर प्रशालेला जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार

**दक्षिण सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा शिक्षक भारती संघटनेकडून श्री सोमेश्वर हायस्कूल हत्तुर या प्रशालेला जिल्हास्तरीय आदर्श व उपक्रमशील शाळा पुरस्कार मिळाले. प्रमुख पाहुणे आमदार कपिल पाटील , प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख व जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. शिक्षक भारतीचे राज्यध्यक्ष अशोक बेलसरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. श्री सोमेश्वर प्रशालेचे मुख्याध्यापक निंगप्पा शिवयोगी यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक,सांस्कृतिक, क्रीडा व इतर क्षेत्रातील विविध उपक्रम प्रशालेने राबविल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाला प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ हत्तुर व हत्तुर ग्रामस्थ यांच्याकडून कौतुक होत असून प्रशालेचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## निधन वृत्त...

### लक्ष्मीबाई मसरे



**सोलापूर, दि. १९ जानेवारी -**

लक्ष्मीबाई भीमराव मसरे वय(७०) यांच्या अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचा दोन मुले, तीन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे

### संगीता चौगुले



**कासेगाव,दि.१९ जानेवारी-**

कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील संगीता तुकाराम चौगुले (वय-४८) यांचे आज दि.१९ जानेवारी रोजी दुपारी दीड वाजता हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी सहा वाजता शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, दोन विवाहीत मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### धर्मावती वंगा



**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

घोंगडे वस्ती भागातील रहिवासी धर्मावती सिद्धराम वंगा यांचे. ४.४० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा पश्चात ३ मुली, १ मुलगा, सून, नातू नातवंडे असा परिवार आहे.

### शालिनी भोसले-गवळी



**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

येथील रामलाल चौक भागात राहणाऱ्या परंतु, मूळच्या नान्नजच्या शालिनी तुकाराम भोसले-गवळी (वय८२) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या अश्विनी सहकारी रुग्णालयातील सेविका तर माजी सैनिक स्व. तुकाराम भोसले-गवळी यांच्या पत्नी होत.

# तांदुळवाडीत 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' उपक्रम

### महिलांचा विविध स्पर्धात सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.१९ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील तांदुळवाडी येथे एकता महिला मंचाच्या वतीने 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' या अभिनव उपक्रमांतर्गत मकरसंक्रांतीचे औचित्य साधून महिलांमधील कलागुणांना वाव देणे आणि सामाजिक जनजागृती करणे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून एकता महिला मंच प्रमुख प्रभाकर क्षीरसागर उपस्थित होते. तसेच उद्योजिका भाग्यश्री मोरे, एकता महिला मंच तालुका उपप्रमुख नूरजहा शेख, तालुका सचिव जस्मिन शेख आणि रोहिणी गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. महिलांचा उत्साह वाढवण्यासाठी 'गाण्याच्या भेंड्या' आणि 'संगीत खुर्ची' यांसारख्या खेळांचे आयोजन करण्यात





आले होते. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. गाण्याच्या भेंड्या स्पर्धेत नूरजहा शेख प्रथम, प्रणाली गरड द्वितीय तर रुपाली गरड तृतीय आल्या. संगीत खुर्ची स्पर्धेत पूजा कराड प्रथम, भाग्यश्री गरड द्वितीय, प्राजक्ता शिंदे तृतीय आल्या. उद्योजिका भाग्यश्री मोरे यांनी महिला सक्षमीकरण आणि उद्योगाच्या संधींबाबत सविस्तर माहिती देत महिलांनी स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. प्रभाकर क्षीरसागर यांनी 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' या उपक्रमामागची भूमिका स्पष्ट करताना विधवा महिलांना समाजात सन्मानाने जगता यावे, यासाठी सामाजिक मानसिकता बदलण्याची गरज व्यक्त केली.

विशेषतः कार्यक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या 'सेल्फी पॉईंट'वर फोटो काढण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती. यावेळी करिष्मा शेख, संगीता क्षीरसागर, मैनाबाई जाधव, दिपाली गरड व अन्य सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. करिष्मा शेख यांनी सूत्रसंचालन केले. प्रभाकर क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले. नूरजहा शेख यांनी आभार मानले.

## मंगळवेढा शहर व परिसरात गुढ आवाजाने नागरिक झाले भयभीत

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १९ जानेवारी**

मंगळवेढा शहर व परिसरात सोमवार दि.१९ रोजी २.२९ वाजता स्फोटा सारखा मोठा आवाज झाल्याने परिसर हादरुन गेला. हा आवाज नेमका कशाचा होता? याबाबत नागरिक अनेक तर्कवितर्क करण्यात मग्न होते. मात्र शासकीय यंत्रणेकडून अधिकृत माहिती वृत्त देईपर्यंत उपलब्ध झाली नाही.

मंगळवेढा शहर व परिसरात मागील दोन दिवसापासून अधून मधून स्फोटा सारखे मोठे आवाज होत असल्याने घराच्या खिडक्या,पत्रे हादरत आहेत. हा आवाज दिवसाच होत असल्याने शाळेतील मुलेही घाबरुन जात आहेत. भुकंपासारखा व विमानाच्या स्फोटासारखा आवाज असल्याचा काही लोकांनी तर्क काढला मात्र हा गुढ आवाज नेमका कशाचा होता याचे मात्र कोडे रात्री उशीरापर्यंत उलघडले नाही. गेल्या वर्षीही असेच आवाज सातत्याने होत होते. यंदाही तोच प्रत्यय पुन्हा जानेवारी महिन्यात नागरिकांना अनुभवास येत आहे. प्रशासकीय यंत्रणेने तज्ञांकडून या आवाजाचा नेमका खुलासा केल्यास नागरिकांच्या मनावरील भीती निघून जाईल यासाठी खुलासा करणे महत्वाचे असल्याचे नागरिकामधून बोलले जात आहे.

## यावली व ब्रम्हपुरीच्या ग्रामसेवकांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटनेने जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामसेवक यांना आदर्श ग्रामसेवक म्हणून सन्मानित करण्याची शासनाकडे मागणी केली होती. त्यानुसार जिल्हा परिषद स्तरावर अतिउत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामसेवक यांना शासन स्तरावरुन यशवंत पंचायत राज अभियान पुरस्कार वितरण सोहळ्यात पुरस्कार देण्यात येतात. सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीत कोविड-१९ च्या प्रादुभावामुळे पुरस्कार जाहिर केले नाही. त्यामुळे राज्य शासनाने आता या दोन्ही वर्षाकरीताचे आदर्श ग्रामसेवक पुरस्काराची यादी जाहीर केली असून यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील दोन ग्राम सेवकांचा समावेश आहे. यामध्ये बार्शी तालुक्यातील यावलीचे ग्रामसेवक किरण वाघमारे व मंगळवेढा तालुक्यातील ब्रम्हपुरीचे ग्रामसेवक संजय शिंदे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे.

प्रत्येक जिल्ह्यातुन एक या प्रमाणे सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या ग्रामसेवक यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार ग्राम विकासमंत्री यांच्या हस्ते यशवंत पंचायत अभियान पुरस्कार वितरण सोहळ्याच्या वेळी वितरीत करण्यात येतो. सर्वोत्कृष्ट ग्रामसेवक म्हणून निवड झालेल्या ग्रामसेवकांना प्रशस्तीपत्रक देण्यात येते. त्यानुसार राज्यातील आठ विभागातून ३० ग्रामसेवकांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्कार सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वर्षासाठी जाहीर झाला आहे. पुरस्कार मिळालेल्या ग्रामसेवकांचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहीणकर , उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन विभाग स्मिता पाटील व ग्रामपंचायत विभाग उपमुख्य

## 'महावितरण'चा २१ जानेवारीला जिल्ह्यात ग्राहक तक्रार निवारण दिन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ जानेवारी -**

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये २१ जानेवारी रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ.भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी निवारण्यासाठी महावितरणतर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी आयोजन करण्यात येते त्याप्रमाणे २१ रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे तरी २१ जानेवारी रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी,अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी ११ ते दुपारी १ वा.पर्यंत ग्राहकांनी



उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहा.अभियंता हे अधिकारी समक्ष उपस्थित राहून तक्रारी,अडचणी,समस्या सोडविणार आहेत.तरी पंढरपूर, बार्शी,अकलूज, सोलापूर ग्रामीण,सोलापूर शहर या ठिकाणी सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांनी आपल्या अवाजवी बील,सरासरी बील आकारणी, वीज बिल वेळेत न मिळणे,मीटर रीडिंग वेळेत न घेणे,कनेक्शन वेळेत न मिळणे, योग्य दाबाने वीजपुरवठा न होणे,वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, नविन मीटर वेळेत न मिळाल्यामुळे ग्राहकांना शेतकरी ग्राहकांना वेळेत डी. पी.बदलून न मिळणे, सोलर सिस्टीम अशा कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलचे अधिक्षक अभियंता सुनिल माने,अ.भा.ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, प्रांत सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये,जिल्हा सचिव सुहास निकते,जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा कोषाध्यक्ष सौ.ललिता वांगडे, जिल्हा सदस्य पांडुरंग अल्लापूरकर,जिल्हा मध्यस्थता कक्षाचे सदस्य संभाजी लंगोटे यांनी केले आहे.



## तहसिलदार लंगुटे यांनी घेतली प्रजासत्ताक दिन नियोजनाची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जानेवारी -**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७६ व्या वर्धापन दिन सोमवारी २६ जानेवारी २०२६ रोजी साजरा करण्यात येणार असून, शासकीय ध्वजारोहण समारंभाचा कार्यक्रम रेल्वे मैदान, पंढरपूर येथे घेण्यात येणार आहे. यासाठी दरवर्षी प्रमाणे प्रत्येक विभागाला दिलेली जबाबदारी संबधित विभागांनी यशस्वीपणे पार पाडावी अशा सूचना, तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिल्या.

प्रजासत्ताक दिनाच्या पुर्व तयारीबाबत तहसील कार्यालय पंढरपूर येथे आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बैठकीस मुख्याधिकारी महेश रोकडे, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, संबधित विभागाचे अधिकारी तसेच पंढरपूर शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते. यावेळी तहसिलदार श्री.लंगुटे म्हणाले, प्रत्येक विभागाकडे कार्यक्रमा संबंधीची जबाबदारी दिलेली असते त्या अनुषंगाने ती यशस्वीपणे पार पाडावी. सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरपालिका प्रशासनाने मैदान स्वच्छ करुन, दगड व खडी काढून, पाणी टाकून रोलींग करावे.तसेच शुध्द पिण्याच्या पाण्याची व अग्निशमन व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने वैद्यकीय पथकासह सुसज्ज रुग्णवाहिका व प्रथमोपचार व्यवस्था उपलब्ध ठेवावी.उपस्थित मान्यवरांची बैठक व्यवस्था,विद्युत व्यवस्था आदीबाबतची व्यवस्था संबधित विभागाने करावी अशा सूचनाही तहसिलदार श्री.लंगुटे यांनी यावेळी दिल्या.

## गौरीशंकर चनशेट्टी यांना आदर्श लिपिक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग १९ जानेवारी-**

वळसंग (ता.द.सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी यांना सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेतर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता जिल्हास्तरीय आदर्श लिपिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सदर पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रम सिंहगड इन्स्टिट्यूट, पंढरपूर येथे संपन्न झाला. माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते सोसायटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या



प्रमुख उपस्थितीत चनशेट्टी यांना फेटा बांधून शाल, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करून सपत्नीक गौरविण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके, तानाजी जमादार, सिदधाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, सिध्दारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, प्रा.संतोष शिंदे, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, संतोष कस्तुरे, मल्लिनाथ गौडगाव, शिवराज अष्टगी , अजय माणकोजी, स्नेहा हळगोदे, वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, सेवक कट्टेप्पा कोळी यांच्यासह गौरीशंकर चनशेट्टी यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## बोर्डाच्या प्रात्यक्षिक परीक्षेवर भरारी पथकांची नजर

### पारदर्शकतेसाठी महत्त्वकांक्षी निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१९ जानेवारी-**

यंदापासून दहावी व बारावीच्या परीक्षेतील होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी व पारदर्शकता आणण्यासाठी कठोर नियमावली अमंलात आणण्याचे धोरण आखले आहे. राज्य परीक्षा मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या बारावी विज्ञान शाखेच्या प्रात्यक्षिक परीक्षा २२ जानेवारीपासून तर दहावीच्या परीक्षा फेब्रुवारीच्या पहील्या आठवड्यात घेण्यात येणार आहेत. यंदापासून दहावी व बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लेखी परीक्षे प्रमाणेच भरारी पथके नेमण्यात आली आहेत. या फरारी पथकामार्फत प्रयोगशाळाची छायाचित्रे, जर्नल व विद्यार्थी प्रयोग करतानाची छायाचित्रे मंडळाला पाठवायची आहेत. तसेच सर्व परीक्षा केंद्रांना पक्क्या भिंतीचे कुंपण, प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे, शाळा



परिसरावर ड्रोनची नजर राहणार आहे.यंदापासून मंडळाने लेखी तसेच प्रात्यक्षिक परीक्षेवर लक्ष घातले आहे. यंदापासून भरारी पथके प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात येणार आहेत या पथकांमध्ये गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी यांचा समावेश असणार आहे.

**परीक्षकांनी तपासण्या करावयाच्या बाबी**

प्रात्यक्षिक परीक्षेवेळी भेटी देणाऱ्या पथकाने त्या शाळा / कॉलेजला अद्यावत प्रयोगशाळा आहे का ,प्रयोग शाळेत प्रयोग होतात का, विद्यार्थ्यांनी जर्नल व्यवस्थीत पुर्ण केली आहेत का या बाबी तपासून सदरचा जिओ टॅग मंडळास पाठवायचा आहे.

यामुळे यंदापासून दहावी ,बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा तसेच लेखी परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी शिक्षण मंडळाने अमुलाग्र बदल केले आहेत .यामुळे खरेतर गैरप्रकार करणाऱ्या शाळा ,कॉलेजला चांगलाच चाप बसेल फक्त याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे.

अनेक जिल्ह्यात खाजगी क्लासेस व कॉलेज यांचे साटे_ लोटे असुन वर्षभर कॉलेजला न जाता विद्यार्थी खाजगी क्लासेसला थांबता तयाठिकाणी प्रात्यक्षिक घेतलेच जात नाही मग अंतीम परीक्षेत त्या विद्यार्थ्याला बोगस मार्क्स दिले जातात याला यंदापासून आळा बसेल
**. प्रा .संजय पाटील.**

## गुरसाळे गणातून आज एकमेव अर्ज दाखल

### आज अखेर २८५ अर्जाची विक्री

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस,दि.१९ जानेवारी-**

तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती ची निवडणूक प्रक्रिया आजपासून सुरू झाली आहे. आज गुरसाळे गणातून अर्जुन हणमंत पवार याचा एकमेव अर्ज दाखल झाला तर २८५ अर्जाची विक्री झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांनी दिली. यावेळी तहसीलदार सुरेश शेजूळ उपस्थित होते. तालुक्यात जिल्हा परिषदेचे नऊ गट व पंचायत समितीचे अठरा गण आहेत. १६ जानेवारी पासून निवडणूक प्रक्रिया सुरु झाली असून बुधवार दि. २१ जानेवारी पर्यंत अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. अर्ज दाखल करण्यास अवघे दोन दिवस राहिलेत तरी अद्यापही नेते, कार्यकर्ते कागदपत्रांची जमवाजमव करीत असून तहसील कार्यालयात यासाठी गर्दी झाल्याचे दिसून आले.



# महापालिका निवडणूक : 'सोशल इंजिनिअरिंग'मध्ये पद्मशाली, लिंगायत, मराठा समाज आघाडीवर

## काँग्रेस पक्ष जात आहे 'राजकीयदृष्टया रसातळाला'

## तीन पक्षांची मानली जातेय 'राजकीय नामुष्की'



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या एकूण २६ प्रभागातील एकूण १०२ जागांसाठी निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीचा निकाल लक्षात घेता पद्मशाली, लिंगायत, मराठा समाजाचे नगरसेवक आघाडीवर असल्याचे दिसून येते. यात पद्मशाली समाज प्रथम, लिंगायत समाज द्वितीय तर मराठा समाज तृतीय क्रमांकावर राहिला आहे. दरम्यान, एससी प्रवर्ग चतुर्थ, धनगर समाज पाचवे आणि मुस्लिम समाज सहावे स्थान पटकावले.

पद्मशाली समाजाचे १७ नगरसेवक, लिंगायत समाजाचे १६ नगरसेवक, मराठा समाजाचे १३ नगरसेवक, एससी प्रवर्गातील ११ नगरसेवक, धनगर समाजाचे १० तर मुस्लिम समाजाचे ८ नगरसेवक निवडून आलेले आहेत. ब्राम्हण, वडार, मोची, लोधी व टकारी समाजाचे प्रत्येकी ३ नगरसेवक आणि व्हीजेएनटी, कोळी, लोणारी, गवळी, भोई, गोंधळी, जोशी, बेडर, चर्मकार, स्वकुळसाळी, लमाण या समाजातील प्रत्येकी एक नगरसेवक निवडून आलेले आहेत.

सोलापूर महानगरपालिकेच्या एकूण १०२ जागांपैकी भारतीय जनता पार्टीने तब्बल ८७ जागांवर विजय संपादन केला. सोलापूर महानगरपालिकेच्या आजवरच्या इतिहासात भारतीय जनता पार्टीने इतक्या मोठ्या प्रमाणात नगरसेवक निवडून आणले. सोलापूर शहर एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जायचा. मात्र गेल्या काही वर्षांपासून हा पक्ष 'राजकीयदृष्ट्या रसातळाला' जात असल्याचे दिसून येते. यंदा 'काँग्रेस'ला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. 'एमआयएम'ने एकूण ८ जागांवर मिळविलेले



यश 'अनपेक्षित' मानला जात आहे. याउलट मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीला आहे ती एक जागाही राखता आले नसल्याने यावेळी महापालिकेच्या सभागृहात 'माकपा'चा आवाज घुमणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची प्रत्येकी 'दोन शकले' उडाली आहे. शिवसेना शिंदे गटाला चार तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला एका जागेवर समाधान मानावे लागले. तर दुसरीकडे शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार गट, वंचित बहुजन आघाडी या पक्षांना 'भोपळा'ही फोडता आला नाही. त्यामुळे या तीनही पक्षांची ही 'राजकीय नामुष्की' मानली जात आहे.

### यापुर्वीही नगरसेवक म्हणून काम पाहिलेले...





यंदा निवडून आलेल्यांपैकी राजश्री कणके, नारायण बनसोडे, कल्पना कारभारी, शालन शिंदे, डॉ.किरण बनसोडे, संजय कोळी, वंदना गायकवाड, विनायक वीटकर, अनंत जाधव, मंदाकिनी तोडकरी, बिज्जू प्रधाने, सुनील खटके, अमोल शिंदे, अमर पुदाले, मेघनाथ येमूल, प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, आरिफ शेख, तौफिक शेख, श्रीदेवी फुलारे, विनोद भोसले, चेतन नरोटे, भारतसिंग बडुरवाले, जुगनबाई आंबेवाले, श्रीकांचना यन्नम, शिवानंद पाटील, बसवराज केंगनाळकर, किसन जाधव, नरेंद्र काळे, वैभव हत्तुरे, संगीता शं.जाधव, जयकुमार माने यांनी यापुर्वीही नगरसेवक म्हणून काम पाहिले होते.

---

# श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेचा विवाह सोहळा
# श्री रुक्मिणी स्वयंवर कथेस प्रारंभ

## भागवताचार्य कु.साध्वी अनुराधा दिदी शेटे यांचे निरुपण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.१९ जानेवारी-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचा विवाह सोहळा माघ शुध्द १ ते ५ या कालावधीत संपन्न होत असून, मुख्य दिवस वसंत पंचमी म्हणजे २३ जानेवारी रोजी आहे. त्यानिमित्ताने श्री विठ्ठल सभामंडप येथे दुपारी ४ ते सायं ६ या वेळेत श्री रूक्मिणी स्वयंवर कथेचे आयोजन करण्यात आले, त्याचे निरूपण पंढरपूर येथील प्रख्यात भागवताचार्य कु. साध्वी अनुराधा (दिदी) शेटे यांचे वाणीतून होणार असल्याची माहिती व्यवस्थापक संदेश भोसले यांनी दिली. श्री रूक्मिणी स्वयंवर कथा दि. १९ ते २३ जानेवारी दरम्यान दुपारी ४ ते ६ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे.

या सोहळ्याची जय्यत तयारी मंदिर समितीने केली असून, परंपरेनुसार वसंत पंचमी दिवशी स.१० ते १२ या वेळेत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा संपन्न होत आहे. त्या दिवशी येणा-या भाविकांना अन्नछत्रात विशेष भोजनाची व्यवस्था, मंदिर समितीचे संकेतस्थळ,



फेसबुक, युट्यबवरून थेट प्रेक्षपण, मंदिर परिसरात एलईडी स्क्रिन, स्वच्छता, मंडप, मंदिरात आकर्षक फुलांची सजावट, सुरक्षारक्षक नियुक्ती तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर दुपारी प्रदक्षिणा मार्गावर शोभा यात्रा काढण्यात येणार असल्याचेही मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री.भोसले यांनी सांगितले.

रुक्मिणीमातेस पारंपारिक अलंकार

श्री रूक्मिणीमातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या मळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

# काचेची बाटली, लोखंडी रॉडने हल्ला; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

शहरातील महाराणा प्रताप झोपडपट्टी, कुमठा नाका परिसरात तरुणावर काचेची बाटली, लोखंडी साखळी व लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली असून या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सुरज छत्तरसिंग कल्लावाले वय ३७ व त्यांचा भाऊ मेघराज छत्तरसिंग कल्लावाले हे घरी असताना विजय लंगडेवाले, धनंजय पंतुवाले, अक्षय पुणेकर व विशाल चौधरी सर्व रा. महाराणा प्रताप झोपडपट्टी, कुमठा नाका, सोलापूर हे विनाकारण त्यांच्या घरासमोर येत आरोपींनी संगनमत करून फिर्यादीचा भाऊ मेघराज याच्यावर पाठीमागून काचेच्या बाटलीने, लोखंडी साखळी, लोखंडी रॉड व लाकडी काठीने डोक्यावर वार करत गंभीर



जखमी करण्यात आल्याची तक्रार पोलिसात करण्यात आली आहे. तसेच फिर्यादीने सुरज भांडण सोडविण्यासाठी प्रयत्न केला असता यालाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

ही घटना दि. १५ जानेवारी रोजी रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी दि. १८ जानेवारी रोजी पहाटे १.२६ वाजता गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.




# 'तेलुगु भाषा अभिवृध्दी-एनटीआर संघम्'ने एनटी रामाराव यांना वाहिली गीत आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

प्रख्यात तेलुगु सिनेअभिनेते तथा आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री स्व.नंदमुरी तारका रामाराव यांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त सोलापुरातील तेलुगु भाषा अभिवृध्दी सार्वजनिक ग्रंथालयम् व एनटीआर अभिमानम संघम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमाद्वारे ''ओके कुलम, ओके मतम, अंदरु ओकटे... आनाटी ह्रदयाना आनंद गीतम इदेले...'' यांसह विविध तेलुगु गीतांच्या माध्यमातून गीत आदरांजली वाहण्यात आली.

पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम, भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्ज्वलन करुन कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. वेणुगोपाळ उत्तुर, रेणुका बुधारम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एन.टी. रामाराव अभिनित तेलुगु चित्रपटातील गाणी सादर केली. दिल्ली येथे झालेल्या जलतरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविलेल्या हर्षदा गोली हिचा सत्कार करण्यात आला.

प्रा.नरेंद्र गुंडेली यांनी सूत्रसंचालन केले. प्रभाकर भीमनाथ यांनी आभार मानले. यावेळी मल्लिकार्जुन कमटम, बालराज बोल्ली, तिपण्णा गणेरी, विजयालक्ष्मी गुडूर, राजीव येदुर, किसन आडम, वेणुगोपाल म्याना, अंबादास गोली, भारती गोली, श्रुतिका गोली, शिवानंद पोतन, श्रीनिवास म्हेत्रे, श्रीनिवास गणेरी, अंबादास सापपूर, ईरण्णा भंडारी, बाळकृष्णा आंबट, नरसिंग सारंगी, रामचंद्र तल्लारे, पुजारी आर, कुमार दासरी, अशोक बिटला, श्रीनिवास विडप, शंकर द्यावरकोंडा, तुकाराम वडलाकोंडा, अमर यनगंटी, नरसिंह कनकी, श्रीनिवास गोसकी आदी उपस्थित होते.

---



# भरभरुन अन् पारदर्शीपणे जनहिताची कामे करा
## मुख्यमंत्र्यांचा असा निरोप पालकमंत्र्यांनी पोहचविला नगरसेवकांना

### नूतन नगरसेवकांचे 'गेट टुगेदर' उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

सोलापूरच्या जनतेने भारतीय जनता पार्टीच्या तब्बल ८७ उमेदवारांना निवडून देत एकहाती सत्ता दिली आहे. जनहिताची कामे भरभरुन अन् पारदर्शी करा. मी आपल्या पाठीशी आहेच. शहरातील प्रलंबित विकासाची सर्व कामे मार्गी लावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले. आता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतही सर्वांनी एकदिलाने काम करावेत, असा आदेशही त्यांनी दिले, असेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी आ.सुभाष देशमुख, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.देवेंद्र कोठे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी आमदार दिलीप माने, मनीष देशमुख, सुधा अळ्ळीमोरे आदी उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीच्या नूतन नगरसेवकांच्या सत्कारदाखल हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित केलेल्या गेट टुगेदर सोहळ्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, महापालिका निवडणुकीत आम्ही विकासाचे व्हिजन घेवून उतरलो होतो. जिल्हा परिषद



आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी जर कोणी महायुतीमध्ये सहभागी झाले तर त्यांना सन्मानाने जागा दिल्या जातील. जर कोणी नाही आले तर आम्ही एकला चलो रेचे धोरण अवलंबिणार आहोत.

महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाचे सर्व आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते, उमेदवार आणि कार्यकर्ते यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यामुळे या निवडणुकीत भाजपाला घवघवीत यश संपादन करता आले. गेट टुगेदर कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्वांना एकत्रित बोलाविण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीतून भरघोस निधी देऊन शहर विकासाची अनेक कामे मार्गी लावण्यात आली. शहराच्या मुबलक पाणीपुरवठ्यासाठी, स्वच्छतेसाठीही निधी उपलब्ध करुन दिला, असेही त्यांनी सांगितले.

### ...सध्यातरी ठरले नाही

आगामी काळात कोणावर काय जबाबदारी द्यायची? हे सध्यातरी ठरले नाही. महापौर पदाचे आरक्षण जाहीर झाल्यावरच पुढील धोरणे ठरविण्यात येणार आहे.

### गिरे तोही मान उपर...

आम्ही दिल्लीत बसून नव्हे तर गल्ली-बोळात फिरुन प्रचारयंत्रणा राबविली. विरोधक आत्मपरीक्षण न करता 'गिरे तोही मान उपर' अशा अविर्भावात बोलत सुटले आहेत, अशी बोचरी टीका पालकमंत्री गोरे यांनी कोणाचे नाव न घेता केली.

# सोलापूर महापालिका निवडणूक
# निकालाचे राजपत्र प्रसिध्द

## १०२ नगरसेवकांच्या निवडीला अधिकृत शिक्का

## आता महापौर, उपमहापौर व स्थायी समिती निवडीच्या प्रक्रियेला वेग येणार; नागरी सुविधांबाबत ठोस अपेक्षा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ च्या निकालांचे अधिकृत राजपत्र आज प्रसिद्ध करण्यात आले. यामुळे १०२ प्रभागांतील निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांच्या निवडीला कायदेशीर मान्यता मिळाली असून, नव्या महापालिका स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. सोलापूर महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी हे आज प्रसिद्ध केले आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-पुणे विभागीय पुरवणी सोमवार दि.१९ जानेवारी २०२६ रोजी प्राधिकृत प्रकाशन करण्यात आले आहे. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी या निवडणूक निकालाचे प्रकटन केले आहे. गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या सोलापूर महानगरपालिकेच्या २६ प्रभागांच्या निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या एकूण १०२ सदस्यांची नावे, प्रभागाचे ठिकाण व पक्ष महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील अनुसूची ''ड'', प्रकरण १ मधील (निवडणूक नियम) ३९ (२) नुसार प्रभागनिहाय प्रसिध्द करण्यात आले आहे.

राजपत्रात प्रत्येक प्रभागातून निवडून आलेल्या उमेदवारांची नावे, पक्षनिहाय तपशील तसेच निवडणूक प्रक्रियेची अधिकृत नोंद समाविष्ट करण्यात आली आहे. यासोबतच निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेनुसार ही निवड अंतिम ठरल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. राजपत्र प्रकाशनानंतर प्रशासकीय पातळीवर पुढील कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. राजपत्र प्रसिद्ध झाल्याने आता महापौर, उपमहापौर व स्थायी समिती निवडीच्या प्रक्रियेला वेग येणार आहे. या निवडणुकीत भाजपाने तब्बल ८७ जागा जिंकत महापालिकेवर निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे. एमआयएम, शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांना मर्यादित जागांवर समाधान मानावे लागले. नव्या महापालिकेकडून शहर विकास, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि नागरी सुविधा याबाबत ठोस निर्णयांची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

| असे आहेत पुढील टप्पे |
|---|
| ▸ महापालिका सभेची पहिली बैठक |
| ▸ महापौर-उपमहापौर निवड |
| ▸ स्थायी समिती व विषय समित्यांची स्थापना |

| महापालिका पक्षनिहाय बलाबल | |
|---|---|
| भाजपा | ८७ |
| एमआयएम | ०८ |
| शिवसेना (शिंदे गट) | ०४ |
| काँग्रेस | ०२ |
| राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.गट) | ०१ |

### 'राजपत्र' म्हणजे काय ?

राजपत्र म्हणजे शासन किंवा निवडणूक आयोगाकडून प्रसिद्ध केलेली अधिकृत अधिसूचना आहे. निवडणूक निकाल राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतरच तो कायदेशीरदृष्ट्या अंतिम मानला जातो. या अधिसूचनेत निवडून आलेल्या उमेदवारांची नावे, प्रभाग क्रमांक व पक्षनिहाय तपशील नमूद असतो. राजपत्र प्रसिद्ध होईपर्यंत निकाल अनौपचारिक (तात्पुरता) असतो. राजपत्रानंतरच महापालिका स्थापन, पहिली सभा, तसेच महापौरउपमहापौर निवड प्रक्रिया सुरू होते. कोणताही कायदेशीर वाद किंवा निवडणूक याचिकेसाठी राजपत्र हा अधिकृत संदर्भ दस्तऐवज मानला जातो. राजपत्र म्हणजे निकालावर शासनाचा अधिकृत शिक्का. आणि राजपत्र प्रसिद्ध होणे म्हणजे निवडणूक प्रक्रियेचा शेवट आणि नव्या सत्ताकाळाची औपचारिक सुरुवात असते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तेरणा पब्लिक स्कूलमध्ये जाधव पिता- पुत्रांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

जिल्ह्याचा सुपुत्र राज जाधव याने खो खो खेळामध्ये राष्ट्रीय स्तरावर अतिशय उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यास देशातील सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडू' हा बहूमानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या यशाबद्दल तेरणा पब्लिक स्कूलच्या वतीने राज जाधव व प्रशिक्षक प्रा.डॉ. चंद्रजीत जाधव यांचा सत्कार केला. राज जाधव हा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे उपाध्यक्ष तसेच तेरणा महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांचा सुपुत्र असून, पित्याच्या मार्गदर्शनाखाली त्याने खो-खो खेळातील परंपरा आणि धाराशिव जिल्ह्याचा वारसा यशस्वीपणे पुढे नेला आहे.



तेरणा पब्लिक स्कूलचे अध्यक्ष पद्माकर फंड, सचिव रत्नदिप वाकूरे, प्राचार्य विलास मोरे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त...



### 'एक कुटुंब, एक वृक्ष' हळदी-कुंकू कार्यक्रमातून अभिनव उपक्रम

**तुळजापूर, दि.१९ जानेवारी -**

येथील संकल्प प्रतिष्ठान आणि धैर्यशील दरेकर मित्र मंडळाच्या वतीने संक्रात सणाचे औचित्य साधून हळदी कुंकू कार्यक्रमाच्या निमित्ताने एक कुटुंब एक वृक्ष असा उपक्रम राबविण्यात आला. पारंपारिक सणातून देखील सामाजिक उपक्रम राबवून झाडे लावा झाडे जगवा संदेश शहरात दिला आहे. महिलांना हळदी कुंकवा निमित्त १००० वृक्षांसोबत कुंड्या वाटप करण्यात आल्या. वृक्ष लागवड आणि जोपासना करण्याचा संदेश दिल्याने सौ. संध्या धैर्यशील दरेकर यांचे शहरात कौतुक केले जात आहे



### एलिमेंटरी परिक्षेत स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरचे यश

**उमरगा, दि.१९ जानेवारी -**

एलिमेंट्री परीक्षा २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या २४ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील इयत्ता सातवीतील विद्यार्थी माहीम शेख, सालेहा मणियार, श्रेया कांबळे व श्रेया कुंभार यांनी बी ग्रेड प्राप्त केला असून उर्वरित सर्व विद्यार्थ्यांना सी ग्रेड मिळाला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना भागीरथी शिंदे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, मुख्याध्यापिका सविता लोहार, गोपाळ अष्टे गुरुजी, दत्तात्रय कोकणे गुरुजी तसेच सर्व शिक्षकवर्गाने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### सलग दुसऱ्या वर्षी दिल्ली प्रजासत्ताक दिन परेडसाठी अर्जुन पाचंगेची निवड

**उमरगा, दि.१९ जानेवारी -**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील एनसीसी विभागाने सलग दुसऱ्या वर्षी दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन परेडसाठी कॅडेटची निवड करून ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट अर्जुन पाचंगे याची २६ जानेवारी २०२६ रोजी दिल्लीच्या राजपथावर होणाऱ्या रिपब्लिक डे कॅम्पमध्ये 'संबळ' या पारंपरिक वाद्य सादरीकरणासाठी महाराष्ट्र संघातून निवड झाली आहे. मागील वर्षी कॅडेट वैभवी शेंडगे हिने ड्रिल प्रकारात सहभाग नोंदवला होता. सलग दोन वर्षे आरडीसीसाठी कॅडेट देणारे लातूर बटालियनमधील हे पहिले महाविद्यालय ठरले आहे. गरीब परिस्थितीतून आलेल्या अर्जुनच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत असून महाविद्यालय, एनसीसी अधिकारी व धाराशिव जिल्ह्यातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



### पत्रकारांचा ब्रह्मांडनायक देवबाळूमामा मंदिरात भव्य सत्कार

**परंडा, दि.१९ जानेवारी -**

ब्रह्मांडनायक देवबाळूमामा मंदिर, परंडा यांच्या वतीने परंडा तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पत्रकारांचा भव्य सत्कार सोहळा १८ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता पार पडला. या सोहळ्यात पत्रकार आप्पासाहेब बापूसाहेब शिंदे यांचा मंदिर समितीच्या वतीने सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल व धार्मिक क्षेत्रातील उत्कृष्ट बातमीदारीबद्दल गौरवण्यात आले. सन्मान वितरण हभप. बालाजी महाराज बोराडे (झी टॉकीज फेम), हभप. सतिश महाराज सूर्यवंशी, हभप. दत्ता महाराज हुके, हभप. नागेश महाराज मांजरे व मंदिर समितीच्या प्रमुख केशरताई वैरागे (मदने) यांच्या हस्ते करण्यात आले. याच दिवशी ब्रह्मांडनायक देवबाळूमामा मंदिर, परंडा येथे अमावस्येच्या औचित्याने भंडारा उत्सवही मोठ्या उत्साहात पार पडला. भजन-कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी परंडा पंचकृषीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अर्ज भरण्यास दोनच दिवस शिल्लक; राजकीय सस्पेन्स कायम




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असतानाही अद्याप एकाही राजकीय पक्षाने आपले अधिकृत उमेदवार जाहीर केलेले नाहीत. त्यामुळे तुळजापूर तालुक्यात इच्छुक उमेदवारांची उमेदवारी मिळवण्यासाठी जोरदार धावपळ सुरू झाली असून राजकीय वातावरण तापले आहे.

विशेषतः तालुक्यातील जळकोट व नंदगाव जिल्हा परिषद गटात भाजपची उमेदवारी कुणाला मिळणार, याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. या दोन्ही गटांमध्ये भाजप निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी देणार की दुसऱ्या पक्षातून भाजपमध्ये आलेल्या व्यक्तींना उमेदवारी देणार, याबाबत चर्चा रंगल्या आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यास केवळ दोन दिवस उरले असतानाही तुळजापूर तालुक्यात कोणत्याच पक्षाने उमेदवार जाहीर न केल्यामुळे इच्छुकांमध्ये धाकधूक वाढली आहे. भाजपकडून या निवडणुकीसाठी इच्छुकांची संख्या मोठी असून, इतर पक्षांच्या तुलनेत भाजपमध्ये उमेदवारीसाठी जास्त गर्दी दिसून येत आहे. ही निवडणूक कोणत्याही परिस्थितीत जिंकायचीच, असा चंग भाजपने बांधल्याने पक्षाने सर्व्हेच्या आधारे जिंकण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनाच संधी देण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळे भाजपकडील उमेदवारीचा सस्पेन्स अद्याप कायम आहे.

दरम्यान, ही निवडणूक महायुती व महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढवली जाणार की सर्व पक्ष स्वबळावर मैदानात उतरणार, हेही अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे सर्वत्र संभ्रमाचे वातावरण आहे. ही निवडणूक भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील व भाजप नेते सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली लढवली जाणार आहे. तर दुसरीकडे भाजपला टक्कर देण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकत्र येणार की स्वतंत्रपणे लढणार, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

जळकोट जिल्हा परिषद गट हा सर्वसाधारण महिला वर्गासाठी राखीव असून, या गटातून भाजपचे माजी जि. प. सदस्य गणेश सोनटक्के यांनी आपल्या पत्नीसाठी उमेदवारी मागितली आहे. जळकोट गटात गणेश सोनटक्के व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आशिष सोनटक्के यांचे प्राबल्य लक्षात घेता भाजपकडून यांनाच उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. तर नंदगाव जिल्हा परिषद गट हा सर्वसाधारण पुरुष वर्गासाठी राखीव असून, या गटातून भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यात सक्रिय असलेले सिद्धेश्वर कोरे यांनी उमेदवारीची मागणी केली आहे. त्यांच्या कार्याचा आणि पक्षनिष्ठेचा विचार करता भाजपकडून त्यांनाच उमेदवारी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**वार्तापत्र...**
**विलास येडगे**

अखेर उमेदवार जाहीर झाल्यानंतरच कोणता उमेदवार कोणत्या पक्षाकडून व कोणत्या गटातून निवडणूक लढवणार हे स्पष्ट होणार असून, यासाठी आणखी दोन दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## रेड्यांच्या बेकायदेशीर टक्करीप्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेड्यांच्या बेकायदेशीर टक्करीचे आयोजन करून प्राण्यांवर निर्दयता केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आरोपींची नावे महेश चौधरी (रा. उंबरे कोठा, धाराशिव), बाजीराव करवर (रा. राघुचीवाडी), अमित झेंडे (रा. सांजा चौक, धाराशिव), भाऊ पवार (रा. जुना बस डेपो, धाराशिव), मोहसिन पठाण (रा. धाराशिव), अकबर शेख (रा. धाराशिव), अकबर कुरेशी व अनिकेत गजने (रा. धाराशिव) अशी आहेत.

दि.१८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे १.२५ वाजता वलगुड शिवारात आरोपींनी बेकायदेशीरपणे रेड्यांच्या टक्करीचे आयोजन करून रेड्यांना आपसात झुंजवले. या प्रकारात रेड्यांशी निर्दय व क्रूर वागणूक देण्यात आली असून त्यांना जखमी करण्यात आले.

या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात सरकारतर्फे तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपींविरुद्ध प्राण्यांशी क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ (१) (अ), ११ (१)(म), ११ (१) (न) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## अवैध गांजाविरोधी कारवाईत दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गांजाविरोधी कारवाई दरम्यान लोहारा पोलिसांनी दि.१८ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ५.२० वाजता मोठी कारवाई केली आहे.

या कारवाईत आरोपी नामे गोरीबी जबार शेख (वय ७८) व अली अकबर अब्दुल शेख (रा. जेवळी उत्तर, ता. लोहारा, जि. धाराशिव) हे दोघे आपल्या राहत्या घरात चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ५.२६६ किलो वजनाचा गांजा सदृश्य अमली पदार्थ बाळगताना आढळून आले. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे १ लाख ५ हजार ३२० रुपये इतकी आहे.



याप्रकरणी लोहारा पोलीस ठाण्याच्या पथकाने संबंधित मुद्देमाल जप्त करून आरोपींविरुद्ध एन.डी.पी.एस. क्ट अंतर्गत कलम ८ (क), २० (बी) (ळळ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास लोहारा पोलीस करीत आहेत.

## डॉ. जितेंद्र कानडे यांनी जि.प. निवडणुकीसाठी अर्ज दाखल

### अणदूर गटात हाय-व्होल्टेज लढत निश्चित

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१९ जानेवारी -**

धाराशिव जिल्हा परिषद निवडणुकीसाठी अणदूर गटातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून ग्रामपंचायत सदस्य व धाराशिव जिल्हा उपप्रमुख डॉ. जितेंद्र कानडे यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीकडून त्यांनी अर्ज दाखल केल्याने या गटातून हाय-व्होल्टेज लढत पाहायला मिळणार आहे.



डॉ. जितेंद्र कानडे हे गेल्या चार टर्मपासून ग्राम पंचायत सदस्य आहेत आणि त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओम राजे निंबाळकर व आमदार कैलास पाटील यांचे ते निकटवर्तीय सहकारी असून, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीमुळे मतदारसंघात चुरशीची लढत होण्याची शक्यता वाढली आहे.

अणदूर जिल्हा परिषद व त्या खालील अणदूर व चिवरी पंचायत समितीमध्ये सर्वसाधारण पुरुष उमेदवारासाठी आरक्षण असल्यामुळे ही जागा अत्यंत महत्वाची ठरली आहे. भारतीय जनता पक्षाकडून अॅड. दीपक आलूरे यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. तसेच अणदूर पंचायत समिती गणासाठी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे नातू व भाजप युवा नेते सुनील चव्हाण यांचे चिरंजीव रणवीर चव्हाण हे निवडणूक लढवणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीकडून अणदूर पंचायत समितीसाठी कोणाला उमेदवारी मिळणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

एकंदरीत, दिग्गज उमेदवारांच्या रिंगणात उतरल्याने ही निवडणूक अटीतटीची व प्रतिष्ठेची होणार असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष अणदूर गटाकडे लागले आहे.

## 'बिगरहुंडा' विवाह सोहळ्यास उपमुख्यमंत्री शिंदे उपस्थित राहणार : कोकाटे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने 'एक हात मदतीचा' उपक्रमांतर्गत धाराशिव येथे रविवार, दि.८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या मोफत जिल्हास्तरीय (बिगरहुंडा) सामुदायिक विवाह सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतः उपस्थित राहणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष आकाश कोकाटे यांनी दिली.



समितीचे अध्यक्ष आकाश कोकाटे, माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख, संजय मुंडे व धनंजय राऊत यांनी मुंबईतील नंदनवन बंगल्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निमंत्रण पत्रिका दिली.

दरम्यान, अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्ह्यात झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर या विवाह सोहळ्यामुळे नागरिकांना दिलासा मिळेल, असे नमूद करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोहळ्याच्या आयोजनाबद्दल समितीचे विशेष कौतुक केले.

## हळदी-कुंकू कार्यक्रमातून महिलांचा सन्मान व सबलीकरण

### महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध : नगरसेविका प्रियंका गंगणे...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जानेवारी -**

तुळजापूर येथे मकर संक्रांतीचे औचित्य साधून द स्कायलंड हॉटेल, नवीन बसस्थानक शेजारी महिलांच्या सन्मान व सबलीकरणासाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन नगरसेविका सौ. प्रियंका विजय गंगणे यांच्या वतीने करण्यात आले. प्रभाग क्रमांक ७ व १० मधील महिलांसाठी आयोजित या कार्यक्रमाला सर्व धर्मातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे या कार्यक्रमात मुस्लिम महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती लक्षणीय ठरली.



यावेळी नगरसेविका प्रियंका विजय गंगणे यांनी उपस्थित महिलांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा देत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. महिलांच्या सामाजिक, आर्थिक तसेच आरोग्यविषयक प्रश्नांचा पालिकेच्या माध्यमातून प्रामाणिकपणे आणि सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात महिलांसाठी भेटवस्तू, अल्पोपहार तसेच उखाणे व संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या उपक्रमामुळे महिलांमध्ये आनंदाचे व आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. या हळदी-कुंकू कार्यक्रमास जवाहर गल्ली, दीपक चौक, क्रांती गल्ली, गोपाळ नगर व लोहिया परिसरातील महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शेवटी सपना पांढरे, राजश्री शितोळे, आरती पांढरे, पल्लवी शिंदे, पूजा गंगणे, रोहिणी गंगणे व प्रतिक्षा गंगणे यांच्यासह सर्व महिला भगिनींचे संयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

## शहर स्वच्छतेबाबत चौकशी करून अहवाल देण्याची काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ जानेवारी -**

शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून, ज्या संस्थेला शहर स्वच्छतेचे काम देण्यात आले आहे ती संस्था आपले काम व्यवस्थित करत नसल्याचा आरोप करत या संस्थेच्या कामकाजाची चौकशी करून त्याचा अहवाल सादर करावा, अशी मागणी नगरपालिकेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते मारुती खारवे, उपगटनेते आकाश कुलकर्णी व नगरसेवक सुधीर पोतदार यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.




निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाच्या दुर्लक्षामुळे शहरातील प्रत्येक प्रभागात मोठ्या प्रमाणात घाण साचली असून त्यामुळे अनेक भागातील नागरिकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे.

गेल्या एक-दोन महिन्यांपासून शहरातील गटारे व रस्त्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

मात्र, याकडे नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शहर स्वच्छतेचे कंत्राट मिळालेली संबंधित संस्था स्वच्छतेचे काम समाधानकारक पद्धतीने का करत नाही, याची सखोल चौकशी करावी.

संस्थेच्या निष्काळजीपणामागील कारणे स्पष्ट करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल आम्हाला द्यावा, अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी निवेदनात केली आहे.

या निवेदनावर काँग्रेस पक्षाचे गटनेते मारुती खारवे, उपगटनेते आकाश कुलकर्णी तसेच नगरसेवक सुधीर पोतदार यांच्यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शेतातील पंप व साहित्य चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

कळंब पोलीस ठाण्यात शेतातील पंप चोरीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सुरेश हरीदास फरताडे (वय ४७, रा. मस्सा खं., ता. कळंब, जि. धाराशिव) यांच्या मस्सा शिवारातील शेत गट नं. ६७८ मधील विहिरीवर लावलेला ०३ एच.पी. कंपनीचा पंप, स्टार्टर व १०० फूट वायर असा एकूण २२,९७१ रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात व्यक्तीने दि.५ जानेवारी रोजी चोरून नेल्याचे निदर्शनास आले.

# जिल्हयात सर्वाधिक मताधिक्याने विजयी करा - आमदार कराड

## पानगाव जिप गटातून ऋषिकेश कराड यांची उमेदवारी घोषित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर १९ जानेवारी :** केंद्रात आणि राज्यात भाजपाच्या नेतृत्वातील सरकार असल्याने ग्रामीण भागातील विकासाला गती देण्यासाठी गोरगरीब, सर्व सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीतही भाजपाचीच सत्ता येणे गरजेचे आहे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. विविध गावातून आलेल्या मागणीनुसार पानगाव जिल्हा परिषद गटातून ऋषिकेश कराड यांची तर पानगाव पंस गणातून रंजना मारुती गालफाडे आणि कोष्टगाव पंस गणातून जयश्री संजय डोंगरे यांची उमेदवारी घोषित करून जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्याने विजय झाला पाहिजे असे बोलून दाखवले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पानगाव जिल्हा परिषद मतदार संघाचा विजय संकल्प मेळावा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी पानगाव येथे झाला मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव अनाने मामा हे होते तर या प्रसंगी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, सुकेश भंडारे, अनंत चव्हाण, सतीश आंबेकर, हरीकृष्ण गुर्ले, दिगंबर येडले, अमर चव्हाण, उत्तरेश्र्वर हेरकर, धोंडीराम हलकुडे, श्रीकृष्ण

### ग्रामीण भागाच्या विकासासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात येणे गरजेचे

जाधव, सरपंच मीनाताई मोटाडे, उपसरपंच प्रेमलता वाघमारे, ललिता कांबळे, सुंदर घुले, भागवत गीते, ज्ञानोबा गुडे, भास्कर लहाने, प्रकाश केदार, माधव घुले, राजेंद्र गोरे, अशोक राठोड, वैजनाथ लहाने, राहुल मोटाडे, शिला आचार्य यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी आ. कराड यांचे पानगाव नगरीत आगमन होताच मोठ्या उत्साहाच्या ढोल ताशाच्या गजरात फटाक्याची आतिषबाजी करत जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपाच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. मेळाव्याच्या प्रारंभी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, रेणापूर तालुका भाजपाचा बालेकिल्ला आहे या तालुक्याने लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे नेतृत्व उभे केले. मुंडे साहेबांनी रेणापूरची ओळख देशात केली. रेणापूर पानगाव भागाला न्याय देण्याचे आणि खरा विकास काय असतो हे त्यांनी दाखवून दिले. त्यानंतर काँग्रेसवाल्यांनी या भागाला विकासापासून वंचित ठेवले. विधानसभा निवडणुकीत भाजपचा विजय झाल्याने मुंडे साहेबानंतर रेणापूर पानगाव भागात अनेक गावागावातील विकासाला गती देण्याचे आणि मोठ्या प्रमाणात निधी मिळून देण्याचे भाग्य मला मिळाले असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिना निमित्ताने राज्यातील ७३ मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचा निर्णय झाला त्यात पानगावच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा समावेश करून या कामाकरिता १४ कोटी रुपयांचा निधी मिळवून देण्यात मला यश मिळाले मात्र त्यातही काहीजण राजकारण करत आहेत हे दुर्दैवी असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, बस स्थानक नूतनीकरणसह ग्रामीण रुग्णालय, पशुवैद्यकीय दवाखाना शासनाच्या मंजुरी स्तरावर असून पानगाव येथील शादीखाना वर्षभरात पूर्ण करून देण्याची ग्वाही दिली. पानगावकरांनी जे जे मागितले ते ते आजपर्यंत देण्याचा प्रयत्न केला आहे. रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या चार आणि पंचायत समितीच्या आठही जागेवर भाजपाचा विजयी करण्याचा आणि पानगावची जागा जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्याने विजयी करण्याचा संकल्प सर्वांनी करावा असे बोलून दाखविले.

यावेळी बोलताना माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, सत्तेचे




पाठबळ असल्याशिवाय विकासाला गती मिळत नाही. काँग्रेसवाले भूलथापा देऊन संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करतील त्यांच्यापासून सावध राहावे. केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता असल्याने जिल्हा परिषद पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात आली पाहिजे आ. रमेशआप्पा कराड यांच्या विकास कामांना साथ देऊन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे ताकद उभी करावी असे बोलून दाखवले.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांची रेणापूर पानगाव ही कर्मभूमी आहे या भूमीला नमन करून यावेळी बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, मुंडे साहेबांनंतर रमेशआप्पांनीच या भागाच्या विकासाला गती देण्याचे काम केले आहे. पानगाव रस्त्याच्या माध्यमातून जनतेला कोणी वेठीस धरले, विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या अडून कोण राजकारण करतायत याची जाणीव जनतेला असून स्वतःची पोळी भाजून घेण्यासाठी प्रत्येक निवडणुकीत वेगवेगळे फंडे करणाऱ्या पासून सावध राहावे. जनतेची सेवा करण्यासाठी आम्हाला सत्ता हवी आहे तेंव्हा आपण निश्र्चितपणे भाजपाच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

यावेळी श्रीकिशन जाधव, आयुब मणियार, ललिता कांबळे यांनी मनोगत व्यक्त करून पानगाव मतदार संघातून ऋषिकेश कराड यांना उमेदवारी देण्याची मागणी केली प्रारंभी माजी सरपंच सुकेश भंडारे यांनी आ. रमेशआप्पांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाचा आढावा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी सतीश आंबेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या मेळाव्यास सतीश कुलकर्णी, सुधाकर बोराडे, वैजनाथ लहाने, राम भताने, संपत कराड, भूषण संपत्ते, निवृत्ती लहाने, रफिक पठाण, बंडू केंद्रे, मारुती गालफाडे, बाबुराव कस्तुरे, धर्मराज बोराडे, शिवाजी जाधव, बालाजी केंद्रे, प्रकाश गालफाडे, भास्कर कांदे, इस्माईल मनियार, दत्ता मुंडे, संजय केदार, लक्ष्मण खलंग्रे, विलास नागरगोजे, प्रल्हाद पोटे, त्र्यंबक भताने, बसवराज गुरफळे, नाथराव गीते, ज्ञानेश्र्वर शेंडगे, उमाकांत मोटाडे, अक्षय चव्हाण, खदीर अत्तार, कार्तिक गंभीरे, अविनाश मोटाडे, दत्ता आंबेकर, बाबासाहेब केंद्रे, जब्बार शेख, विठ्ठल डोंगरे, आयुब मणियार, जयराम कस्तुरे, गोविंद नरहरे, रमाकांत वाघमारे, विष्णू केंद्रे, रोहित भंडारे, सुरज मोटाडे, प्रवीण संपत्ते, नितीन फुले, रामेश्र्वर कस्पटे, माधव हरिदास, ऋषिकेश हरिदास, विलास केदार, अभय वैष्णव, विशाल कलवले, वैभव रोकडे, निखिल शेरखाने, शुभम पुरी, हेमंत गोरे यांच्यासह पानगाव गावातील त्याचबरोबर जिल्हा परिषद मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते लोकप्रतिनिधी आणि मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिन्मयानंद समाधी सोहळ्याची उत्साहात सांगता

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, १९ जानेवारी :** रेणापूर पासून जवळच असलेल्या दर्जीबोरगाव येथील श्रीसदगुरु चिन्मयानंद स्वामी समाधी सोहळा सप्ताहाची सोमवारी उत्साहात सांगता झाली. या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी लाभ घेतला.

या सोहळ्यात भागवताचार्य हभप. प्रकाश महाराज साठे ( धारूर) यांची भागवत कथा झाली. सप्ताहादरम्यान नित्य हरिपाठ, कीर्तन, जागर व काकडा आरती असे विविध धार्मिक कार्यक्रम झाले. हभप. मधुसूदन महाराज ठाकूर, प्रकाश महाराज साठे, शंकर महाराज शेवाळे, जयेश महाराज भाग्यवंत , ज्ञानेश्र्वर महाराज कदम, विशाल महाराज खोले, ज्ञानेश्र्वर महाराज पठाडे यांचे दररोज रात्री कीर्तन झाले. त्याचाही भाविकांनी लाभ घेतला. उत्साहात सपन्न झाली. सोमवारी १९ भव्य काल्याचे किर्तन जयवंत महार–ाज बोधले पंढरपुरकर यांनी केले . कीर्तनानंतर भव्य महाप्रसादाचाचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ हजारो भाविक भक्तांनी घेतला. या यात्रेनिमित्त बच्चे कंपनीसाठी राहाट पाळणे, विविध शोभेच्या वस्तुचे स्टॉल, महिला साठी लागणाऱ्या वस्तुचे स्टॉल या वर्षी मोठ्या प्रमाणात लावण्यात आले असल्याचे पाहावयास मिळाले. अंबाजोगाई येथील कै.जोधाप्रस–ाद मोदी यांच्या स्मरणार्थ शोभेची दारू उडविण्यात आली. दि. २० जानेवारी मंगळवार दुपारी १ ते ६ वेळेत जंगी कुस्त्या होणार आहेत. या सप्ताह निमीत्त दर्जी बोरगाव सह परीसरातील हजारो कार्यकत्यानी आपली सेवा सर्मपीत केली . या सोहळ्यात ग्रामस्थ, व्यापारी, शेतकरी, नागरिक, परिसरातील भजनी मंडळ यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.



# किनगाव येथील वसंतराव नाईक आश्रम शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, १९ जानेवारी :** येथील वसंतराव नाईक प्राथमिक आश्रम शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते शुक्रवारी ( दि१६) रोजी झाले. यावेळी चिमुकल्यांनी देशभक्ती व भावगीतावर सुरेख नृत्य करत प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी संस्थेचे सचिव तथा मुख्याध्यापक प्रशांत गुळवे हे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.व्ही. के.जाधव, सतीश क्षिरसागर, ग्रामपंचायत सदस्य शुभम मुंडे, अंधोरी सरपंच ज्ञानोबा बिंगने, विष्णू आलापुरे, धम्मानंद कांबळे, सिद्धेश्र्वर गुट्टे तर स्वागत अध्यक्ष म्हणून हेमंत गुळवे आधी मान्यवर उपस्थित होते स्नेहसंमेलनाच्या यशस्वीते साठी बि.डी. ढाकणे, ए.डी. मोरे,एक.व्ही. तिडके,



आय.डी. कराड, नितीन चिकटे, एस. एम. स्वामी, गौतम वनवे, के.बी. घुले, व्ही. एस. जांभळदरे, एन. व्ही. भिकाने, एम. एस. गोंडगावे, डी. ए . जाधव, एम.जी. क्षिरसागर, यु.बी. शेख, आदींनी परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय व्यवसाय मार्गदर्शन स्पर्धेत डॉ. संदीपान जगदाळेंचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, १९ जानेवारी :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) पुणे व प्रादेशिक विद्या प्राधिकरण, व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धेत दयानंद कला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संदीपान गुरुनाथ जगदाळे यांनी उल्लेखनीय यश संपादन करत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. तसेच त्यांनी राज्यातील अव्वल दहा शिक्षक–समुपदेशकांमध्ये स्थान मिळविले आहे.



ही स्पर्धा विद्यार्थ्यांना करिअर निवड, स्वयंरोजगार, उद्योजकता तसेच रोजगाराभिमुख कौशल्ये याबाबत योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातून शेकडो शिक्षकांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी आठ विभागांतील निवडक प्रत्येकी पाच शिक्षक अशा एकूण ४० शिक्षकांनी अंतिम फेरीत सादरीकरण केले. यामधून निवडक १० शिक्षकांची अंतिम निवड करण्यात आली.

डॉ. संदीपन जगदाळे यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी या विषयावर प्रभावी व मार्गदर्शक सादरीकरण केले. सादरीकरणामध्ये दिव्यांगत्वाचे प्रकार, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करिअर संधी, शासकीय सवलती, दिव्यांग व्यक्तींची प्रेरक उदाहरणे, आत्मनिर्भर भारतात दिव्यांगांचे योगदान, तसेच योग्य समुपदेशन पद्धती याविषयी सविस्तर मांडणी करण्यात आली. त्यांच्या सादरीकरणामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या दिशेने सकारात्मक मार्गदर्शन मिळू शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शाह, सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, कार्यालय अधीक्षक संजय व्यास यांनी डॉ. जगदाळे यांचे अभिनंदन केले. तसेच डायटचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर व स्पर्धा संयोजक अधिव्याख्याता प्रा. अनिल जाधव, प्रा. उर्मिला भांदर्गे यांनीही त्यांच्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

डॉ. संदीपन जगदाळे यांच्या या यशामुळे शिक्षण क्षेत्रात समावेशक शिक्षण आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन या विषयाला नवी दिशा मिळणार असून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार आहे.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रियेबाबत राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, १९ जानेवारी :** राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे सर्व राजकीय पक्ष, उमेदवार यांनी पालन करणे आवश्यक आहे. या नियमांबाबत राजकीय पक्षांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना, उमेदवारांना माहिती द्यावी. या नियमांचे पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततामय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आज येथे केले.

लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या राजकीय पक्ष पदाधिकारी यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके अविनाश कोरडे, सुशांत शिंदे, मंजुषा लटपटे, रोहिणी नऱ्हे–विरोळे, संदीप कुलकर्णी, गणेश पवार, अहिल्या गाठाळ, संगीता टकले, स्वाती दाभाडे




यांच्यासह आदर्श आचारसंहिता कक्ष नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, निवडणूक खर्च कक्षाचे नोडल अधिकारी राजेंद्र नागणे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

नामनिर्देशन पत्र भरण्यापासून ते निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विविध नियम ठरवून दिले आहेत. या नियमांचे पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे. तसेच निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासूनच जिल्हा परिषद व संबंधित पंचायत समिती क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात पथके स्थापन केली आहेत. त्यामुळे राजकीय पक्ष, उमेदवार यांनी आवश्यक परवानगी घेवूनच प्रचार सभा, रॅली याचे आयोजन करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले.

काही ठिकाणी नवीन मतदान केंद्र करण्यात आली असल्याने संबंधित मतदारांना याबाबत माहिती देण्यात येत आहे. तसेच दुबार मतदारांकडून घोषणापत्र भरून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. प्रचार विषयक विविध परवानग्या देण्यासाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. राजकीय पक्ष, उमेदवार यांच्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या दिशानिर्देशांची, तसेच निवडणूक विषयक महत्वाच्या नियमांची माहिती यावेळी उपस्थित राजकीय पक्ष पदाधिकारी यांना देण्यात आली.

# क्रीडा खात्याचा कारभार सांभाळताना राज्यातील खेळ व खेळाडूंचा दर्जा उंचावण्याचे काम केले : आमदार बनसोडे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, १९ जानेवारी :** क्रीडा विभागाचा कारभार हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम खेळ व खेळाडूंचा दर्जा उंचावण्यासाठी काम करण्याचे ठरवले त्यानुसार खेळांना व खेळाडूंना मंजूर असलेल्या तरतुदी पेक्षा दहापट अधिक निधी उपलब्ध करून देण्याचे काम केले सर्वसामान्य खेळाडूंना यामुळे न्याय मिळत असल्याचे मत माजी क्रीडामंत्री आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर येथील स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुलात महाराष्ट्र शासनाच्या युवक सेवा संचनालय व लातुर जिल्हा टेनिस व्हॉलीबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शाळेय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धा उत्सहात संपन्न झाल्या.यावेळी बोलत होते.

यात १४, १७ व १९ वर्षाखालील मुला मुलींमध्ये कोल्हापूर, नाशिक व अमरावतीचे संघ अव्वल ठरले आ–हेत.

या राज्यस्तरीय स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे माजी क्रीडामंत्री



आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधीर जगताप होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार गोविंदराव केंद्रे,माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, प्राचार्या ज्योती स्वामी, टेनिस व्हॉलीबॉल जनक डॉ. व्यंकटेश वांगवाड, आंतरराष्ट्रीय लेखक व दिग्दर्शक संतोष राम, महाराष्ट्र राज्य टेनिस व्हॉलीबॉल असोसिएशनचे राज्य सरचिटणीस गणेश माळवे, राज्य उपाध्यक्ष रामेश्र्वर कोरडे, राज्य सहसचिव मिलिंद कुलकर्णी, संस्थापक सदस्य प्रा. रमाकांत बनसोडे, संजय ठाकरे, जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. ओमप्रकाश साकोळकर, प्रा. डॉ. बस्वराज धोतरे, नारायण रोडगे, मनोज साकोळकर, देवर्जनचे सरपंच अभिजीत साकोळकर, असोसिएशनचे सचिव जयराज धोतरे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या वयोगटात प्रथम कोल्हापूर, व्दितीय नाशिक तर तृतीय छत्रपती संभाजीनगर तर मुलींच्या स्पर्धेत प्रथम कोल्हापूर, व्दितीय अमरावती तर तृतीय पुणे यांनी मिळवला. १७ वर्षाखालील मुलांच्या वयोगटात प्रथम नाशिक, व्दितीय अमरावती तर तृतीय छत्रपती संभाजीनगर तर मुलींच्या स्पर्धेत प्रथम कोल्हापूर, व्दितीय मुंबई तर तृतीय येण्याचा मान नाशिकने मिळवला.१९ वर्षाखालील मुलांच्या वयोगटात प्रथम अमरावती, व्दितीय नाशिक, तृतीय छत्रपती संभाजीनगर तर मुलींच्या स्पर्धेत प्रथम नाशिक, व्दितीय कोल्हापूर तर तृतीय येण्याचा मान छत्रपती संभाजीनगरने मिळवला.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो–लीस उपनिरीक्षक राष्ट्रपाल लोखंडे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी जयहिंद फार्मसीचे प्राचार्य गणेश तोरसलवाड, अमोल तलवाडकर, बिभीषण मद्देवाड, सिध्दार्थ सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी असोसिएशनचे अंतेश्र्वर रोडगे, गंगाधर दवणीपुरगे, चक्रधर माने, संग्राम बिरादार, अश्र्लेषा गडदे आदींनी परीश्रम घेतले.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस सहा महिन्यांची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१९ जानेवारी -**

उमरगा शहरातील गौतम नगर परिसरात युवती सेना मराठवाडा निरीक्षक ॲड. आकांक्षाताई चौगुले यांच्या नेतृत्वाखाली व संदीप चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. महिलांमधील आपुलकी, स्नेह व सामाजिक एकोपा जपण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमास उषा गायकवाड, शिवाई गायकवाड, नगरसेविका स्वाती स्वामी, आश्विनी सोनकांबळे, वंदना चौगुले, कान्होपात्रा सोनकवडे, मंगल चौगुले, मीरा कटके, प्रियंका साबणे, संगीता सोनकवडे, तृप्ती कटके, रेश्मा सोनकवडे, आशा खरटमोल, माया कटके, सविता कावळे, राजनंदिनी कटके यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.



# ग्रामसभा,शाळा व महाविद्यालयातून व्यापक प्रमाणात जनजागृती करा : जिल्हाधिकारी पुजार

### जिल्हा समन्वय समितीची बैठक...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

जिल्ह्यात कुष्ठरोग निर्मूलनासाठी गावपातळीवरील ग्रामसभा तसेच शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात जनजागृती राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान २०२६ प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने जिल्हा समन्वय समितीची बैठक आज जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत जिल्हाधिकारी पुजार यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. स्पर्श कुष्ठरोग जनजागृती मोहिम २०२६ चे घोषवाक्य भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया असे आहे.

दि. २६ जानेवारी २०२६ रोजी जिल्ह्यात होणाऱ्या ग्रामसभांमध्ये आरोग्य शिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन, जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन वाचन, सरपंच/ग्रामप्रमुखांचे कुष्ठरोगाविषयी भाषण, शाळकरी मुलीमार्फत सपना संदेश वाचन, तसेच कुष्ठरोग प्रतिज्ञा घेतली जाणार आहे. रोगमुक्त कुष्ठरुग्ण उपलब्ध असल्यास त्यांचा सत्कार करून योग्य उपचाराने कुष्ठरोग बरा होतो, याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

त्याच दिवशी ध्वजारोहणानंतर सर्व शासकीय कार्यालये, आरोग्य संस्था, शाळा व महाविद्यालयांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन वाचन करून कुष्ठरोगाबाबत प्रतिज्ञा घेतली जाणार आहे. तसेच दि. ३० जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुण्यतिथी दिन कुष्ठरोग निवारण दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे.



दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुष्ठरोग निवारण पंधरवडा राबविण्यात येणार असून, या काळात शाळांमध्ये प्रार्थनेनंतर कुष्ठरोग प्रतिज्ञा, सूचना फलकांवर जनजागृती संदेश, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, निबंध व रांगोळी स्पर्धा, गाणी-कवितावाचन तसेच प्रभातफेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. कुष्ठरोगाचे लवकर निदान, वेळेवर उपचाराचे महत्त्व व गैरसमज दूर करण्यासाठी प्रसारमाध्यमांतूनही जनजागृती केली जाणार आहे. महिला मंडळे, बचत गट, तरुण मंडळांच्या सभा तसेच खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.

शाश्वत विकास ध्येयांतर्गत केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसाराचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या पार्श्वभूमीवर दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुष्ठरोगमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) हा विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत विटभट्टी कामगार, खडी केंद्रांवरील कामगार, ऊसतोड मजूर, साखर-गूळ कारखान्यातील कामगार, आश्रमशाळा व वस्तीगृहातील विद्यार्थी, बांधकाम कामगार, जेलमधील कैदी तसेच स्थलांतरित लोकांची तपासणी करण्यात येणार आहे.

बैठकीची प्रस्तावना डॉ. एम. आर. कोरे, सचिव, जिल्हा समन्वय समिती तथा सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), धाराशिव यांनी केली. जिल्हाधिकारी पुजार यांनी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले. तसेच शाळा व महाविद्यालयांतून अधिकाधिक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीस समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी गावनिहाय पथके तयार करून प्रत्येक ग्रामसभेला आरोग्य कर्मचारी किंवा आशा कार्यकर्ती उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी दिली.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील १२ हजार ५७५ अर्जांना पुन्हा संधी

### २३ जानेवारीपूर्वी त्रुटी दुरुस्तीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगामात एकूण १२ हजार ५७५ पीक विमा अर्ज विमा कंपनीमार्फत विविध कारणांमुळे रद्द करण्यात आले होते. तर १३ हजार ५३९ विमा अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी ऑनलाईन सेवा केंद्रांकडे परत (Revert) करण्यात आले होते.



या प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची बैठक २२ डिसेंबर २०२५ रोजी पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी रद्द झालेल्या १२ हजार ५७५ विमा अर्जदारांना योजनेत सहभाग नोंदविण्यासाठी एक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विमा कंपनीने अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी ऑनलाईन सेवा केंद्रांकडे परत (Revert) करण्याचे निर्देश दिले. यामुळे शेतकऱ्यांना ऑनलाईन सेवा केंद्रामार्फत आवश्यक त्रुटी दुरुस्त करून योजनेतील सहभाग कायम ठेवता येणार आहे.

त्याअनुषंगाने विमा कंपनीने खरीप हंगामात रद्द करण्यात आलेले १२ हजार ५७५ विमा अर्ज १६ जानेवारी २०२६ रोजी ऑनलाईन सेवा केंद्रांकडे परत (Revert) केले असून, त्या विमा अर्जांच्या तालुकानिहाय याद्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

विमा अर्जांच्या त्रुटी पूर्ततेसाठी केवळ सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे पीक विमा अर्ज रद्द झालेले आहेत, त्यांनी ज्या ऑनलाईन सेवा केंद्रामार्फत पीक विमा अर्ज भरलेला आहे. त्या ऑनलाईन सेवा केंद्राशी तातडीने संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह २३ जानेवारी २०२६ पूर्वी आपल्या विमा अर्जाची त्रुटी पूर्तता करून घ्यावी, अन्यथा संबंधित विमा अर्ज रद्द होण्याची शक्यता आहे.

तरी शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित संबंधित ऑनलाईन सेवा केंद्राशी संपर्क साधून आपल्या पीक विमा अर्जातील त्रुटी आवश्यक कागदपत्रांसह दुरुस्त करून घ्याव्यात, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे

# मंगरूळच्या विद्यमान सरपंच विजयालक्ष्मी डोंगरे आणि महेश डोंगरे यांचा भाजपात जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ यथील काँग्रेस पक्षाच्या विद्यमान सरपंच विजयालक्ष्मी महेश डोंगरे तसेच ग्रामपंचायत सदस्य महेश डोंगरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.



तुळजापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती चित्तरंजन सरडे यांची यशस्वी मध्यस्तीने आणि भाजपच्या विकासाभिमुख धोरणांवर विश्वास ठेवून व पक्षाच्या संघटनात्मक कार्यपद्धतीने प्रेरित होऊन त्यांनी हा निर्णय घेतला.

### तुळजापूर तालुक्यात काँग्रेसला सुरूंग...

यांच्यासोबत अप्पासाहेब जेठीथोर, सुनील डोंगरे, सुमित डोंगरे, सुधीर रोकडे, सोमनाथ रोकडे, भूषण डोंगरे, निलेश निकम, पंकज धुरगुडे, आदित्य डोंगरे, नितीन डोंगरे, अंबादास येळणे, नवनाथ खंडाळकर, संभाजी लबडे, अभय खोपडे, करण खंडाळकर, सुमित सावंत, शिवाजी खोपडे, दत्ता खंडाळकर, राजकुमार डोंगरे व मनोज धुरगुडे यांनीही भाजपात प्रवेश केला.

या सर्व नवप्रवेशी पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे भारतीय जनता पार्टीत मनःपूर्वक स्वागत करून शुभेच्छा देण्यात आल्या.

त्यांच्या प्रवेशामुळे मंगरूळ व परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक बळकट होणार असून गावाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

यापसंगी विजय गंगणे, विजय शिंगाडे, चित्तरंजन सरडे, स्वाती सरडे, प्रतापसिंह सरडे, आबासाहेब सरडे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठवडी बाजारात सीसीटीव्ही, निवारा व पाणी सुविधांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जानेवारी -**

तुळजापूर शहरातील आठवडी बाजारात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून उन्हा-पावसापासून संरक्षणासाठी निवाऱ्याची तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी जनहित संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

तुळजापूर तालुक्याचा आठवडी बाजार शहरामध्ये भरवला जातो. मात्र, बाजाराच्या ठिकाणी अपुरी जागा असून उन्हा-पावसाचा कोणताही निवाराही उपलब्ध नाही. तसेच दि.१३ जानेवारी २०२६, मंगळवार रोजी सर्व व्यापाऱ्यांना एकाच ठिकाणी नियोजनशून्य पद्धतीने बसवून बॅरिकेट लावल्याने बाजारात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली.

या गर्दीमुळे महिलांना धक्काबुक्कीचा सामना करावा लागला. याचवेळी बाजारात आलेल्या नागरिकांचे मोबाईल, पैसे व सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचे प्रकार घडल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी आठवडी बाजार परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच नागरिकांना उन्हा-पावसाचा त्रास होऊ नये म्हणून निवाऱ्याची व्यवस्था करावी आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. यापुढे कोणतेही नियोजन करताना सर्व बाबींचा सखोल विचार करूनच निर्णय घ्यावा, अशी मागणी जनहित संघटनेने केली आहे.

या निवेदनावर अजय साळुंके, प्रशांत सोंजी यांच्यासह जनहित संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# धाराशिवमध्ये युवकांसाठी एक दिवसीय मार्गदर्शक विकास कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात भारतीय युवा शक्ती ट्रस्ट BYST, पुणे यांच्यासह आयोजित एक दिवसीय मार्गदर्शक विकास कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील युवकांना नवीन उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शक (मेंटर) तयार करणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन प्रदान करणे हा होता.

भारतीय युवा ट्रस्टचे प्रशिक्षक राम बेंडे यांनी महाविद्यालयातील ५० शिक्षकांना उद्योग मार्गदर्शक बनण्यासाठी आवश्यक कौशल्ये, गुणवत्ता, व्यक्तिमत्व याबाबत सखोल प्रात्यक्षिकात्मक प्रशिक्षण दिले. यामुळे उद्योग सुरू करण्यास इच्छुक युवकांना योग्य मार्गदर्शन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे टी.पी.ओ.प्रा. अशोक जगताप व रामेश्वर मुंढे यांनी केले, तर प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी प्रशिक्षकांचे कौतुक केले.

ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, विश्वस्त व आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी प्रशिक्षणार्थ्यांचे कौतुक केले.

# टाटा सामाजिक विज्ञान संस्था तुळजापूर ऑफ-कॅम्पस येथे १९ वा दीक्षांत समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जानेवारी -**

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या (TISS) कार्यकारी परिषद व शैक्षणिक परिषदेच्या अध्यक्ष व सदस्यांच्या वतीने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर ऑफ-कॅम्पस येथे १९ वा दीक्षांत समारंभ भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे.

हा दीक्षांत समारंभ मंगळवार, दि.२० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता टाटा सामाजिक विज्ञान संस्था, प्रशासकीय इमारत, अपसिंगा रोड, तुळजापूर, जि. धाराशिव येथे संपन्न होणार आहे.

या दीक्षांत समारंभास महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल यांचे सचिव डॉ. प्रशांतजी नारनवरे (भा.प्र.से.) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे कुलाधिपती प्रो. डी.पी. सिंह, कुलपती प्रो. बद्री नारायण तिवारी, कुलसचिव (कार्यवाहक) डॉ. नरेंद्र मिश्रा, तुळजापूर ऑफ-कॅम्पसचे संचालक प्रो. बाळ राक्षसे, प्रो. असीम प्रकाश, डॉ. मधुश्री शेखर, प्रो. सुनील सांता व श्री. कुंदन धुमाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या समारंभात टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. सामाजिक कार्य, ग्रामीण विकास, सार्वजनिक धोरणे, शिक्षण व संशोधन क्षेत्रात योगदान देणारे भावी नेतृत्व घडविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा क्षण अत्यंत गौरवाचा ठरणार आहे.

शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूल्यांची पुनर्पुष्टी करणारा हा दीक्षांत समारंभ ठरेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# लोहाऱ्यात अवैध मद्य जप्त, एकावर गुन्हा नोंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत इस्माईल सय्यद शेख (वय ३६ वर्षे, रा. जेवळी उत्तर, ता. लोहारा, जि. धाराशिव) याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दि.१८ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता, जेवळी येथील इस्माईल बिर्यानी हॉटेलच्या बाजूस अंदाजे २,७५० रुपयांच्या २० सिलबंद बाटल्या देशी-विदेशी दारु अवैध विक्रीसाठी जवळ ठेवलेल्या अवस्थेत पोलीसांनी जप्त केल्या.

याप्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र मद्य मनाई कायदा, कलम ६५(ई) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# ब्रह्मांडनायक देवबाळूमामा मंदिरात अमावस्यानिमित्त भंडारा व भजन-कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ जानेवारी -**

ब्रह्मांडनायक देवबाळूमामा मंदिर, परंडा येथे १८ जानेवारी २०२६, रविवार रोजी अमावस्या निमित्त संत बाळूमामांचा भंडारा मोठ्या भक्तिभावाने पार पडला.

सकाळी पहाटे श्रींचा आभिषेक व आरती करण्यात आली. सकाळी ८ ते ११ या वेळेत पंचक्रोशीतील सर्व महिला व पुरुष भजनी मंडळांनी भजनाचा कार्यक्रम सादर केला.

सकाळी ११ ते १२ या वेळेत हभप. श्री नागेश महाराज मांजरे भोंजा यांचे किर्तन झाले, त्यानंतर अन्नदाते यांचा सत्कार करण्यात आला.

पत्रकारिता दिनानिमित्त पत्रकार बांधव व भगिनी यांचा मंदिरच्या वतीने सत्कार झाला. श्री गणेशसिंह सद्दीवाल यांच्याकडून चहाचे, तर अनंतसिंह सद्दीवाल यांच्याकडून कन्या आंबीलीचे नियोजन करण्यात आले.



महाप्रसादासाठी पंगतीतील अन्नदाते दत्ता भगवान खंबायत व दिलीप भगवान खंबायत, तर भाजीपाला व्यवस्था बाळासाहेब पाडुळे आणि पाणीजार व्यवस्था ॲड. भालचंद्र औसरे यांनी केली.

सर्व देणगीदार, भजनी मंडळ, कीर्तनकार मंडळ व मंदिर सेवेकरी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. आरती नंतर श्रींना नैवेद्य दाखवून सर्वांसाठी महाप्रसाद वाटण्यात आला.

ब्रम्हांडनायक देवबाळूमामा मंदिर, परंडा येथे या कार्यक्रमात शेकडो भक्त उपस्थित होते. संपूर्ण भजन-कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी परंडा तालुक्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन ब्रह्मांडनायक देवबाळूमामा मंदिर सर्व भक्त परिवार व ग्रामस्थ केशरताई वैरागे (मदने) यांनी केले.

# लोहारा तालुक्यात शेतकरी अडचणी व फळबाग लागवडीचे प्रोत्साहन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१९ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील शेतकरी राजा गेल्या काही वर्षांपासून निसर्गाच्या अपवृत्तीमुळे संकटात आहेत. अतिवृष्टी, दुष्काळ, पिकांचे नुकसान, दुबार पेरणी, वाढलेला उत्पादन खर्च आणि कमी बाजारभाव यामुळे शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकत आहेत.

शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी जिल्हा कृषी विभागाने कास्ती खुर्दसह इतर गावांमध्ये रब्बी हंगामातील पिके व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले आणि फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्याचे महत्त्व सांगितले.

कास्ती खुर्द शिवारातील शेतकरी अब्बास रशीद शेख यांच्या शेतातील फळबाग पाहणी दरम्यान जिल्हा कृषी अधीक्षक आर.टी. मोरे, तालुका कृषी अधिकारी एम. एन. देवकाते, मंडळ कृषी अधिकारी एन.एन. मगर, उप कृषी अधिकारी जे.के. गोसावी व सहाय्यक कृषी अधिकारी व्ही. एस. निकम यांनी समाधान व्यक्त केले व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

शेतकऱ्यांनी पालकमंत्री, खासदार आणि आमदारांकडे पाठपुरावा करण्याची मागणी केली आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नागरिकच नव्हे तर लातुरात ' पोलीस 'ही सुरक्षित नाहीत !

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १९ जानेवारी :** लातूर शहरात केवळ सामान्य नागरिकांच्याच चोऱ्या होतात्ये नसून चोरांच्या कचाट्यातून पोलीस अधिकारी - कर्मचारीही सुटत नसल्याचे नुकत्याच घडलेल्या एका घटनेवरून दिसून येते. त्यामुळे पोलीस प्रशासनाला आणखी तत्परतेने आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढे सरसावे लागणार आहे. लातूरच्या विविध भागात सातत्याने छोट्या मोठ्या चोरीच्या घटना घडत असतात. रस्त्याने जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढून नेणे , सोन्याची साखळी चोरणे अशा घटनांबद्दल आपण ऐकून आहोत. पण शहरात मॉर्निंग वॉक साठी गेलेल्या एका सहायक पोलीस निरीक्षकाचाच मोबाईल चोरट्यांनी हिसकावून नेल्याचा प्रकार घडला आहे. लातूर पोलीस दलात सेवारत असलेले बाळासाहेब विष्णू डोंगरे हे रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे एमआयडीसी परिसरात मॉर्निंग वॉक ला गेले असता मोटारसायकलवरून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावून घेऊन पलायन केले. चोरटे एमएच २४ - डब्ल्यू ६६१४ क्रमांकाची मोटारसायकल घेऊन आले होते. त्यावरून एमआयडीसी पोलिसात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक पोगुलवार हे करताहेत. चक्क पोलीस अधिकाऱ्याच्याच हातातील



# आता लक्ष जिल्हा परिषद-पंचायत समितीकडे !

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, १९ जानेवारी :** नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत लातूरमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने नेत्रदीपक यश मिळवून मनपावर कब्जा केला. मनपामध्ये मिळविलेल्या या यशाने काँग्रेसच्या नेते आणि कार्यकर्त्यांचे मनोबल चांगलेच वाढले आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे काँग्रेससह जिल्हाभरातील नागरिकांचेही लक्ष आता आगामी जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुकीकडे लागले आहे.

लातूर मनपाच्या ७० पैकी ४३ जागांवर एकट्या त्यांच्यासोबत आघाडी केलेल्या वंचितचे उमेदवार निवडून आले आहेत. या निवडणुकीत काँग्रेसने वंचितला केवळ पाच जागा दिल्या होत्या. या पाच पैकी चार जागांवर विजय मिळवून वंचित आजमितीस सर्वाधिक यश मिळवणारा पक्ष ठरला आहे. लातूरमध्ये वंचितच यश म्हणजे २०-ट्वेन्टी क्रिकेट सामन्यात शेवटच्या शतकात येऊन बुमराहने एका शतकात चार षटकार ठोकल्याप्रमाणे आहे, असे



म्हटले जात आहे. पण शेवटी विजयाला अधिक महत्व असते. कारण विजय हा विजयच असतो.

लातूर जिल्हा परिषदेत एकूण ५८ सदस्य आहेत. मागच्या निवडणुकीत लातूर जिल्हा परिषद भाजपच्या ताब्यात होती. यावेळीही आपली विजयी परंपरा कायम ठेवण्याचा प्रयत्न भाजपचे नेते करणार आहेत, याबद्दल अजिबात शंका नाही. लातूर शहर मनपा काँग्रेसच्या ताब्यात आल्याने जिल्हा परिषद - पंचायत समितीमध्येही काँग्रेस वरचढ ठरेल असे बोलले जात आहे. मागच्या काही वर्षात लातूर जिल्ह्याच्या राजकारणावर भाजपनेही चांगलीच पकड घेतल्याचे पाहावयास मिळते. त्यातच मागची मनपा पहिल्या अडीच वर्षात भाजपच्या ताब्यात होती. तर जि.प. मध्येही भाजपने वरचष्मा मिळवला होता. जिल्हा परिषदेला जिल्ह्याचे मिनी मंत्रालय असेही संबोधले जाते. केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता असल्याने पुन्हा जि.प. - पं. स. च्या माध्यमातून खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी भाजपच्या पाठीशी राहणे गरजेचे असल्याचे भाजपचे नेते मंडळी सांगत असल्याचे पाहावयास मिळते. मनपा निवडणुकीच्या विजयाची पुनरावृत्ती जि. प. - पं. स. मध्येही करण्यास काँग्रेस उत्सुक असणार आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. पण काही चाणाक्ष मतदार राजकीय नेते सध्यस्थितीत अडजस्टमेंटचे राजकारण करत असल्याचे बोलून दाखवताना दिसतात. काही मतदारांनी तर चक्क लातूर मनपा काँग्रेसला जिंकू दिली, आता जिल्हा परिषद - पंचायत समिती भाजपाला जिंकू देणार असल्याच्या चर्चांना चवीने करताना आढळून येत आहेत. त्यामुळे आगामी जि. प. - पं. स. निवडणूक कोण जिंकणार ? याकडे आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## आशिव येथील आरोग्य शिबिरात ९० महिलांची तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**औसा, १९ जानेवारी :** आशिव (ता. औसा, जि. लातूर) येथे महिलांच्या आरोग्यास प्राधान्य देत आयोजित करण्यात आलेल्या तालुक्यातील आशिव येथील विशेष महिला आरोग्य शिबिरात महिलांच्या अनेक समस्यासह हिमोग्लोबिन, पाळीतील समस्या, छातीतील गाठी, गरोदर माता तपासणी, वंध्यत्व तपासणी,वारंवार होणारा गर्भपात, बी.पी, वजन अशा अनेक समस्यातील ९० महिलांची आरोग्य तपासणी यावेळी करण्यात आली.

आरोग्य शिबीराचे सरपंच कोमल रमाकांत वळके, उपसरपंच गंगा विनोद जगताप, नम्रता नामदेव माने, सविता किशन माने,डा. सविता तुपडीकर, डा. संदीप खानापुरकर, नसूबी शेख यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन उद् घाटन करण्यात आले.

महिलांना भेडसावणाऱ्या आजाराची या शिबिरामध्ये विशेषतःतपासणी करण्यात आली. रक्तातील हिमोग्लोबिन, रक्तदाब, स्त्रीरोगविषयक समस्या तसेच अंगातील गाठींची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान सुमारे ६० टक्के महिलांमध्ये रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आढळून आले. संबंधित महिलांना तज्ञ डॉक्टरांकडून योग्य शास्त्रीय मार्गदर्शन, समुपदेशन व आवश्यक उपचार देण्यात आले.

शिबिराची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

या शिबिरामध्ये तज्ञ स्त्रीरोगतज्ञ डॉ. सविता तुपडीकर यांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांवर सखोल मार्गदर्शन केले. महिलां मासिक पाळीशी संबंधित तक्रारी, अशक्तपणा, गाठींबाबतची भीती, थायरॉईड, रक्तदाब यासारख्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण करावी यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.शिबीर केवळ तपासणीपुरते मर्यादीत न राहता महिलांना मी आणि माझे आरोग्य या आत्मसंवादाकडे नेणारे आणि आरोग्याबाबत सजग बनवणारे ठरले आहे.

**महिलांसाठी पहिले आरोग्य शिबीर ठरले**

यापुर्वी अनेकदा शिबीर झाली. परंतु सर्वासाठी होती. मात्र यावेळी आशिवच्या इतिहासात पहिल्यांदाच महिलांच्या आरोग्यासाठी शिबीर झाले.या शिबीराचा महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला.

## श्री गुरुकुल स्कॉलर्स प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलचे १० वे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १९ जानेवारी :** येथील सिग्नल कॅम्प भागातील श्री गुरुकुल स्कॉलर्स प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलचे २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात व थाटामाटात साजरे करण्यात आले.

श्री गुरुकुल स्कॉलर्स प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल ची वाटचाल अतिशय चांगल्या पद्धतीने चालू असुन या स्कूल ने यावर्षी १० व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. या स्कूल तर्फे वर्षभरात वेगवेगळे सार्वजनिक उपक्रम राबविण्यात येतात. त्यात विशेष म्हणजे शाळेतील मुलांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षाचे रोप भेटवस्तू म्हणून दिले जाते, तसेच त्या रोपाचे संगोपन व त्याबद्दल चे महत्व ही मुलांना व त्यांच्या कुटुंबाला सांगण्यात येते. यावर्षी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे लातूर मधील सुप्रसिद्ध वकील ड.बालाजी पांचाळ, सुप्रसिद्ध बांधकाम डेव्हलपर इंजि.अतुल कदम यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी संस्थेचे अध्यक्ष ड.किरण बडे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागतही झाडांची रोपटे देऊन करण्यात आले. यावेळी २०२५-२६ मधील बेस्ट स्टुडंट ऑफ द इयर हे पुरस्कारही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. सदरील पुरस्कार श्लोक आचार्य, अमय वाडीवाले, आराध्या उपाळे व तन्वी स्वामी या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आले. यावेळी स्कूल मधील या लहान चिमुकल्यांनी आपल्या सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. प्रिया किरण बडे यांनी केले, सूत्रसंचालन श्री. शिवपुत्र स्वामी सर यांनी केले, मुलांचे नृत्याविष्कार श्री.रमेश भिसे सर यांनी अतिशय सुंदर रित्या घडवून आणले, तर आभार प्रदर्शन श्रीजनी मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला स्कूलचे शिक्षक वर्ग, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच शाळेच्या १० वर्ष स्थापनेपासूनचा पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले देशमुख कुटुंबाचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १९ जानेवारी :** लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन सुभाषराव देशमुख यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. होते त्याबद्दल रविवारी माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांनी बोरगाव काळे येथे सुभाषराव देशमुख यांच्या निवासस्थानी जाऊन सुभाष देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले व परिवाराचे सांत्वन केले धीर दिला यावेळी देशमुख परिवारातील पवन देशमुख, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका लतिका देशमुख, सतीश देशमुख, डॉ.बाळासाहेब देशमुख, राम देशमुख उपस्थित होते.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या निवासस्थानी नवनिर्वाचित नगरसेवकांनी घेतली भेट



**तभा वृत्तसेवा**
**लातूर १९ जानेवारी :** लातूर महानगर पालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने ४७ जागेवर ऐतिहासिक विजय संपादन केला असून याबद्दल शहरातील विविध प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेवक, काँग्रेस पदाधिकारी,कार्यकर्ते यांनी शनिवारी आशियाना निवासस्थानी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची भेट घेतली यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकाचे अभिनंदन करून दिलीपराव देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या व नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर राहावे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या

यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक धोंडीराम यादव इसरार सगरे, सपना किस्वे तब्बसुम शेख, योगेश स्वामी, सतीश साळुंके,यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी श्री कातळे, रामभाऊ कोंबडे,संभाजी सुळ, गोविंद मदने, चांदपाशा इनामदार शिवाजी कांबळे रेणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन आबासाहेब पाटील मारुती महाराज साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सचिन पाटील,संभाजी रेड्डी तसेच विविध प्रभागातील तसेच ग्रामीण भागातील पदाधिकारी कार्यकर्ते हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते नूतन नगरसेवकांनी नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर राहावे

यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी लातूरच्या जनतेने विकासाला प्राधान्य देवुन मोठा कौल काँग्रेसला दिलेला आहे असे सांगून लोकांच्या सेवेसाठी तत्पर राहावे असे आवाहन करत उपस्थित नागरिक सर्वांचे अभिनंदन केले आभार मानले.

## लोकशाही अधिक समृध्द करण्यासाठी ग्रंथालये महत्वाची : माधवराव टाकळीकर

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १९ जानेवारी :** आपली लोकशाही अधिक सुसंस्कृत,समृध्द करण्यासाठी ग्रंथ,सार्वजनिक ग्रंथालये आणि त्यात काम करणारे प्रशिक्षित ग्रंथालयीन कर्मचारी महत्वाचे आहेत,असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी येथे केले.



महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालयाच्या,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्यावतीने चालविण्यात येणार्या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून टाकळीकर बोलत होते . अध्यक्षपदी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे हे होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे,माजी जि.प.सदस्य महेश पाटील,प्राचार्य डॉ.अमित म्हेत्रे तर संघाचे कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले,उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्ञानाचे महत्त्व हे भारतीय संविधान देशाला देवून दाखविले आहे.ज्ञान अर्थात ग्रंथ,ग्रंथालये हे देशाची लोकशाही समृध्द करण्याचा मुळ पाया आहे किंबहुना ती देशाला संस्कार,दिशा देणारे मुळ आहे असे सांगून,माधवराव पाटील टाकळीकर यांनी म्हणाले की,आज एआयची चर्चा होतेय पण त्याला माहिती ग्रंथातूनच मिळते.कोणताही शोध ज्ञान,ग्रंथ यांच्यातून पुढे येतो,म्हणून ती वृध्दींगत होण्यासाठी शासनासोबतच,सार्वजनिक उपक्रमांनी सीएसआरमधून सार्वजनिक ग्रंथालयांना हात द्यावा असे आवाहन केले.

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करत वाचकांना अधिकाधिक,अद्यावत माहिती पुरविण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालय कर्मचार्यांनी करावे,ही कला आहे,ती आत्मसात करुन एलटीसी कोर्समुळे नोकरीच्या संधीविषयी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी अवगत केले. अध्यक्षीय समारोप ग्रंथमित्र प्रभाकर कापसे यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम मेकले यांनी केले. यावेळी डॉ.अमित म्हेत्रे यांनी ग्रंथपालन वर्गाच्या अभ्यासक्रम व उपयोगीता विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित पाटील यांनी केले. आभार बाळकृष्ण होळीकर यांनी मानले.

कार्यक्रमाला जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, ग्रंथमित्र धनंजय पवार, ग्रंथमित्र सूर्यकांत जाधव, ग्रंथमित्र काशिनाथ बोडके, ग्रंथालय संघाचे संचालक ग्रंथमित्र सूर्यकांत शिरसे, संचालक अशोक खोडवे, नंदकुमार घोगरे, तुकाराम सुगावकर,नागनाथ बिरादार, शिक्षक महेश राजमाने,डॉ.युवराज अंधोरीकर,प्रा.शारदा कनामे, गिरीधर जंगले, बी.एम.कुलकर्णी,लक्ष्मण फुलारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री केशवराज विद्यालयात महाराणा प्रताप यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**लातूर १९ जानेवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१९ जानेवारी २०२६ सोमवार रोजी महापराक्रमी, वीर योद्धा महाराणा प्रताप यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीणराव सरदेशमुख यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे व हल्दीघाट येथील पवित्र मृदेचे पूजन करून करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना प्रवीणराव सरदेशमुख यांनी महाराणा प्रताप यांच्या वीर पराक्रमी पूर्वजांची माहिती सांगितली. हल्दीघाट येथे झालेल्या लढाईतील प्रसंग सांगताना महाराणा प्रताप यांच्या चेतक या घोड्याचा पराक्रम कथन केला. महापराक्रमी महाराणा प्रताप यांनी बारा वर्षे गनिमीकावा या युद्धनीतीचा वापर करून मुघल बादशहा अकबराशी लढा दिला. यात त्यांना आपले आयुष्य दऱ्याखोऱ्यात घालवावे लागले; परंतु त्यांनी हार मानली नाही. शेवटी अकबराला लाहोरला स्थलांतर करावे लागले. अत्यंत दूरदर्शी, कुटनीतीज्ञ, चारित्र्यवान, संघटन कौशल्य इत्यादी गुण अंगी असलेल्या महापराक्रमी महाराणा प्रताप यांनी आपल्या आयुष्यभर मुघलांशी लढा दिला, असे सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी यांनी केले, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन तेजस्विनी सांजेकर यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने झाली. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी, आठवी ते दहावी विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## आ. देशमुख यांनी विद्यमान नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांशी साधला संवाद

### जिल्हा परीषद व पंचायत समिती निवडणुक इच्छुक उमेदवारांनी घेतल्या भेटी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १९ जानेवारी :** आ. अमित विलासराव देशमुख यांनी रविवारी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर महानगरपालिकेच्या वडियमन नगरसेवकांसह जिल्हाभरातून आलेले काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या भेटी घेत संवाद साधला. तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील चाकूर व जळकोटसह ग्रामीण भागातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश देखील यावेळी पार पडला.

लातूर शहर महानगरपालिका



निवडणुकीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीला मिळालेले यश आणि यासाठी अथक परिश्रम घेतलेले पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी केलेले कार्य व लातूर मधील मतदारांचे काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराना मिळालेल्या प्रतिसादाबद्दल सर्वांचे आ. अमित देशमुख यांनी आभार मानले. तसेच नवनियुक्त मनपा सदस्यांना त्यांचे प्रभाग आणि लातूर शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने येणार्या काळात कराव्या लागणाऱ्या कामाकरीता शुभेच्छाही यावेळी दिल्या.

माजी मंत्री आ अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत जळकोट येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी शांताताई लक्ष्मणराव अदावळे व रमण लक्ष्मणराव अदावळे यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. तसेच चाकूर येथील शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी तथा माजी सभापती ड. माधवराव कोळगावे शिवनखेडचे उपसरपंच सोमनाथ नौबदे व रत्नाकर बिराजदार यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या वेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर प्रा.डॉ. स्मिता खानापुरे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती- जगदीश बावणे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव देशमुख, व्हा. चेअरमन-प्रवीण पाटील, माजी चेअरमन यशवंतराव पाटील, सर्जेराव मोरे यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.